# हिंदुस्तानचा
# [illegible]



ई  ए

३।८ -
८२०

१०।७ ६६

ही·कं·२गोक

# अनुक्रमणिका.


| भाग. | विषय. | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| पहिला. | —देशाचें वर्णन. | १ |
| दुसरा. | —हिंदुस्थानाचे राजकीय विभाग. | २ |
| तिसरा. | —हिंदुस्थानाविषयीं प्राचीन माहिती. | ६ |
| चवथा. | —मोंगल बादशाहा. | १२ |
| पांचवा. | —मराठ्यांविषयीं. | १९ |
| साहावा. | —इंग्लिशांचा उत्कर्ष, व पेशवे. | २४ |
| सातवा. | —बंगाल्यांतील वर्तमानें. | २८ |
| आठवा. | —बंगाल्यांतील वर्तमानें—हैदराशीं युद्ध—वगैरे. | ३३ |
| नववा. | —पेशव्यांशीं पुनः तह—सालप्याचा तह—टिपूचा शेवट. | ३८ |
| दाहावा. | —मराठ्यांशीं लढाया—तह—इ० | ४५ |
| अकरावा. | —लार्ड मिंतो ह्याची कारकीर्द. | ५० |
| बारावा. | —नेपाळची लढाई—पेंढारी—इ०. | ५३ |
| तेरावा. | —पेशवे व भोंसले ह्यांचीं वर्तमानें. | ५६ |
| चौदावा. | —होळकराशीं तह—ब्रह्मदेशाशीं युद्ध, भरतपुरचा वेढा इ०. | ६० |
| पंधरावा. | —लार्ड विलियम बेंतिक व लार्ड आक्लंद ह्यांची कारकीर्द—अफगाणिस्थानाशीं लढाई—सिंधचे अमीरांशीं लढाई इ०. | ६५ |
| सोळावा. | —पंजाबची लढाई—लार्ड हार्डिंज व लार्ड डालहौसी ह्यांची कारकीर्द निजाम व अयोध्येचा नबाब ह्यांचें वर्तमान—इ०. | ७१ |
| सत्रावा. | —बंगाल्यांतील शिपायांच्या बंडाचीं कारणें व आरंभ. | ७६ |
| अठरावा. | —बंडाचा प्रसार, शेवट आणि परिणाम इ०. | ८० |
| एकुणिसावा. | —हिंदुस्थानांत इंग्लिशांचा उत्कर्ष होण्याचीं कारणें व त्यांच्या राज्याची सांप्रतची स्थिति. | ९० |
| | मोठमोठ्या गोष्टींचें टिपण. | ९३ |
| | गव्हरनर जनरल | १०२ |

No XX

History of India
by V. K. Oke
Karandikar

फारशी भाषेंत हिंदु ह्मणजे काळा; आणि [illegible]णांतील लोकांपेक्षां ह्या देशांतील लोक काळे आहेत. ह्यावरून, हिंदुस्थान ह्मणजे काळे लोकांचा देश, असें ह्या देशाचें नांव पडलें असावें.

उत्तरेस हिमालय पर्वत; पूर्वेस ब्रह्मपुत्र नद, व आराकानचे डोंगर; आग्नेयीस व कांहीं पूर्वेस बंगालचा उपसागर; दक्षिणेस हिंदीमहासागर; आणि पश्चिमेस सिंधु नद; अशा हिंदुस्थानाच्या सीमा आहेत.

दक्षिणेस कन्याकुमारी केपापासून तों उत्तरेस पंजाबाच्या उत्तरमर्यादेपर्यंत ह्या देशाची लांबी १८८० मैल; पूर्वेस आसामाच्या पूर्वमर्यादेपासून तों पश्चिमेस कराचीपर्यंत रुंदी सुमारें तितकीच आहे; क्षेत्रफळ सुमारें १३८३५०० चौरस मैल आहे; आणि लोकसंख्या सुमारें साडेपंचवीस कोटि आहे.

हिंदुस्थानांत हिमालय, सह्याद्रि, विंध्याद्रि, अरवली, चितूर, हारावती, सातपुडा, राजमहाल, इत्यादि अनेक पर्वतांच्या ओळी आहेत. त्यांपैकीं हिमालय ही ओळ पृथ्वीमध्यें सर्वांत उंच आहे.

गंगा, सिंधु, ब्रह्मपुत्र, नर्मदा, तापी, महानदी, महीनदी, साबरमती, गोदावरी, कृष्णा, घटप्रभा, मलप्रभा, भीमा, कावेरी, प्रवरा, अशा पुष्कळ नद्या व नद हिंदुस्थानांत आहेत.

चिलका, कोलेर, पलीकत, होनावर, साबर, ताल, मानस, मानसबल, उलूर, इत्यादि सरोवरें आहेत.

सिंहलद्वीपाचें उत्तरटोंक व हिंदुस्थान ह्यांच्या मध्यें पाल्क नांवाची सामुद्रधुनी आहे; आणि रामेश्वरबेट व हिंदुस्थान ह्यांच्या मध्येंही एक लहानशी सामुद्रधुनी आहे.

कच्छचें, खंबायतचें, व मुनारचें हीं तीन अखातें हिंदुस्थानांत आहेत; व बंगालचा उपसागर हा एक उपसागर आहे.

ह्या देशांतील सर्व ठिकाणच्या हवेची उष्णता सारखी नाहीं. मुंबईच्या हवेच्या उष्णतेचें मान सरासरी ८२ अंश, आणि नीलगिरीच्या हवेच्या उष्णतेचें मान सरासरी ५६ अंश असतें.

गहूं, सातु, बरग, तांदूळ, नाचणी, हरभरा, तूर, जोरी, बाजरी, मका, रुई, ऊंस, कापूस, नीळ, तीळ, वेलदोडे, आलें, मिरीं, हळद, ज्येष्ठमध, तमाखू, ताग, नाख, खसखस, आंबा, फणस, नारळ, सुपारी, द्राक्षें, अननस, अंजीर, नारिंग, इत्यादि पदार्थ, हिंदुस्थानांत उत्पन्न होतात. शिवाय वेळू, बाभूळ, शिसवा, साग, चिंच, अशीं अनेक प्रकारचीं इमारतीचीं लांकडें होतात.

ह्या देशामध्यें हत्ती, वाघ, चित्ता, रानडुकर, लांडगा, खोंकड, तरस, सिंह, गवा, आस्वल, कोल्हा, ससा, वानर, नीलगै, इत्यादि वन्य जनावरें आहेत. घोडा, गाढव, हत्ती, उंट, बैल, गाय, डुकर, ह्मैस, रेडा, शेळी, बकरें, मांजर, कुत्रें इत्यादि ग्राम्य पशु आहेत. ह्यांखेरीज कांसव, मासा, खेंकडा, इत्यादि, पाण्यांत राहाणारे जीव, व चिमणी, कावळा, राघू, पारवा, इत्यादि पक्षी आहेत; व साप, विंचू, अधेला इत्यादि दंश करणारे प्राणी अनेक आहेत.

हिरे, माणकें वगैरे रत्नें, व सोन्यारुप्याचे कण, हीं कोठें कोठें सांपडतात. आलीकडे दगडी कोळशांच्या आणि दगडी तेलाच्या खाणी लागल्या आहेत. समुद्राच्या पाण्यापासून मीठ पुष्कळ ठिकाणीं होतें. पंजाबांत शेंधेलोणाच्या खाणी आहेत. आणखी बहुत जागीं सोरा, मीठ, लोखंड, ह्यांच्या खाणी लागल्या आहेत.

हिंदुस्थानामध्यें हिंदी, बंगाली, मराठी, गुजराथी, तैलंगी, तामिळ, कानडी, अशा अनेक भाषा चालतात. ह्या सगळ्या संस्कृत भाषेपासून झाल्या असाव्या, असें विद्वानांचें मत आहे.

---

## भाग दुसरा.

### हिंदुस्थानाचे राजकीय विभाग.

राज्यव्यवस्थेकरितां हिंदुस्थानाचे जे भाग केले आहेत, त्यांचें वर्णन येणेंप्रमाणें:-

१. **बंगाल इलाखा.**-ह्यांत [illegible] प्रांत सामील केला आहे.

हा लेफ्टनेंट गव्हरनराच्या ताब्यांत आहे. तो कलकत्त्यास असतो. ह्यांत नदिया, प्लासी, चंद्रनगर, राणीगंज, डाका, पाटणा, बक्सार, दार्जलिंग इत्यादि अनेक ठिकाणें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत.

**२. वायव्येकडील प्रांतांचा इलाखा.**—ह्यांत अयोध्याप्रांत सामील केला आहे. हा लेफ्टनेंट गव्हरनराच्या ताब्यांत असतो तो अलाहाबादेस असतो. ह्यांत आग्रा, अलाहाबाद, कानपुर, काशी, मिरत, झांशी इत्यादि अनेक ठिकाणें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत. रामपुर आणि गर्वाल हीं एतद्देशीय संस्थानें ह्यामध्यें आहेत.

**३. पंजाब इलाखा.**—हा लेफ्टनेंट गव्हरनराच्या ताब्यांत असतो. तो लाहोरास असतो. ह्यांत अमृतसर, लुधियाना, सिमला, दिल्ली, लाहोर, पेशावर, मुलतान, रावळपिंडी इत्यादि ठिकाणें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत.

**४. रजपुताना.**—ह्यांत रजपुत लोकांचीं अनेक संस्थानें आहेत. त्यांत अठरा प्रमुख आहेत. त्यांच्या दरबारांत इंग्लिश सरकाराचे रेसिडेंत किंवा पोलितिकल एजेंत असतात. त्या सर्वांचा मुख्य अधिकारी गव्हरनरजनरलाचा एजेंत, तो आबूपाहाडावर असतो. ह्यांत रतनबोर, अंबर, उदेपुर, चितुर, अजमीर, जोधपुर, लासवारी, भरतपुर इत्यादि ठिकाणें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत.

**५. मुंबई इलाखा.**—हा गव्हरनर इन्कौन्सलाच्या ताब्यांत आहे. तो मुंबईस राहातो. ह्यांत सिंध, गुजराथ, महाराष्ट्रदेश आणि दक्षिणमहाराष्ट्रदेश हे मोठे प्रांत आहेत. ह्यामध्यें मुंबई, ठाणें, वसई, पुणें, अहमदनगर, विजापुर, सातारा, कराची, इत्यादि शहरें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत.

**६. मध्यहिंदुस्थानांतलीं संस्थानें.**—हीं गुजराथेच्या आणि रजपुत संस्थानांच्या पूर्वेस, अंशतः उत्तर हिंदुस्थानांत आणि अंशतः दक्षिणेंत अशीं आहेत. ह्यांवर इंग्लिशसरकारचा मुख्य अधिकारी ह्मटला म्हणजे गव्हरनर जनरलाचा एजेंत होय. तीं लहान मोठीं संस्थानें एकंदर एक्काहत्तर आहेत. त्यांमध्यें ग्वालेरचें, ह्मणजे शिंदेसरकारचें राज्य, इंदुरचें, ह्मणजे होळकर सरकारचें राज्य, भोपाळच्या बेगमचें राज्य, रेवा संस्थान, इत्यादि [illegible] आहेत.

७. **मध्यप्रांत.**–मध्यहिंदुस्थानांतल्या संस्थानांच्या दक्षिणेस आणि छोटा नागपुराच्या नैर्ऋत्येस मध्यप्रांत आहे. तो चीफ कमिशनराच्या ताब्यांत असतो. त्यांत जबलपुर, नागपुर, अशिरगड इत्यादि ठिकाणें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत.

८. **वऱ्हाड.**–मध्यप्रांताच्या दक्षिणेस वऱ्हाडप्रांत आहे. त्याचा कारभार, निजामाच्या हैदराबादेस जो रेसिडेंट असतो, तो पाहातो. निजामसरकारानें हा प्रांत कांहीं कर्जाबद्दल इंग्लिश सरकारास दिला. ह्यांत इलिचपुर, अकोलें वगैरे कितीएक शहरें आहेत.

९. **निजामाचें राज्य.**–हें वऱ्हाडाच्या दक्षिणेस आहे. ह्यांत निजामसरकारचा अंमल चालतो. निजाम इंग्लिश सरकारास खंडणी देतो. ह्या प्रांतामध्यें हैदराबाद, गोवळकोंडें, बेदर, कलबुर्गें, दौलताबाद, औरंगाबाद, वेरुळ इत्यादि शहरें लक्षांत ठेवण्यासारखी आहेत.

१०. **मद्रास इलाखा.**–हिंदुस्थानाचा पूर्व किनारा, ह्मणजे कारोमांडल किनारा उत्तरेस ओरिसा प्रांतापर्यंत, आणि कांहीं पश्चिम किनारा ह्यांवरचा मुलूख मिळून हा इलाखा झाला आहे. ओरिसाच्या शेजारच्या प्रांतास उत्तर सरकार ह्मणतात. हा इलाखा गव्हरनर इन् कौन्सिल ह्याच्या ताब्यांत असतो. ह्या इलाख्यांत मोठीं एतद्देशीय संस्थानें पांच आहेत. त्यांत त्रावणकोरचें संस्थान मोठें आहे. ह्या इलाख्यांत मद्रास, तंजावर, चिंगलपट, कांजीवरम, अर्काट, वेलोर, वांदिवाश, कडलोर, जिंजी, पोर्टोनोव्हो, मछलीपट्टन, इत्यादि ठिकाणें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत.

११. **ह्मैसुर आणि कुर्ग.**–हे प्रांत हैदराबादेच्या दक्षिणेस आहेत. ह्यांतल्या ह्मैसुरच्या राज्याची व्यवस्था, तेथला राजा लहान असल्यामुळें इंग्लिश सरकाराकडे होती. परंतु तो राजा वयांत आल्यावरून त्याचें राज्य थोड्या वर्षांपूर्वी त्याच्या स्वाधीन केलें. कुर्गप्रांत इंग्लिशसरकाराच्या ताब्यांत आहे. ह्यांत मर्कारा आणि वायनाड हीं ठिकाणें लक्षांत ठेवण्यासारखीं आहेत.

१२. **ब्रह्मदेश.**–हा पूर्वेकडील द्वीपकल्पाचा एक भाग आहे. हा हिंदुस्थानांतल्या इंग्लिश राज्यांत मोडतो. ह्यावर मुख्य अधिकारी चीफ कमिशनर असतो. तो त्या मुलुखाचा कारभार, गव्हरनर जनरलाच्या आज्ञेप्रमाणें चालवितो.

**१३. हिमालयाच्या जवळचीं संस्थानें.**–ह्यांत मोठीं अशीं चार आहेत; भुतान, सिकिम, नेपाळ आणि काश्मीर. भुतानचा राजा स्वतंत्र आहे; आणि त्याची प्रजा बौद्धधर्मी आहे. सिकिम हें जरा लहान संस्थान आहे. तेथील लोकांस लेपचा ह्मणतात. तेथील राजा इंग्लिश सरकारच्या अधिकाऱ्यांशीं स्नेहभावानें वागतो. नेपाळ हें संस्थान मोठें आहे. त्याची राजधानी कटमंडू. तेथील राजाच्या दरबारीं इंग्लिश सरकारचा रेसिडेंत असतो. काश्मीर हें, पंजाब काबीज केला तेव्हां, इंग्लिश सरकारानें जंमूचा राजा गुलाबशिंग ह्यास दिलें. त्याचा वंशज हल्लीं गादीवर आहे. त्याचा आणि इंग्लिशसरकारचा स्नेह आहे.

**१४. युरोपांतल्या इतर लोकांचीं ठाणीं.**–हिंदुस्थानांत पोर्तुगीज लोकांचीं तीन ठाणीं आहेत; गोवें पश्चिम किनाऱ्यावर; दमन सुरत जिल्ह्यांत; आणि दिव हें बेट काठेवाडाजवळ आहे. फ्रेंच लोकांचीं ठाणीं पांच आहेत; पांडिचरी, मद्रासेच्या दक्षिणेस; कारिकल, कावेरी नदीस मिळणाऱ्या एका नदीवर; चंद्रनगर, कलकत्त्याच्या उत्तरेस; यानान, गोदावरीच्या मुखाजवळ; आणि माही, मलबार किनाऱ्यावर बेपुरच्या उत्तरेस.

**१५. सीलोन ह्मणजे लंका.**–हें बेट हिंदुस्थानाच्या दक्षिणेस इंग्लिश सरकारच्या ताब्यांत आहे. त्यावर हिंदुस्थानाच्या गव्हनर जनरलाचा अंमल नाहीं. तेथल्या लोकांवर राज्य करण्यास वेगळा गव्हनर इंग्लंडांतून येतो. त्या बेटाची राजधानी कोलंबो आहे.

**१६. आंदामान आणि निकोबार बेटें.**–हीं बंगालच्या उपसागरांत असून, त्यांवर इंग्लिश सरकाराचा अंमल आहे. तेथले अधिकारी आपलीं कामें गव्हरनर जनरलाच्या आज्ञेप्रमाणें चालवितात. हिंदुस्थानांतले काळ्यापाण्याच्या शिक्षेचे कैदी आंदामान बेटांत ठेवितात. तेथें त्यांची मोठी वसाहात झाली आहे. तेथले मूळचे राहाणारे लोक रानटी आहेत. निकोबारचे लोकही त्यांसारखे आहेत.

इंग्लिशांच्या ताब्यांतल्या ब्रह्मदेशासुद्धां सर्व हिंदुस्थानाच्या राज-

कीय विभागांचें आकारमान लक्षांत येण्यास त्यांचें क्षेत्रफळ आणि लोकसंख्या येथें सांगतों.—

| नांव. | क्षेत्रफळ चौरस मैल. | लोकसंख्या. |
|---|---|---|
| खुद्द इंग्लिश सरकारच्या ताब्यांतला मुलूख ... ... ... ... ... | १०७२३२५ | २०२०४३५०० |
| इंग्लिश सरकारच्या ताब्यांतलीं संस्थानें | ५२१११६ | ५५३५१०८९ |
| पोर्तुगीज लोकांच्या ताब्यांतला मुलूख. | १०८६ | ४०७७१२ |
| फ्रेंच लोकांच्या ताब्यांतला मुलूख... | १७८ | २७१४६० |
| एकूण. | १५९४७०५ | २५८०७३७६१ |

# भाग तिसरा.

## हिंदुस्थानाविषयीं प्राचीन माहिती.

फार प्राचीन काळीं हिंदुस्थानामध्यें काळे रानटी लोक राहात असत. त्यांस बहुत वर्षांपूर्वीं आर्य नांवाच्या लोकांनीं वायव्येकडून येऊन जिंकिलें. ते संस्कृत भाषा बोलत. त्यांची वसाहात प्रथमतः दिल्ली आणि पंजाब ह्यांच्या मधल्या प्रदेशांत झाली; नंतर ते आपला अंमल पूर्वेकडे आणि दक्षिणेकडे वसवीत चालले. त्यांच्यामध्यें, सूर्यवंशी आणि सोमवंशी असे दोन पक्ष होऊन त्यांनीं आपलीं राज्यें अयोध्या, बंगाला इत्यादि प्रांतांत स्थापिलीं; आणि देशाची बरीच सुधारणा केली. इसवी सनापूर्वीं १५०० हूनही अधिक वर्षांवर मिसर देशाचा सेसोस्त्रिस राजा ह्यानें जलमार्गें येऊन हिंदुस्थानावर स्वारी केली, असा ग्रीक ग्रंथकारांचा लेख आहे. नंतर आसिरिया देशाची सेमिरामिस-राणी ही मोठी फौज घेऊन हिंदुस्थानावर आली. ह्या गोष्टींचे सनशक वगैरे कोठें आढळत नाहींत.

इराण देशाचा राजा दारियस ह्यानें इ० स० पूर्वीं ५२१ वर्षांच्या सुमारास हिंदुस्थानाकडे स्वारी केली. तरी तो सिंधुनदाच्या आलीकडे फारसा आला नव्हता.

मासिदोन देशाचा शिकंदर बादशाहा ह्यानें इसवी सनापूर्वीं ३२७ वे वर्षीं हिंदुस्थानावर स्वारी केली. तेव्हां पौरस नामक कुळांतला

कोणी राजा त्याशीं लढण्यास उभा राहिला होता; परंतु तो पराभव पावला, आणि बादशाहा विजयी झाला. ह्या वेळेपुढची हिंदुस्थानाविषयींची माहिती थोडथोडी आधारपूर्वक मिळते. ह्मणून हाच त्याच्या इतिहासाचा खरा आरंभ समजला पाहिजे.

शिकंदराचे वेळीं पाटणा येथें चंद्रगुप्त राजा राज्य करीत होता बंगाल्यांत प्रथम पाल ह्या आडनांवाचे व नंतर सेन ह्या आडनांवाचे राजे राज्य करीत होते. माळव्यांत परमार नांवाच्या वंशाचे एकंदर छपन्न राजे एकामागून एक असे होऊन गेले. त्यांत विक्रमादित्य हा इसवी सनापूर्वी सुमारें ५६ वे वर्षी गादीवर होता. तो विद्वानांचा मोठा पक्षपाती असे. उज्जनी ही त्याची राजधानी होती. सीथियन लोकांनीं हिंदुस्थानांत प्रवेश केला होता, त्यांस त्यानें हांकून लाविलें. त्याच्याच वंशांत पुढें भोजराजा झाला. तो इ० स० च्या अकराव्या शतकांत गादीवर होता. त्याच्या पदरीं कालीदास ह्मणून एक कवि होता. त्याचीहि विद्यावृद्धीविषयीं फार आख्या लिहिली आहे. ह्यांखेरीज गुजराथ, कनोज, इत्यादि जागीं उत्तरेकडे अनेक राज्यें होतीं.

दक्षिणेकडे त्रावणकोर, मलबार, कोइमतूर, ह्या प्रांतांवर चेर नामक राजे राज्य करीत. कर्नाटकावर पांड्य, चेर, केरल ह्यांचा अंमल असे. आंध्र देशाची राजधानी वारंगुळ. त्याच्या इतिहासांत आधीं विक्रम शालिवाहन ह्यांचीं नांवें आढळतात. महाराष्ट्र देशाची राजधानी तगर. ही गोदावरीच्या कांठीं पैठणाच्या पूर्वेस होती. कुंभाराचा एक मुलगा पैठण येथें स्वपराक्रमानें वाढून, शालिवाहन ह्या नामें शककर्त्ता होऊन गेला. त्यानें उज्जनीच्या विक्रम राजास जिंकिलें, अशी दंतकथा आहे; परंतु ह्या दोघांच्या कारकीर्दीमध्यें अंतर १३५ वर्षांचें आहे. इसवी सनानंतर ७८½ वर्षांनीं शालिवाहन शक चालू झाला.

सिंधुनदाच्या पलीकडे अफगाणिस्थानांत गिझनी येथें प्रथमतः अलप्तगीन नामक तुर्की गुलाम पुरुषानें राज्य स्थापिलें. तो इ०स०९७६ त मेल्यावर त्याची गादी सबक्तगीन ह्यास मिळाली. त्यावर लाहोरचा राजा ज्यपाळ हा सिंधुनद उतरून सैन्यासहवर्तमान स्वारीस गेला; परंतु तोच पराभव पावून, व सबक्तगीन ह्यास खंडणी देण्याचें कबूल

१ इंदूरच्या ईशान्येस आहे. २ तैलंगण, दक्षिणहिंदुस्थानाच्या पूर्वभागीं.

करून माघारा आला. ती खंडणी मागावयास लोक आले, त्यांस ती
न देतां त्यानें उलटें कैद करून ठेविलें. हें सबक्तगीन ह्यास सहन न
होऊन, तो सैन्यासहवर्तमान जयपाळाचा सूड उगविण्यास सिंधु उत-
रून आलीकडे प्राप्त झाला. त्याशीं लढण्याकरितां १,००,००० सैन्य
बरोबर घेऊन जयपाळ उभा राहिला; परंतु त्यास पूर्वीप्रमाणेंच अपेश
आलें. त्याचें पुष्कळ सैन्य शत्रूंनीं मारिलें; आणि नीलाब ह्मणजे सिंधु-
नदाच्या वरचा प्रदेश सबक्तगीनानें आपले राज्यास जोडून, तेथें अंमल
बसविण्याकरितां १,००,००० स्वारांनिशीं एक सुभेदार पाठविला.

वीस वर्षें राज्याचा उपभोग घेऊन सबक्तगीन इ० स० ९९७ त
मरण पावला. नंतर त्याचा पुत्र सुलतान महमूद हा त्याचे गादीवर
बसला. तेव्हां तो सोळा वर्षांचा होता. तो दिसण्यांत कुरूप होता.
त्याला मोठें राज्य मिळविण्याची इच्छा फार असे. त्यानें हिंदुस्थाना-
वर एकंदर सतरा स्वाऱ्या केल्या. त्यांपैकीं पहिली स्वारी इ०स० १००१
ह्या वर्षी झाली; आणि शेवटची, इ० स० १०२४ त सोरटीसोमना-
थावर झाली. ह्या देवस्थानाचें रक्षण करण्याविषयीं पुष्कळ हिंदु रा-
जांनीं यत्न केले; परंतु ते सगळे व्यर्थ गेले. महमुदानें देवालयांत घुसून
मूर्ति फोडिल्या, देवांचें सर्व द्रव्य घेतलें, आणिं सर्व प्रजेस लुटिलें. ह्या खेपे-
स गिझनीकडे परत जातांना मार्गांत त्याच्या सैन्यास फार हाल भोगावे
लागून, त्यांतले पुष्कळ लोक प्राणासही मुकले. हा राजा ३४ वर्षें राज्य
करून, ६३ वर्षांचा होऊन, इ० स० १०३० च्या एप्रिल महिन्याच्या
२९ व्या तारखेस मरण पावला. तो प्रामाणिक, दयाळू आणि विद्वा-
नांचा पक्षपाती होता. फर्दूसी हा एक मोठा कवि त्याचे पदरीं होता.
ह्याचे वंशास गजनवी वंश ह्मणतात.

गजनवी कुळांतला शेवटचा राजा खुसरू मलिक ह्यास, इ० स०
११८६ ह्या वर्षी महमद गोरी नांवाच्या पुरुषानें पदच्युत करून त्याचें
राज्य बळकाविलें. त्या महमद गोरीनें हिंदुस्थानावर पहिली स्वारी इ०
स० ११९१ त केली. तेव्हां, अजमीरचा चव्हाण रजपूत राजा पृथ्वीराज
ह्यानें पाणिपत येथें त्याशीं युद्ध करून त्याचा अगदीं पराभव करून
टाकिला. पुढें इ० स० ११९२ त दुसऱ्या स्वारीचे वेळीं पुनः स्थाने-

१. अरबी समुद्राच्या किनाऱ्यावर गुजराथेच्या दक्षिणेस.
२. दिल्लीच्या उत्तरेस यमुनेच्या कांठीं.
३. हें ठिकाण पाणिपताच्या जवळ आहे.

श्वर येथें उभय पक्षांची मोठी लढाई झाली. तींत पृथ्वीराज पराभव पावून शत्रूच्या हातीं सांपडला. त्यास त्यानें ठार मारिलें. पहिल्या प्रसंगीं रजपूत राजे एकचित्त होते, तेणेंकरून त्यांस यश आलें; आणि दुसऱ्या प्रसंगीं त्यांच्यांत कलह लागले होते, त्यामुळें ते पराभव पावले. महमद गोरी ह्यानें जे प्रांत घेतले, ते, आपला सरदार कुतुबुद्दीन म्हणजे जो पूर्वी गुलाम होता, त्याच्या स्वाधीन केले. महमद गोरी आपल्या देशास परत गेला; परंतु कुतुबुद्दीनानें हिंदुस्थानांत राहून दिल्ली येथें आपली गादी स्थापिली.

महमद गोरी इ० स० १२०६ ह्या वर्षी वारल्यावर महमूद नांवाचा बादशाहा गिझनीचे गादीवर बसला; त्यानें कुतुबुद्दीनास दिल्लीचा बादशाहा हा किताब दिला. तेव्हां, कुतुबुद्दीन हा दिल्लीच्या गुलाम राजवंशाचा मूळपुरुष होय. ह्याच्या मागून ह्याच्या गादीवर आराम, अल्तमश, रुकनुद्दीन, रझिया ( बादशाहीण ), मोइजुद्दीन, अल्लाउद्दीन मसाऊद, नासिरुद्दीन महमूद, बलबन, आणि कैकोबाद हीं एका मागून एक अशा क्रमानें बसलीं. ह्या वंशाची कारकीर्द इ० स० १२०६पासून इ० स० १२८८ पर्यंत झाली. त्यामध्यें अलतमश व त्याची कन्या रझिया हीं फार पराक्रमी होतीं. बलबन हा अत्यंत क्रूर होता. त्यानें दिल्लीच्या दक्षिणेकडचे एक लक्ष रजपूत लोक ठार मारून त्यांचें बंड मोडिलें.

ह्या गुलाम राजांतला शेवटचा राजा कैकोबाद ह्यास दुर्व्यसनाचा फार नाद लगला; तेणेंकरून त्याच्या दरबारांत बखेडे उत्पन्न झाले. तेव्हां त्याच्या गिलची म्हणजे खिलजी फौजेनें त्यास ठार मारून, आपला सरदार जलालुद्दीन ह्यास इ० स० १२८८ ह्या वर्षी गादीवर बसविलें. तेव्हां तो ७० वर्षांचा होता. ह्यास व ह्याचे वंशजांस खिलजी राजे असें नांव पडलें. ह्या कुळांतले तीन पुरुष दिल्लीच्या गादीवर बसले. १ जलालुद्दीन, २ अल्लाउद्दीन, आणि ३ मुबारिक. जलालुद्दीन गादीवर असतां, त्याचा पुतण्या अल्लाउद्दीन ह्यानें इ० स० १२९४ त, ८००० लोकांसहवर्तमान दक्षिणेंत स्वारी करून, दौलताबादच्या रामदेवराव राजाशीं लढून, त्यापासून खंडणीबद्दल पुष्कळ पैसा घेतला. नंतर तो आपला चुलता जलालुद्दीन ह्यास सुहृज भेटण्याचे मिषानें त्याजकडे गेला. त्यांचें बोलणें चाललें होतें इतक्यांत, अल्लाउद्दीनाच्या लोकांनीं

जलालुद्दीनास ठार केलें. ही गोष्ट तारीख १२ जुलै स० १२९५ रोजीं घड-
ली. नंतर अल्लाउद्दीन राजपद पावला. इ० स० १२९८ त २,००,०००
मोंगल सैन्य हिंदुस्थानावर आलें, त्याचा त्यानें पराभव केला; व पुढें गुज-
राथ प्रांत त्यानें घेतला. त्याचें सैन्य दक्षिणेंत होतें, त्याचा पराभव रामदे-
वरावाचा जांवई हरपाळदेव ह्यानें केला, आणि त्यास हुसकून लाविलें. अ-
ल्लाउद्दीन इ० स० १३१६ त मरण पावला. नंतर त्याचा पुत्र मुबारिक हा
गादीवर बसला. तो प्रथम बरा होता; परंतु पुढें तो दारूच्या, व स्त्रीवेष-
धारण करून वेश्यांबरोबर नाचण्याच्या छंदास लागून अगदीं बिघडला.
तेव्हां इ० स० १३२० त त्याचा वजीर खुपरू ह्यानें कुटुंबासुद्धां त्यास ठार
मारिलें. अशा प्रकारें खिलजी वंशाकडे सुमारें बत्तीस वर्षे राजपद राहून,
त्याचा शेवट झाला. नंतर त्याची गादी खुपरू ह्यानें बळकाविली. त्याला,
इ० स० १३२० त ग्यासुद्दीनतघलखनामक दुसऱ्या एका सरदारानें
मारून त्याचें राज्य घेतलें. त्यास व त्याचें वंशजांस तघलखराजे ह्मणतात.

हा ग्यासुद्दीनतघलख इ० स० १३२४ त मरण पावल्यानंतर त्या-
चा मुलगा महमदतघलख हा राजा त्याचे गादीवर बसला. तो शिक-
लेला चांगला असून मोठा चतुर योद्धा होता. परंतु, तो स्वभावानें
विलक्षण असे. त्यानें दिल्ली राजधानी मोडून दौलताबाद ही राजधानी
करण्याचा दोन वेळां सक्त प्रयत्न केला; परंतु तो व्यर्थ गेला. ह्यानें
चीन देशावरही एकदां सैन्य पाठविलें होतें. तें अपजय पावून माघारें
आलें. इ० स० १३४७ ह्या वर्षी, महमदाचे गुजराथेंतील सरदार बं-
डावून दक्षिणेंत आले. त्यांचा मुख्य पुढारी प्रथमतः इस्मायेलखान हा
होता; परंतु तो अधिकार त्यानें आपले खुषीनें हुसेनकांगो ब्राह्मणी
ह्या नांवाच्या दुसऱ्या एका मुसलमानास दिला. त्यानें दक्षिणप्रांत जिं-
कून घेऊन तेथें राज्य स्थापिलें. ह्यास व ह्याच्या वंशजांस ब्राह्मणी राजे
असें नांव पडलें. महमद तघलख ह्यास पैशाची पंचाईत पडली तेव्हां
त्यानें तांब्याचें नाणें रुप्याच्या किमतीनें चालविण्याचा प्रयत्न केला.
तो व्यर्थ गेला. खुद्द त्याच्या एका पुतण्यानें बंड उभारलें होतें, ह्मणून
त्यानें, जीवंतपणीं, त्याच्या आंगाचें कातडें काढविलें. शिवाय, त्याच्या
राज्यांत पुष्कळ बखेडे झाले. हा आपल्या करमणुकीकरितां माणसें
ठार मारीत असे. महमद तघलख इ० स० १३५१ त मरण पावला.

महमद तघलखाच्या मागून त्याचा दुसरा पुतण्या फिरूज तघलख हा त्याच्या गादीवर बसला. त्यानें ३७ वर्षे राज्य केलें. तो मोठा उदार आणि प्रजेचें हित पाहाणारा होता. त्यानें लोकोपयोगार्थ जीं कामें केलीं, त्यांत यमुना नदीवरचा कालवा प्रसिद्ध होय. तो इंग्रज सरकारानें नीट करून पुन: चालू केला आहे. हा राजा इ० स० १३८८ त मरण पावला.

फिरूज तघलख ह्याचा नातू महमुद तघलख दिल्लीच्या गादीवर असतां, तार्तरीदेशचा बलिष्ठ सरदार तैमूरलंग हा बरोबर प्रचंड सेना घेऊन दिल्लीवर आला, आणि ता० १७ दिसेंबर स० १३९८ इ० रोजीं त्यानें तें शहर घेतलें, आंतील लोकांची कत्तल उडविली, व आपण हिंदुस्थानचे बादशाहा आहों, अशी चोहींकडे द्वाही फिरविली. महमुद गुजराथेंत पळून गेला. तैमूरलंग १५ दिवस दिल्ली शहरांत राहून नंतर स्वदेशाकडे चालता झाला. त्यानें इकडून द्रव्य किती नेलें ह्याची गणती नाहीं; परंतु लुटीमध्यें १२० हत्ती, २२ गेंडे, व दुसरे कितीएक एतद्देशीय प्राणी तो बरोबर घेऊन गेला, असें एके जागीं लिहिलें आहे.

तैमूरलंग गेल्यावर महमुदानें गुजराथेंतून येऊन पुन: आपली गादी मिळविली. तो इ० १४१२ त मृत्यु पावला. नंतर १५ महिने पावेतों दौलतखान लोदी नांवाच्या सरदारानें राज्य केलें. त्यास इ० स० १४१४ ह्या वर्षीं पंजाबचा सुभेदार खिजरखान ह्यानें काढून दिलें. खिजरखानाचे मागून त्याचे गादीवर त्याचा मुलगा मुबारिक, नातू महमद, आणि पणतू अल्लाउद्दीन हे बसले. त्यांस सय्यद राजे ह्मणत. अल्लाउद्दीनाला त्याचें राज्य चालवितां येईना, ह्मणून त्यानें तें इ० स० १४५० ह्या वर्षीं बहिलोलखान लोदी नांवाच्या सरदाराच्या स्वाधीन केलें. तेव्हां तो बादशाहा झाला. हा लोदी बादशाहांचा मूळपुरुष होय.

बहिलोलखानानें पंजाब प्रांत जिंकिला. हा बादशाहा सुमारें ३८ वर्षे राज्य करून इ० स० १४८८ त वारला. नंतर त्याचा मुलगा शिकंदर लोदी गादीवर बसला. तो जात्या कवि असून विद्वानांचा पक्षपाती असे. तो २८ वर्षे राज्याचा उपभोग घेऊन, इ०स० १५१७ त आग्रा येथें मरण पावला. नंतर त्याचा मुलगा इब्राहिम राज्य करीत असतां,

तैमूरलंगाचा वंशज बाबर हा काबुलांत राज्य करीत होता, तो अल्ला-उद्दीननामक आपल्या सरदारासहवर्तमान १०,००० सैन्य बरोबर घेऊन, इ० स० १५२४ त हिंदुस्थानावर आला. त्याची आणि इब्राहिमाची लढाई तारीख २१ एप्रिल सन १५२६ रोजीं पाणिपताजवळ झाली. तींत इब्राहिम पराभव पावून पडला. ही लढाई पाणिपतची पहिली लढाई ह्मणून प्रसिद्ध आहे. ह्या प्रसंगीं उभयपक्षांकडचे पुष्कळ लोक मेले, आणि बाबर दिल्लीपति झाला. ह्यास व ह्याचे मागें जे बादशाहा त्याचे गादीवर होऊन गेले, त्यांस मोंगल बादशाहा असें नांव पडलें.

मागें ब्राह्मणी राज्य दक्षिणेंत स्थापित झालें ह्मणून सांगितलें, तें ह्याच सुमारास मोडून त्याचे पांच तुकडे झाले. १, विजापुरचें अदिलशाई; २, गोंवळकोंड्याचें कुतुबशाई; ३, वऱ्हाडांतलें अमादशाई; ४, अहमदनगरचें निजामशाई; आणि ५, वेदरचें बरीदशाई. ह्यांपैकीं वऱ्हाड व वेदर येथील राज्यें लवकरच लयास गेलीं. बाकीचीं तीन पुढें बरींच वर्षे चाललीं होतीं.

## भाग चवथा.

### मोंगल बादशाहा.

#### इ० स० १५२६ पासून १८५७ पर्यंत.

बाबर हा हिंदुस्थानांतला पहिला मोंगल बादशाहा होय. त्यानें स्वपराक्रमानें धोलपुर, ग्वाल्हेर, बहार, इत्यादि प्रांत घेतले, व त्याचा पुत्र हुमायून ह्यानें जवानपुर काबीज केलें. शिवाय त्यानें काबूलचें राज्य मिळविलें. मेवाडचा संगराणा हा बाबरास शत्रु उत्पन्न झाला होता. त्या उभयतांची मोठी लढाई शिक्री[१] येथें इ० स० १५२७ ह्या वर्षी झाली. तेव्हां संगाचा पराभव झाला. ह्याच्या पुढच्या वर्षी बाबराच्या सैन्यानें चंदेरी[२] घेतली. हा बादशाहा इ० स० १५३० ह्या वर्षी आग्रा येथें मरण पावला. तो मोठा रसिक आणि मर्मज्ञ ग्रंथकार होता.

त्याचे मागें त्याचा पुत्र हुमायून हा गादीवर बसला. ह्यानें गुजरा-

---

१ दिल्लीच्या उत्तरेस यमुनेच्या कांठीं. २. दिल्लीच्या दक्षिणेस १९ कोसांवर.

थेवर स्वारी करून तेथील राजाचा पराभव केला. त्याला शीरशाह हा बंगालचा अफगाण सुभेदार शत्रु उत्पन्न होऊन, त्यानें त्यास इ० स० १५३९ ह्या वर्षी राज्यपद सोडून पळायास लाविलें. तो पळत असतां, मार्गांत, अमरकोट येथें, त्यास इ० स० १५४२ त अकबर हा पुत्र झाला. हुमायून इराणांत पळून गेला; आणि तेथील नानाकत शाहा तामस्प ह्याचा आश्रय धरून राहिला. इकडे शीरशाहानें कालिंजरास वेढा घातला. तेथें तो तोफेच्या गोळ्यानें भाजून इ०स०१५४५ च्या मे महिन्यांत मरण पावला. त्यानें प्रजेच्या सोईकरितां सडका व विहिरी बांधिल्या. ह्यास व ह्याचे वंशजांस शूर बादशाहा असें ह्मणतात.

शीरशाहाचे मागें सलीम, महम्मदशाहा, इब्राहीम व शिकंदर हे त्याचे वंशज गादीवर बसले. ह्यांतला अजागळ आणि जुलमी शिकंदर हा गादीवर असतां, इ० स० १५५६ ह्या वर्षी हुमायून, आपल्या अकबर ह्या पुत्रासहवर्तमान, मोठें सैन्य घेऊन आला, आणि पाणिपत येथें शत्रूचा पराभव करून, त्यानें आग्रा व दिल्ली हीं शहरें घेतलीं. ह्या लढाईत अकबरानें मोठा पराक्रम केला. ही लढाई पाणिपतची दुसरी लढाई ह्मणून प्रसिद्ध आहे. ह्या लढाईनंतर थोडक्याच दिवसांनीं हुमायून हा जिन्यावरून पडून मरण पावला. तेव्हां तो ५१ वर्षांचा होता. हुमायुनाचे मागें त्याचा पुत्र अकबर गादीवर बसला.

अकबर, हा गादीवर बसला तेव्हां केवळ १३ वर्षांचा होता. म्हणून राज्याचा कारभार, हुमायुनाचा विश्वासू सरदार बहिराम हा पाहूं लागला. तो बादशाहास विचारिल्यावांचून पाहिजे तें करी, व त्यास जुमानीत नसे. हा आपमान अकबरास न साहून त्यानें त्याला कारभारांतून काढून टाकिलें. तेव्हां बहिरामानें रागावून बंड केलें; परंतु तें अकबरानें तेव्हांच मोडिलें. शेवटीं इ० स० १५६० ह्या वर्षी तो सरदार निराश होऊन मक्केस जात असतां, त्यानें पूर्वी लढाईत मारलेल्या एका अफगाणाच्या मुलानें त्याचा प्राण घेतला.

इ० स० १५६७ पासून १५७३ पर्यंत अकबरानें अजमीर, ग्वाल्हेर, काश्मीर, लखनौ, रतनबोर, कलंजर गुजराथचें राज्य, जयपुरचें राज्य, हीं घेतलीं. त्यानें जयपुरचा राजा बहारमल ह्याचे कन्येशीं लग्न केलें. ह्या बादशाहाचे वेळीं ह्याचा भाऊ हकीम व अफगाण

लोक, ह्यांनीं बंड केलीं होतीं, तीं ह्यानें मोडलीं. त्यानें जुलूम नाहींसा केला; व ज्ञातिमत्सर मनांत न आणितां हिंदु लोकांस मोठमोठीं कामें सांगितलीं. अहमदनगराच्या दरबारांत कलह लगल्याचें कळल्यावरून, इ०स० १५९५ ह्या वर्षी, अकबराचा दुसरा मुलगा मुराद ह्यानें त्या शहरास वेढा घालून तें घेण्याचा प्रयत्न केला. परंतु, तेथील अल्पवयस्क सुलतानाची आत, प्रसिद्ध चांदबिबी हिनें, सैन्याचा अधिकार आपणाकडे घेऊन, अशा शौर्यानें शहराचें रक्षण केलें कीं, मुराद ह्यास वेढा उठवून जाणें भाग पडलें. पुढें इ० स० १६०० ह्या वर्षी अहमदनगर आणि त्याच्या पुढच्या वर्षी खानदेश हीं घेऊन, त्यांजवर आपला पुत्र दानियल ह्यास अकबरानें सुभेदार नेमिलें. त्यानें आग्रा, अटक व अलाहाबाद येथील किल्ले बांधिले, व फत्तेपुर हें शहर वसविलें. ह्याच्या राज्याचे एकंदर सुभे अठरा केले होते; व ह्याचे मुलुखांत ४४,००,००० शिबंदी व २,००,००० स्वार असत. ह्याच्या राज्याचें एकंदर उत्पन्न ४२ कोटि रुपयांचें होतें; आणि लोकसंख्या पंधरा कोटींहून कांहीं अधिक होती. ह्याच्या राज्याच्या जमाबंदीचें आणि वसुलाचें काम राजा तोडरमल ह्या नांवाच्या एका बुद्धिमान् हिंदूकडे होतें. अकबराच्या राज्यांत शेतकऱ्यापासून सगळ्या उत्पन्नाचा तिसरा हिसा सरकारदस्त ह्मणून घेत असत. अकबर इ० स० १६०५ च्या अक्तोबर महिन्यांत ६३ वर्षांचा होऊन आग्रा येथें मरण पावला. त्याची उत्कृष्ट कबर शिकंदरा येथें आहे. त्यास विद्येची अभिरुचि होती. त्याला थोडें संस्कृतही कळत असे. अकबराचे मागें त्याचा पुत्र सलीम हा गादीवर बसला.

सलीम हा, जहांगीर ह्मणजे जग जिंकणारा, असें नांव आपणास घेऊन राज्य हांकूं लागला. त्याच्या पुढच्याच वर्षी त्याचा पुत्र खुशरू ह्यानें बंड केलें, तें मोडून त्याला त्यानें कैदेंत घातलें. पुढें इ० स० १६१० त, मलिकंबर ह्यानें अहमदनगरचें राज्य मोंगलांच्या हातून सोडवून स्वतंत्र केलें होतें, तें पुनः ह्या बादशहानें आपल्या सत्तेखालीं आणिलें. त्यानें नूरजहान नामक एका सुंदर स्त्रीशीं लग्न केलें. पुढें मोहबतखान ह्मणून जो त्याचा सरदार होता, त्यानें बंड करून, इ० स० १६२६ ह्या वर्षी झेलम नदीवर बादशहास धरून कैदेंत घातलें.

त्यास नूरजहान हिनें स्वतः लढाई मारून सोडविलें. जहांगिरानें अनेक लढाया जिंकिल्या, व पुष्कळ मुलूख स्वसत्तेखालीं आणिला. ह्याचे दरबारीं कप्तान हाकिन्स आणि मग इ० स० १६१४ ह्यीं वर्षी सर टामस रो हे इंग्लिश राजाचे वकील आले होते. हा बादशहा, काश्मिराहून लाहोरास येत असतां, वाटेंत दम्याच्या उपद्रवानें, इ० स० १६२७ च्या आक्तोबरमहिन्यांत मरण पावला. तेव्हां तो ६० वर्षांचा होता. ह्याचे कारकीर्दींत आशियाखंडामध्यें तंबाखूचा प्रचार प्रथमतः चालू झाला. इ० स० १६२७ तच मराठी राज्याची स्थापना करणाऱ्या शिवाजी राजा जन्मला.

जहांगीर मरण पावल्यावर त्याचा पुत्र शहाजहान हा बादशहा झाला. ह्यानें बाप जीवंत असतांच बंड केलें होतें. त्यानें दक्षिणेंत स्वारी करून, आपलें वर्चस्व गोवळकोंडें, विजापुर आणि अहमदनगर येथील राजांकडून कबूल करविलें. त्या स्वारीमुळें देशांत धुमाळी होऊन, इ० स० १६२९ व १६३० ह्या दोन वर्षांत भयंकर दुष्काळ पडला. त्याच्या योगानें कितीएक प्रदेश बेचिराख झाले. पोर्तुगीज लोकांची एक मोठी वखार बरेच दिवसांपासून चितगांव येथें होती; ते लोक लबाड आहेत, असें बादशहास वाटल्यावरून त्यानें त्यांस तेथून इ० स० १६३१ त हांकून लाविलें. ह्याच्या वेळेपर्यंत अफगाणिस्थानांत मोंगल बादशहाचा अंमल कांहीं प्रांतांवर होता. ते प्रांत इ० स० १६३७ त ह्याच्या हातून गेले. शहाजहानानें आपले पुत्र दारा, सुजा, औरंगजेब आणि मुराद ह्यांजवर फार विश्वास ठेविल्यामुळें त्यांस बंडें करण्यास सहज फावलें. त्यांपासून बादशहास फारच त्रास झाला. औरंगजेब हा अत्यंत कपटी होता. त्यानें आपल्या इतर बंधूंस हतवीर्य करून, बापास कैदेंत टाकून, आणि अलमगीर असें नवें नांव घेऊन, इ० स० १६५८ ह्या वर्षी सिंहासन बळकाविलें.

शहाजहानास इमारतींचा फार षोक असे. मूमताजमहाल ह्मणून एक त्याची राणी होती, तिची कबर त्यानें बांधिली, तिलाच सांप्रत ताजमहाल ह्मणतात. ही अनुपम इमारत आग्रा शहरांत यमुनेच्या कांठीं आहे. ही तयार करण्यास २०,००० मनुष्यें २२ वर्षे खपत होतीं, व हीस ३,१७,४८,०२६ रुपये खर्च लागला, असें एके ग्रं-

थांत लिहिलें आहे. शिवाय, आग्र्याच्या किल्ल्यामध्यें मोतीमशीद ही एक फार उत्तम इमारत त्यानें बांधिली: शहाजहानानें आपणास बसण्याकरिता रत्नखचित मयूरासन केलें. त्यास साडेसाहा कोट रुपये लागले. शिवाय त्याजपाशीं बहुमोल दागिने अनेक होते, व २४ कोट रुपये रोख शिलक होते. तो आपल्या वयाच्या ७४ व्या वर्षीं, इ०स० १६६६ च्या अखेरीस आग्रा येथें मरण पावला.

गादीवर बसतांच औरंगजेबानें प्रथमत: आपले भावांस नाहींतसें केलें. नंतर त्यानें, शिवाजी राजा दक्षिणेंत धुंडावा करीत होता, त्याजवर सरदार शाहिस्तेखान व पुत्र मोअजीम ह्यांस मोठ्या सैन्यासहवर्तमान पाठविलें; परंतु त्यापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. इ० स० १६७६ त सतनरामी ह्या जातीच्या बैराग्यांनीं बंड केलें होतें. तें औरंगजेबानें मोडिलें. इ० स० १६८० त शिवाजी मरण पावला, आणि त्याचा पुत्र संभाजी हा त्याचे गादीवर बसला.

औरंगजेबानें दक्षिणेंत स्वारी करून, इ० स० १६८६ ह्या वर्षीं विजापुरचें राज्य घेतलें, त्याच्या पुढच्या वर्षीं गोंवळकोंड्याचें घेतलें, आणि इ० स० १७०० त सातारा घेतला. तेणेंकरून त्याला पुष्कळ मुलख मिळाला. त्याचें राज्य फार वाढलें. मराठे बळावत चालले, आणि त्याचें राज्य त्याला आंवरेनासें झालें. ह्याच वेळेच्या सुमारास इंग्लिश व्यापाऱ्यांनीं बादशहास दीड लक्ष रुपये नजराणा देऊन देशांत व्यापार करण्याची परवानगी मिळविली.

औरंगजेब इ०स० १७०७ च्या फेब्रुवारी महिन्याच्या एकविसाव्या तारखेस अहमदनगर येथें मरण पावला. तेव्हां तो ८९ वर्षांचा होता. तेव्हां त्याच्या राज्याचें एकंदर उत्पन्न सत्याहात्तर कोटींचें होतें. त्याचे हातून पुष्कळ क्रूर कर्मं घडलीं होतीं, त्यांची आठवण त्यास मरतेवेळीं होऊन त्यास फार पश्चात्ताप झाला. तो मोठा स्वधर्माभिमानी असे. रजपुत लोकांनीं मुसलमानी धर्म स्वीकारावा ह्मणून त्यानें त्यांजवर कर बसवून व जुलूम करूनही पाहिलें; परंतु तें सगळें फुकट गेलें. त्या लोकांनीं बंड केलें, त्यापासून त्याला त्रास मात्र फार भोगावा लागला.

औरंगजेबाचे मागें त्याचा पुत्र मोअजीम उर्फ बाहादुरशाहा ह्यानें झुलफिकारखान नामक सरदाराच्या साह्यानें राज्य घेतलें. ह्याचे वेळीं,

संभाजीचा पुत्र शिवाजी जो औरंगजेबानें कैदेंत ठेविला होता, तो सुटला. आणि मराठे व रजपुत ह्यांचें प्राबल्य वाढलें. कामबक्ष, औरंगजेबाचा तिसरा मुलगा, हा दक्षिणेंत अमल करीत होता, तो बहादुरशाहाचें ऐकेना, ह्मणून त्यानें त्याजवर स्वारी केली. त्यांचें युद्ध चाललें असतां कामबक्ष मरण पावला. इ० स० १६९८ पासून शीक लोकांचें बंड राज्यांत माजलें होतें, तें बाहादुरशाहानें मोडिलें. याच्या कारकीर्दींत इ० स० १७०९ त रजपुत लोकांनीं आपलें स्वातंत्र्य पुनः मिळविलें. तो इ० स० १७१२ त, ७१ वर्षांचा होऊन लाहोर येथें मरण पावला. ह्यास पहिला शाहाआलम ह्मणतात.

बाहादुरशाहा निवर्तल्यावर, पुष्कळ बखेडे होऊन शेवटीं त्याचा मुलगा जाहांदरशाहा हा गादीवर बसला. ह्यालाही सगळा आधार झुलपिकारखानाचाच होता. ह्याचा पुतण्या फिरुकशीर बंगाल्यांत होता, त्यानें बंड करून, आग्र्याजवळ बादशहाचा पराभव केला, आणि त्यास व त्याचा वजीर झुलपिकारखान ह्यास दिल्ली येथें ठार मारिलें. नंतर, इ० स० १७१३ ह्या वर्षी फिरुकशीर हा हुसेनअल्ली आणि अबदुल्लाखान ह्या सय्यद बंधूंच्या साह्यानें तक्तावर बसला. ह्यानें मारवाडचा राजा अजितशिंग ह्याच्या मुलीशीं आपलें लग्न केलें. तें होण्यापूर्वी तो आजारी पडला असतां, त्यास गाब्रील हामिल्तन ह्या नांवाच्या एका स्काच वैद्यानें बरें केलें. त्याबद्दल, त्याच्या मागण्यावरून, बादशाहानें, बंगाल्यांतील ३७ गांवांची जमीनदारी आणि इंग्लिशांच्या व्यापाराच्या मालावरील जकातीची माफी, ह्या दोन गोष्टी ईस्तइंदिआकंपनीस संतोषानें दिल्या. त्या बंधूंचें व बादशहाचें पुढें कांहीं गोष्टीवरून वैमनस्य पडलें. तेव्हां हुसेनअल्लीनें दक्षिणेंतून बाळाजी विश्वनाथ पेशवे ह्यांजकडून १०,००० मराठे लोक आणून, त्यांचे साह्यानें फिरुकशीर ह्यास पदच्युत करून इ० स० १७१९ त ठार मारिलें.

सय्यद बंधूंनीं, फिरुकशिराचे गादीवर प्रथमतः रफिउद्दर्जात व नंतर रफिउद्दवला हे अज्ञान बादशाहा बसविले, व सर्व राज्यकारभार आपण चालविला. पुढें इ० स० १७२० त हुसेनअल्ली मारला गेला, व दुसरा कामावरून दूर झाला. तेव्हां महमदशाहा नामक बादशाहा गादीवर होता. त्यानें असोफजा हा सरदार दक्षिणेच्या सुभ्यावर पाठ-

विला. इ० स० १७३७ ह्या वर्षी बाजीराव बल्लाळ पेशवे ह्यांनीं दिल्लीवर स्वारी केली. त्याचें व असोफजाचें मोठें युद्ध भोपाळ शहराजवळ होऊन असोफजा पराभव पावला; आणि त्यानें, नर्मदा व चंबळा ह्या नद्यांमधला मुलूख व ५०,००,००० रुपये, बादशाहाकडून पेशव्यांस देवविण्याविषयीं कबूल केलें.

इतक्यांत, इ० स० १७३९ मध्यें, इराण देशचा बादशाह नादीरशाहा ह्यानें दिल्लीवर स्वारी करून बादशाहाचा पराभव करून तें शहर घेतलें. महमदशाहाही त्याचे स्वाधीन झाला. नादीरशाहा मेला, अशी खोटी बातमी मोंगलांच्या सैन्यानें उठविल्यावरून, त्यास फार क्रोध आला; आणि त्यामुळें ३०,००० मोंगल लोक प्राणांस मुकले. इराणच्या बादशाहानें, बहुमोल मयूरासन, व ८।९ कोटि रुपयांची लूट मिळविली; महमदशाहास पुनः गादीवर बसविलें; आणि दिल्लीच्या एका राजकन्येशीं आपल्या मुलाचें लग्न लावून दिलें. नंतर पुष्कळ हत्ती, उंटें, व शेंकडों कारागीर लोक बरोबर घेऊन तो स्वदेशीं गेला. पुढें त्याचा सरदार अहमदशाहा दुराणी ह्यानें इ० स० १७४७ त हिंदुस्थानाकडे चाल केली होती; परंतु त्याचा पराभव महमदशाहाच्या फौजेनें केला, तेव्हां तो मागें हटला. ह्या गडबडींत महमदशाहा असतां दक्षिणेंत असोफजा ( निजाम उल्मुलुख ) स्वतंत्र राजा झाला. त्याप्रमाणेंच अयोध्याप्रांताचा सुभेदार सादतखान आपणास स्वतंत्र राजा ह्मणवूं लागला. आणि माळव्यांत मराठ्यांचें प्राबल्य वाढलें. हा महमदशाहा इ० स० १७४८ त मरण पावला.

पुढें इ० स० १७४८ पासून १७५४ पर्यंत अहमदशाहा; इ० स० १७५४ पासून १७५९ पर्यंत दुसरा अलमगीर; इ० स० १७५९ पासून १८०६ पर्यंत दुसरा शाहाअलम; आणि इ० स० १८०६ पासून १८३७ पर्यंत दुसरा अकबर; असे नामधारी बादशाहा दिल्लीच्या सिंहासनावर बसून, शेवटीं तें सिंहासन इ० स० १८३७ त महमद बाहादुरशाहा ह्यास प्राप्त झालें. तो इ० स० १८५७ च्या शिपायांच्या बंडांत सामील असल्याची शाबिती झाल्यावरून, इंग्लिश सरकारानें त्यास रंगून येथें काळे पाण्यावर पाठविलें; आणि त्याच बंडाच्या गर्दींत त्याचे मुलगे आणि नातू मारले गेले. तो महमदबाहादुरशाह रंगून येथें इ० स० १८६२ त मरण पावला. अशा प्रकारें करून मोंगल बादशाहांच्या वंशाचा शेवट झाला.

# भाग पांचवा.

## मराठ्यांविषयीं.

### इ० स० १६२७ पासून इ० स० १७०८ पर्यंत.

मराठे लोक प्रथमतः विजापुरच्या राज्यांत उदयास आले. त्यांत चंद्रराव मोरे, राव नाईक निंबाळकर ह्मणजे फलटणराव, झुंझारराव घाटगे, रावमोरे घोरपडे, डफळे, सांवत बहादूर, हे प्रख्यात झाले. तसेच अहमदनगरच्या राज्यांत जाधवराव व भोंसले हे नामांकित होते. जाधवरावाला निजामशाई सरकारांतून १०,०००. स्वारांची मनसब होती.

मराठी राज्याची स्थापना करणारा शिवाजी राजा भोंसला, ह्याचा पणजा बाबाजी भोंसला, हा उदेपुरच्या राण्याचा पुत्र होता. तो खानदेशांतील एका राजाच्या नोकरीस राहून वाढत वाढत, पुण्याजवळ जमीनदार झाला. त्याचा मुलगा मालोजी. त्याचे पोटीं शाहाजी भोंसला जन्मला. त्यास जाधवरावाची कन्या जिजाबाई ही दिली. ही शिवाजीची आई. शिवाजी, इ० स० १६२७ त शिवनेरी किल्ल्यामध्यें जन्मला. त्याचा बाप विजापुरकरांचे चाकरीस होता, ह्मणून त्याला कर्नाटकांत राहावें लागे. शिवाजी, दादोजी कोंडदेव नामक एका ब्राह्मणाच्या शिक्षेंत, आपलें जमीनदारीचें गांव पुणें येथें राहत असे. त्याला लिहिणें वाचणें कांहीं येत नव्हतें. दांडपट्टा वगैरे शिपायगिरीचीं कामें मात्र त्यास शिकविलीं होतीं.

त्यानें आपले वयाचे १७ व्या वर्षी विजापुर सरकारचा तोरणा किल्ला लढून घेतला. त्याजवळ एके जागीं त्याला पुष्कळ द्रव्य सांपडलें. तें खर्चून त्यानें रायगड किल्ला बांधिला. दादोजी कोंडदेव मेल्यावर, शिवाजी, आपल्या बापाची जमीनदारी स्वतः वहिवाटूं लागला. त्यानें फारच पुंडाई माजविली, तेव्हां त्यास ताळ्यावर आणण्याकरितां विजापुरकारांनीं शाहाजीस कैदेंत घातलें; तेव्हां शिवाजीनें दिल्लीच्या शहाजहान बादशाहास शरण जाऊन, त्याच्या तंत्रानें आपले बापास मुक्त करविलें. नंतर शिवाजीच्या पारिपत्यास विजापुरकारांनीं अफझुलखान नामक सरदार इ० स० १६५९ त पाठविला. त्याशीं अति नम्रपणानें एकांत करण्याचा घाट आणून, शिवाजीनें त्याचे पोटांत वाघनखें खुपसून त्याचा प्राण घेतला. तेव्हां अर्थात् त्याच्या फौजेचा

मोड करण्यास त्यास अगदीं सोपें पडलें. इतक्यांत विजापुरचे दरबारांत दुफळी झाली; तेणेंकरून शिवाजीला स्वार्थ साधण्यास चांगलें फावलें. शेवटीं त्यास ५०,००० पायदळ व ७०,००२ स्वार इतकें सैन्य ठेवण्याविषयीं सरकारांतून परवानगी मिळाली.

पुढें शिवाजी दिल्लीचा बादशाहा औरंगजेब ह्याचे मुलुखांत लूट करूं लागला. तेव्हां षाहिस्तेखान सरदार मोठ्या सैन्यासहवर्तमान त्यानें शिवाजीवर इ० स० १६६२ त दक्षिणेंत पाठविला. तो पुण्यास जाऊन दादोजी कोंडदेवाच्या वाड्यांत राहिला. शिवाजीनें, त्याच्या सैन्यांतील मराठे लोकांस वश करून घेऊन, भर दिवसां, षाहिस्तेखान निजला होता तेथें प्रवेश केला. तेव्हां गलबल होतांच, तो सरदार खिडकीवाटे उडी टाकून पळून जाऊन बचावला. परंतु त्याचा मुलगा प्राणास मुकला. इतक्यांत शिवाजीही निसटून पार झाला. एवढें त्याचें साहस पाहूनच षाहिस्तेखान चकित होऊन परत दिल्लीस निघून गेला. नंतर लवकरच, इ० स० १६६४ च्या आरंभीं शिवाजीनें सुरत शहर लुटून तेथून एक कोटि रुपये नेले. ह्याच वर्षीं त्याचा बाप मरण पावला, आणि तो आपणास राजा ह्मणवूं लागला. ह्या संधीस त्यानें ८७ गलबतें व त्यांवर ४,००० लोक इतकें आरमारही ठेविलें.

पुढें इ० स० १६६६ त औरंगजेबानें जैशिंग व दिलीरखान हे सरदार शिवाजीवर पाठविले. त्यांबरोबर फार मोठी फौज होती. त्यांनीं शिवाजीस जेरीस आणिलें. आणि ह्या वेळेस पुरंदरचा तह झाला. त्यावरून शिवाजीनें आपण मिळविलेले वीस किल्ले मोंगलांस देऊन बारा किल्ले आपली जहागीर ह्मणून आपल्याकडे ठेविले; आणि विजापुरच्या कांहीं भागांतून शिवाजीस चौथाई आणि सरदेशमुखी मिळावी असें ठरलें. नंतर तो बादशाहास भेटण्याकरितां दिल्लीस गेला. तेथें त्यास औरंगजेबानें नजरकैदेंत ठेविलें. तेव्हां तो मोठ्या युक्तीनें तेथून पळून गेला. त्या समयीं त्याचा मुलगा संभाजी हाही त्याच्या बरोबर होता.

तिकडून आल्यावर, आपली सर्व जमाजम पुनः करून, तो आपणास राजा ह्मणवूं लागला. त्यानें आपले नांवाचें नाणें पाडिलें. व इ० स० १६७४ च्या जूनच्या पहिल्या तारखेस रायगड किल्ल्यावर आपणास राज्याभिषेक करविला. त्या वेळेस त्यानें आपली सुवर्णतुळा केली;

आणि तें सगळें सोनें ब्राह्मणांस वांटून दिलें. त्याचे प्रधान आठ असत. त्यांत पेशवा मुख्य. त्यानेंच पुढें त्याच्या वंशाचे हातून राज्य काढून आपलेकडे घेतलें.

गादीवर बसल्यानंतर शिवाजीनें हुबळी, जालना, बारसीलोर इत्यादि व्यापाराच्या मोठ्या पेंठा लुटिल्या, गोवळकोंड्याच्या व विजापुरच्या राजांपासून खंडणी घेतली, आणि शेवटची मोहीम कर्नाटकांत करून, श्रीरंगपट्टणापर्यंत मुलूख लुटून, आपला भाऊ व्यंकोजी ह्याजपासून बापाच्या वेळच्या जहागिरीची वांटणी मिळविली. शेवटीं तो इ० स० १६८० च्या एप्रिलच्या पांचवे तारखेस गुडघीच्या रोगानें रायगडीं मरण पावला. तो मोठा शूर, युद्धाच्या कामांत कुशल, आणि राज्यकारभारांत चतुर असा होता. प्रसंगोपात्त त्याच्या हातून कपटाचीं व क्रूरपणाचीं कर्में झालीं खरीं; तरी, तो हाडाचा थोर होता. त्यानें रामदास स्वामी गुरु केला होता. औरंगजेब शिवाजीस अनुलक्षून ह्मणाला "शिवाजी मोठा शूर सरदार होता; प्राचीन राज्यें धुळीस मिळविण्याचा माझा प्रयत्न चालला असतां नवीन राज्याची स्थापना करणारा सगळ्या हिंदुस्थानांत एवढाच पुरुष निपजला. त्याचें पारिपत्य करण्यांत माझें सैन्य एकसारखें एकोणीस वर्षें खपत असूनही त्याचें राज्य एकसारखें वाढत होतेंच."

शिवाजीला दोन पुत्र होते. एकाचें नांव संभाजी, आणि दुसऱ्याचें नांव राजाराम. वडील संभाजी, ह्मणून तो शिवाजीचे मागें त्याचे गादीवर बसला. त्यानें आधीं राजारामाला कैदेंत घालून, त्याचे आईस व तिच्या पक्षाचे लोकांस ठार मारिलें. नंतर त्यानें जंजिऱ्याच्या शिद्दींशीं व पोर्तुगालदेशचे लोकांशीं कांहीं युद्धें केलीं; पण त्यांपासून त्याला फारसा लाभ झाला नाहीं. संभाजी फार मूर्ख आणि व्यसनी निघाला. त्यानें आपल्या बापाच्या वेळच्या अनुभविक सुज्ञ प्रधानांस घालवून देऊन, कलुशा ह्या नांवाच्या एका कनोज ब्राह्मणास सर्व राज्याचा कारभार सांगितला. तोही आपले यजमानासारखाच दुर्व्यसनी होता; त्यामुळें राज्यांत अव्यवस्था झाली.

हें औरंगजेबाला समजतांच, तो, मराठ्यांचें राज्य बुडविण्यासाठीं इ० स० १६८३ ह्या वर्षीं दक्षिणेंत मोठी फौज घेऊन आला. आणि ब-

म्हाणपुर येथें त्यानें आपला तळ दिला. एके दिवशीं संभाजी संगमेश्वर[१] येथें दारू पिऊन धुंद झाला असतां, मोंगलांचा सरदार तकरीबखान ह्यानें त्यास धरिलें; आणि बादशाहा तुळापुरास होता, तेथें पाठविलें. त्याबरोबर कलुशाही होता. औरंगजेबानें संभाजीस मुसलमानी धर्म स्वीकारायास सांगितलें. तेव्हां त्यानें त्याच्या समक्ष त्याची फार निंदा केली; तेणेंकरून बादशाहास राग येऊन, त्यानें संभाजीचे व त्याच्या प्रधानाचे फार हाल करून तुळापुर येथें त्यांचे जीव घेतले. ही गोष्ट इ० स० १६८९ त घडली. हें वर्तमान मराठ्यांस कळतांच त्यांचें पित्त खवळलें आणि त्यांनीं मोंगलांचा सूड घेण्याचा निश्चय केला. आणि शेवटीं औरंगजेबास जेरीस आणिलें.

संभाजीचा पुत्र शिवाजी, हा आपले बापाचे मरणकाळीं केवळ ६ वर्षांचा होता. ह्मणून त्यास व त्याची आई येसूबाई हीस रायगड किल्ल्यावर मोठ्या बंदोबस्तानें ठेवून, राजारामास गादीवर बसविलें. पुढें इ० स० १६९० त तो किल्ला मोंगलांनीं घेतला, तेव्हां तीं दोघेंही त्यांचे हातीं सांपडलीं. त्यांस त्यांनीं दिल्लीस पाठविलें. तेथें औरंगजेबानें त्यांस प्रतिबंधांत ठेविलें.

राजाराम जिंजी किल्ल्यांत रहात असे. त्यास जिंकण्याकरितां औरंगजेबानें झुलपिकारखान नामक सरदार पाठविला. पण मराठे सरदारांनीं त्याचें कांहींएक चालूं दिलें नाहीं. उलटे, मोंगलांच्या मुलुखांतून चौथाइ, सरदेशमुखी, व घांसदाणा हे कर घेतले. ह्यांपैकीं निमग ह्मणजे घांसदाणा हा कर मात्र नवा. बाकीचे दोन, चौथाई आणि सरदेशमुखी, शिवाजी राजानें दिल्लीच्या बादशहाच्या आज्ञेवरून विजापुरकरांच्या राज्यांत पूर्वींच चालू केलेले होते. चौथाई ह्मणजे उत्पन्नाचा चौथा हिस्सा; आणि सरदेशमुखी ह्मणजे दाहावा हिस्सा. राजारामाच्या वेळीं रामचंद्रपंत, परशुराम त्रिंबक, संताजी घोरपडे, शंकराजी नारायण, धनाजी जाधव, खंडेराव दाभाडे, प्रल्हाद निराजी, हे मुख्य प्रख्यात कारभारी होते. ह्या राजानें सातारा ही आपली राजधानी केली. तो इ० स० १७०० ह्या वर्षीं सिंहगडीं मरण पावला. नंतर एका महिन्यानें सातारा औरंगजेबानें घेतला, आणि

१ कोंकणांत रत्नागिरीजवळ.

तेथील किल्ल्यास अजीमतारा असें नांव दिलें. पुढें लागलेंच मोंगलांचें सैन्य दक्षिणेंतून निघून गेलें.

राजाराम मरण पावल्यानंतर, त्याची बायको ताराबाई, हिनें आपला पुत्र शिवाजी, ह्यास गादीवर बसवून संपूर्ण राज्याचा कारभार चालविला. तिच्या कारकीर्दीत मराठ्यांचें लक्ष्य लुटीकडे फीरलें होतें. त्यांनीं दक्षिणेंतील कितीएक गांव जमीनदोस्त केले; आणि गुजराथ व माळवा ह्या प्रांतांत स्वाऱ्या करून तेथील बादशाहांपासून चौथाई व सरदेशमुखी हे हक्क घेतले. परशुराम त्रिंबक ह्यानें सातारा आपले अमलांत परत आणिला.

इतक्यांत, इ० स० १७०७ ह्या वर्षीं औरंगजेब निवर्तला. त्याचे गादीवर मोअजीम बसला. त्यास आपल्या मुक्ततेविषयीं, शिवाजीनें, ह्मणजे संभाजीचा पुत्र आपल्या मातुश्रीसहवर्तमान दिल्लीमध्यें कैदेंत होता त्यानें, विनंति केली. तेव्हां, त्यापासून आज्ञेंत वागण्याविषयींचें वचन घेऊन बादशाहानें त्यास सोडिलें. तो तेथें १७ वर्षे कैदेंत होता. त्याजवर औरंगजेब व त्याची कन्या बेगमसाहेब हीं फार प्रीति करीत. त्यामुळें औरंगजेबानें आपल्या दोघां मोठ्या मराठ्या सरदारांच्या दोन कन्यांशीं त्याचीं लग्नें लावून देऊन, शिवाय अक्कलकोट, इंदापुर, नेवासें, व सुपें हे गांव त्यास जहागीर दिले होते. तो बादशाहा, त्याचा आजा शिवाजी ह्यास चोर ह्मणे, व त्यास साव ह्मणे; त्यावरून ह्या पुरुषाचें नांव शिवाजी असतां शाहू असें पडलें.

इ० स० १७०८ त शाहू दक्षिणेंत आला, आणि त्यानें ताराबाईशीं लढून आपलें राजपद मिळविलें. त्या लढाईच्या गडबडींत कोणी एका बाईनें आपला लहान मुलगा शाहूच्या पायांवर आणून घातला. त्यास त्यानें फत्तेशिंग असें नांव ठेवून वाढविलें. तोच पुरुष अक्कलकोटच्या भोंसले राजांचा मूळ पुरुष झाला. शाहू गादीवर आल्यामुळें ताराबाई आपल्या पुत्रासहवर्तमान कोल्हापुरास गेली; आणि तिनें तेथें इ० स० १७०९ त वेगळें राज्य स्थापिलें.

शाहूच्या कारकीर्दींत मराठ्यांनीं ह्मणण्यासारखा कोठें पराक्रम केला नाहीं. तो स्वतः विलासी असे. त्यानें आपल्या राज्याच्या वसुलाचें काम धनाजी जाधवाकडे सांगितलें होतें. त्यानें आपल्या हा-

ताखालीं, सासवडचा कुळकरणी आबाजी पुरंदरे, व श्रीवर्धनचा कुळकरणी बाळाजी विश्वनाथ भट, हे दोन कारकून ठेविले. ह्यांपैकीं बाळाजी विश्वनाथानें शाहू राजाची मर्जी संपादून, युक्तीनें सगळ्या राज्याचा कारभार आपले हातीं घेतला. ह्या वेळेच्या सुमारास दक्षिणेचा सुभेदार चिनकिलिचखान ह्यानें सातारा आणि कोल्हापुर ह्यांमधलें वैर युक्तीनें वाढवून मराठ्यांच्या राज्यास उतरती कळा लावण्याचा बेत आणिला. परंतु बाळाजी विश्वनाथाच्या मसलतीपुढें त्याचें कांहीं चालेना. तो मोठा मसलती असल्यामुळें दिल्लीच्या दरबारीं त्याचें चांगलें वजन असे. तेथील मुत्सद्यांच्या साह्यानें त्यानें इ० स० १७१८ त मराठशाहीकरितां दक्षिणेंतील चौथाई आणि सरदेशमुखी हे दोन हक्क संपादिले. शाहू इ० स० १७४९ त निवर्तला. तेव्हां पेशवे सर्व राज्याचे केवळ मालक होऊन बसले. शाहूचे मागें त्याचे गादीवर रामराजा, दुसरा शाहू, प्रतापसिंह, आणि शहाजी इतके पुरुष बसले. ते केवळ परतंत्र होते. शाहाजी हा इ०स० १८४८ त निवर्तला. तेव्हां त्याला पुत्रसंतान नव्हतें. ह्मणून त्याचें राज्य इंग्लिश सरकारानें आपल्या राज्यांत सामील केलें.

बाळाजी विश्वनाथाचे मागें त्याचे वंशज पेशव्याचें पद पावत गेले. तेच मराठ्यांच्या राज्याचे मालक झाले. त्यांचें राज्य व इतर कित्येक एतद्देशीय राजांचीं राज्यें शेवटीं एका दूरच्या बेटांतील लोकांनीं घेतलीं. त्यांविषयीं जसा जसा संबंध येईल तसें तसें त्यांचें पुढें वर्णन करूं.

## भाग साहावा.

### इंग्लिशांचा उत्कर्ष व पेशवे.

इ० स० १६७५ पासून इ० स० १७५६ पर्यंत.

ख्रिस्ती शकाच्या १५ व्या व १६ व्या शतकांत पोर्तुगीज, डच, इंग्लिश, फ्रेंच, इत्यादि युरोपांतल्या लोकांनीं हिंदुस्थानामध्यें प्रथमतः व्यापाराच्या निमित्तानें प्रवेश केला. इ० स० १४९८ त पोर्तुगीज लोकांनीं मलबार किनाऱ्यावर व्यापार मांडिला. आणि एतद्देशीय राजांशीं भांडून आपली राज्यसत्ता स्थापित करूं लागले. इंग्लिशांनीं

इ० स० १६१२ ह्या वर्षी सुरतेस वखार बांधिली. त्याच शहरांत फ्रेंचांनीं इ० स० १६७५ त व्यापार चालू केला, व पुढें चार वर्षांनीं पोंदेशरी येथें मुख्य ठाणें घातलें. देन्स लोक त्रांकिबार येथें व्यापार करूं लागले. ह्या लोकांनीं हिंदुस्थानांत व्यापार करण्याविषयीं आपापले राजांपासून सनदा घेतल्या होत्या. अशा व्यापारी मंडळीस कंपनी अशी संज्ञा असे. इंग्लिशांच्या कंपनीस ईस्तइंदिया कंपनी असें नांव होतें.

पुढें व्यापार वाढतां वाढतां इंग्लिशांस मद्रास, आणि कलकत्ता हीं शहरें मिळालीं. आणि इंग्लंडचा राजा दुसरा चार्लस ह्याच्या बायकोस मुंबईबेट आंदण मिळालें, तें इ० स० १६६८ ह्या वर्षी चार्लसानें ईस्तइंदिया कंपनीच्या स्वाधीन केलें. फ्रेंचांचा मुख्य गव्हरनर डुप्ली असे. त्याची बुद्धि फार खोल होती. फ्रेंच व इंग्लिश ह्या दोन्ही कंपन्यांचा उद्देश एक असल्यामुळें, ह्मणजे उभयतांचेही मनांत हिंदुस्थानामध्यें व्यापार करण्याचें आलें ह्मणून, त्यांचें वैमनस्य पडलें. इतक्यामध्यें युरोपांत इंग्लंद व फ्रान्स ह्यांचें युद्ध सुरू झाल्याची खबर समजली. तेव्हां उघड वैर लागून, फ्रेंचांचा सरदार लाबरदोनस ह्यानें जलमार्गानें येऊन हल्ला करून, इ० स० १७४६ त मद्रास घेतली. त्याच्या बरोबर खलाशांसुद्धां सुमारें ४,००० लोक होते. आंत सांपडलेल्या इंग्लिश लोकांस त्या फ्रेंच सरदारानें प्रतिबंधांत ठेविलें. नंतर थोड्या दिवसांनीं इंग्लिशांनीं पोंदेशरीस वेढा घातला; परंतु इ० स० १७४८ त युरोपामध्यें फ्रेंच व इंग्लिश ह्यांचा तह ठरला, त्याच्या योगानें मद्रास इंग्लिशांस परत मिळाली.

तंजावरच्या शाहूराजास पदच्युत करून प्रतापसिंह नामक दासीपुत्रानें त्याची गादी बळकाविली होती. तेव्हां देविकोट किल्ला देऊं करून शाहूनें इंग्लिशांपाशीं साह्य मागितलें. तें ते देऊं लागले, तों प्रतापसिंह देविकोट देऊन आणखी कांहीं मुलूखही त्यांस देण्यास कबूल झाला. तेव्हां तें त्याचें बोलणें मान्य करून इंग्लिशांनीं शाहूचा पक्ष सोडिला. ही गोष्ट इ० स० १७४९ त घडली.

ह्याच वेळेच्या सुमारास निजामाचे गादीचा मालक नासिरजंग

१ हिंदुस्थानाच्या पूर्वकिनाऱ्यावर.

ह्यास त्याचा भाऊ मुझफरजंग हा शत्रु उत्पन्न झाला; व अर्काटचा नवाब अनवरुद्दीन ह्यास चंदासाहेब हा शत्रु उत्पन्न झाला. ह्या दोघां शत्रूंनीं फ्रेंचांचें साह्य मागितलें. तें त्यांस तत्काळ मिळालें. इंग्लिशांनीं नासिरजंग व अनवरुद्दीन ह्यांचा पक्ष धरिला. उभयतांकडील सैन्यांचीं कितीएक युद्धें झालीं. शेवटीं अंबूर येथील लढाईत, इ० स० १७४९ ह्या वर्षी अनवरुद्दीन आणि त्याचा वडील मुलगा हे मारले गेले, आणि फ्रेंच जय पावले. त्यांनीं चंदासाहेबास अर्काटचा नवाब केलें. त्याबद्दल त्यानें त्यांस पोंदेशरीजवळ ८१ गांव बक्षीस दिले.

तसेंच इकडे नासिरजंगास व मुझफरजंगास दुष्टीनें पठाणांकडून ठार मारवून, निजामाचा एक पुत्र सलाबतजंग नामें होता, त्यास निजामाचे गादीवर बसविलें. आणि निजामाच्या दरबारीं बुसी हा फ्रेंच सरदार निजामास मसलत देण्यास ह्मणून ठेविला. अनवरुद्दीनाचा दुसरा पुत्र महमदअल्ली, हा कर्नाटकचा नवाब इंग्लिशांनीं कबूल केला होता. तो अंबूर येथील संग्रामानंतर, भयभीत होऊन त्रिचनापल्ली येथें पळून जाऊन राहिला होता. त्याशीं इंग्लिशांचें सख्य होतें, व फ्रेंच आणि चंदासाहेब ह्यांचें सख्य होतें; ह्मणून त्यांनीं त्रिचनापल्लीस मोठ्या सैन्यानिशीं वेढा दिला. तो उठविण्याविषयीं इंग्लिश लोक विचार करूं लागले.

हा वेढा उठविण्याची कल्पना राबर्ट क्लैव नामक एका इंग्लिश सरदारानें काढिली. ती अशी कीं, नवाबाची राजधानी अर्काट, हिजवर इंग्लिश सैन्यानें हल्ला करावा; ह्मणजे चंदासाहेबाचें सैन्य सहजच तिच्या संरक्षणार्थ तिकडे जाईल, आणि इकडचा वेढा नाहींसा होऊन महमदअल्ली सुटेल. ही युक्ति त्यानेंच स्वतः २०० गोरे लोक, ३०० काळे लोक, व ३ तोफा, इतकें सैन्य अर्काटावर घेऊन जाऊन, व तें शहर हस्तगत करून, सिद्धीस नेली. त्रिचनापल्लीचा वेढा उठला; महमदअल्लीस साह्य पोंचलें, आणि इंग्लिशांस उमेद आली. ही गोष्ट इ० स० १७५१ त घडली.

ह्या आलीकडच्या लढायांत फ्रेंच व चंदासाहेब अगदीं टेंकीस आले. श्रीरंगमच्या वेढ्यांत नवाब तंजावरच्या राजाच्या स्वाधीन झाला. त्यानें

१ मद्रास इलाख्यांत बंगळोराच्या पूर्वेस ४० कोसांवर आहे.

त्यास ठार मारिलें. आणि इकडे महमदअल्ली ह्यास इंग्लिशांनीं अर्काटच्या नवाबगिरीचीं वस्त्रें दिलीं. हें कृत्य इ० स० १७५४ त झालें. ह्याच वर्षीं डुप्ली हा फ्रेंच सरदार स्वदेशीं परत गेला; आणि तेथें त्याची दुर्दशा होऊन तो इ० स० १७६४ त मरण पावला.

ह्याप्रमाणें कर्नाटकामध्यें फ्रेंचांचें वर्चस्व नाहींसें झालें, तरी, निजामाच्या दरबारांत त्यांचें वजन चांगलें होतें. सलाबतजंग मागचे उपकार स्मरून त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें चालत असे. यानें बुसीकडे मछलीपट्टणापासून जगन्नाथपुरीपर्यंत तीनशें कोस प्रांतांचें काम सांगितलें होतें.

इकडे बाळाजी विश्वनाथ पेशवा, इ० स० १७२० त निवर्तल्यावर, त्यांचा वडील पुत्र बाजीराव हा पेशवा झाला. त्यानें इ० स० १७२८ त निजाम उलमुलुखावर स्वारी करून त्याला जेरीस आणिलें. त्याप्रमाणेंच, त्यानें इ० स० १७३१ ह्या वर्षीं बडोद्याजवळ लढाई करून त्रिंबकराव दाभाडे ह्यांस मारिलें, इ० स० १७३३ त बुंदेलखंडाचा राजा चतुरसाल, ह्यास बाजीरावानें मोठ्या पराक्रमानें मोंगलांच्या जाचांतून सोडविलें. त्याबद्दल त्यानें त्यास सवादोन लाखांचा मुलूख दिला. ह्याचे कारकीर्दींत मल्हारराव होळकर इंदुरच्या संस्थानाचा स्थापक, राणोजी शिंदा ग्वाल्हेरच्या संस्थानाचा मूळ पुरुष, व बडोद्याचा पिलाजी गायकवाड, हे उदयास आले. इ० स० १७३६ त दिल्लीवर स्वारी करून ह्या पेशव्यानें सर्व माळवाप्रांत आणि नर्मदा आणि चंबळ ह्या नद्यांमधला प्रांत हे काबीज केले. ह्या पेशव्याचा भाऊ चिमणाजी आपा ह्यानें इ० स० १७३९ त कोंकणामध्यें पोर्तुगीज लोकांशीं लढून, त्यांचा पराभव केला, आणि वसई घेतली. बाजीराव इ० स० १७४० त वारला. त्यास बाळाजीपंत, रघुनाथराव, आणि जनार्दनपंत असे तीन पुत्र होते. शिवाय, यवनीच्या पोटीं झालेला समशेरबाहादर हा एक मुलगा होता.

बाजीरावाच्या मागें त्याचा पुत्र बाळाजी हा पेशवा झाला; ह्यासच नानासाहेब ह्मणत. त्यापासून रघूजी भोंसला ह्यानें इ० स० १७५० त बंगाल, बहार, व अयोध्या ह्यांतील कांहीं भाग शिरजोरपणानें घेतले. नंतर पुणें शहर पेशव्यांची राजधानी झालें. नानासाहेबाचे वेळीं त्याचा सखा भाऊ रघुनाथराव ह्यानें, इ० स० १७५० त उत्तर हिंदुस्थाना-

वर दुसरी स्वारी केली; आणि पंजाबांत अहमदशाह अबदाली ह्याचा सुभेदार होता, त्यास घालवून देऊन तेथें आपला अंमल बसविला. इकडे पेशव्यांचा अंमल अहमदनगरापर्यंत बसल्यामुळें त्यांवर, निजामाच्या गादीवर सलाबतजंग होता त्यानें स्वारी केली. उभयपक्षांची लढाई उद्गीर[१] येथें, इ० स० १७६० त होऊन तींत निजामाचा पराभव झाला; आणि त्यानें आपल्या राज्यांतला वायव्येकडचा बराच मुलूख पेशव्यांस दिला.

हें वर सांगितलेलें रांघोबादादाचें शौर्य अहमदशाहास कळतांच तो बरोबर ४६ ८०० स्वार, ३८,००० पायदळ, आणि ७० तोफा इतकें सैन्य घेऊन मराठ्यांवर आला. त्याशीं लढण्याकरितां, चिमणाजी आपाचा पुत्र सदाशिवरावभाऊ, व पेशव्यांचा थोरला मुलगा विश्वासराव, हे, १५,००० पायदळ, ५५,००० स्वार,. २०० तोफा आणि २,००,००० बाजारबुणगें, इतक्यांसहवर्तमान, चालून गेले. परंतु रजपूतलोक आणि जाटलोक हे जे मराठ्यांस मिळाले होते, ते सदाशिवरावभाऊचा उद्धटपणा आणि अविचारीपणा पाहून त्यांस सोडून गेले. नंतर, उभयपक्षांची लढाई, इ० स० १७६१ च्या जानेवारी महिन्यामध्यें पानपताजवळ झाली. तींत मराठे पराभव पावले. पेशव्यांच्या कुलांतले दोघेही सरदार पडले. अहमदशाहास २२,००० पाडाव केलेले लोक, ५०,००० घोडा, व अतोनात लूट सांपडली. ही लढाई पाणिपतची तिसरी लढाई ह्मणून प्रसिद्ध आहे.

आंगऱ्याशीं युद्ध करतेसमयीं नानासाहेबास इंग्लिशांनीं साह्य दिलें, त्याबद्दल त्यानें त्यांस बाणकोट व आणखी नऊ गांव इनाम दिले; व त्यांशीं तह केला. हा पेशवा इ० स० १७६१ च्या जून महिन्याच्या अखेरीस पुण्यांत पर्वतीच्या देवळांत मरण पावला. ह्याचे कारकीर्दींत प्रजेस पुष्कळ सुख प्राप्त झालें.

## भाग सातवा.

### बंगाल्यांतील वर्तमानें.

इ० स० १७५६ पासून इ० स० १७६० पर्यंत.

बंगाल्याचा सुभेदार अलिवर्दीखान हा उदररोग होऊन, आपले

१ अक्कलकोटाच्या उत्तरेस आहे.

वयाचे ८० वे वर्षी, इ० स० १७५६ त मरण पावला. यानें आपल्या प्रजेस सुख दिलें; आणि त्याचें लक्ष इंग्लिशांच्या हिताकडे विशेष होतें. त्याचे मागून त्याचे गादीवर, त्याचा नातू सुराजउद्दवला हा बसला. तो स्वभावानें फार क्रूर, जुलमी, व्यसनी, आणि लोभी असा असे. त्याच्या मुलखांतला कोणीएक श्रीमान व्यापारी अन्यायास त्रासून, आपल्या विपुल द्रव्यासहवर्तमान कलकत्त्यास येऊन इंग्लिशांच्या आश्रयास राहिला. ते, त्यास नवाब मागत असतां, त्याचे स्वाधीन करीनात, हें एक कारण; व इंग्लिश लोकांनीं कलकत्त्याच्या सभोंवतालची भिंत त्याची परवानगी न घेतां नीट करण्याचें काम सुरू केलें, हें दुसरें. हीं दोन कारणें बाह्यात्कारें दाखवून, केवळ दुष्टपणानें द्रव्याची आशा धरून सुराजउद्दवला ह्यानें, इ० स० १७५६ च्या जून महिन्यांत कलकत्त्यावर स्वारी केली. तेव्हां तेथील मुख्य मुख्य इंग्लिश अंमलदार जाहाजांत बसून पळून गेले; तरी १४६ इंग्लिश लोक शत्रूच्या हातीं लागले. त्यांस नवाबाच्या लोकांनीं एका अगदीं लहान अंधारकोठडींत रात्रभर कोंडून ठेविलें. तेथें त्यांतले १२३ लोक उजाडण्यापूर्वींच प्राणांस मुकले; आणि बाकीचे २३ मात्र जीवंत निघाले. ह्या हल्ल्यांत सुराजउद्दवल्यास इंग्लिशांच्या खजिन्यांत सुमारें पन्नास हजार रुपये सांपडले.

हें वर्तमान होत आहे तों, क्लैव साहेब स्वदेशीं गेला होता, तो हिंदुस्थानांत परत आला. तो मद्रासेस असतां त्याला ही कलकत्त्याची हकीकत समजली. त्यानें कलकत्त्यावर गोळ्यांचा भडिमार करून तें शहर इ० स० १७५७ च्या जानेवारी महिन्याचे दुसरे तारखेस, नवाबाचे लोकांपासून परत घेतलें. ह्याचे पूर्वीं नुकतेंच त्यानें आंग्र्याचें ठाणें गिर्या, हें काबीज केलें होतें.

कलकत्ता परत घेण्यासाठीं त्यास सुराजउद्दवल्या सरदारानें वेढा घातला. तेव्हां त्यांतूनही रात्रीं क्लैव साहेब सैन्यासह निघून गेला. हें पाहून, इंग्लिशांपुढें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं, असें नवाबास वाटलें; ह्मणून, त्यानें त्यांशीं इ० स० १७५७ च्या फेब्रुआरींत तह केला. त्यांत असें ठरलें कीं, त्यानें इंग्लिशांच्या वखारी घेतल्या होत्या

त्या परत द्याव्या, त्यांचा माल त्याजकडे असेल तो परत पाठवावा; आणि परराज्य घेण्याकरितां अथवा स्वराज्यसंरक्षणाकरितां उद्योग करणें तो उभयतांनीं एकविचारें करावा. ह्या तहानंतर मे महिन्यांत लवकरच फ्रेंचांचें चंद्रनगर क्लैव साहेबानें घेतलें.

ह्याप्रमाणें बाह्यात्कारें तह झाला; तरी इंग्लिश व नबाब ह्यांचे मनांतील परस्परांविषयींचें वैर मोडलें नव्हतें. नबाबाच्या दुष्ट आचरणास खुद्द त्याचे मंत्री, सरदार, व प्रजाही त्रासून गेली होती; आणि त्यास पदच्युत करण्याविषयीं त्यांमध्यें मसलत चालली होती. तींत, अलिवर्दीखानाच्या बहिणीचा नवरा मीरजाफर, सुराजउद्दवला ह्याचा सेनापति, हा प्रमुख होता. त्यानें आपला बेत कलकत्याच्या इंग्लिश लोकांस कळविला. तो त्यांस फार पसंत पडला; आणि तेही त्यांत शिरले. व, इंग्लिशांनीं नबाबाशीं लढाई करण्याचा प्रसंग आणावा, मीरजाफरानें आयत्या वेळीं त्यांस सैन्यासह येऊन मिळावें, ह्मणजे अर्थातच सुराजउद्दवल्याचा पराभव झाल्यावर, त्यास त्यांनीं गादीवरून काढून मीरजाफरास नबाब करावें, असें ठरलें.

नंतर इंग्लिशांनीं मागच्या कलहाची कुरापत काढून, नबाबाशीं लढण्याकरितां एक हजार गोरे शिपाई, दोन हजार काळे शिपाई, आठ तोफा आणि दोन जेज्ञाला, इतकी सामग्री सिद्ध केली. तिचा मुख्य अधिकारी क्लैव साहेब होता. नबाबाकडे ३५,००० पायदळ १५,००० स्वार आणि ४० तोफा एवढी फौज तयार होऊन निघाली. ह्या सैन्यांचें तुमुल युद्ध, इ० स० १७५७ च्या जून महिन्याच्या २३ व्या तारखेस प्लासी[१] येथें झालें. त्यांत मीरजाफर पूर्वसंकेतानुरूप इंग्लिशांस येऊन मिळाला आणि नबाब पराजय पावून समरांगणांतून दोन हजार लोकांनिशीं पळून गेला; ह्या लढाईंत इंग्लिशांकडचे सुमारें ७२ लोक मात्र निकामी झाले. आणि शत्रूकडचे निदान ५०० तरी लोक प्राणांस मुकले असावे; असा क्लैव साहेबानें अजमास केला.

ह्या एका जयानें बंगाला, बहार, आणि ओढ्यादेश ह्या तीन प्रांतांचा धनी जो बंगालचा नबाब, तो इंग्लिशांनीं अगदीं आपले हातचा करून ठेविला. प्लासीची लढाई संपतांच त्यांनीं मीरजाफरास

१ भागीरथीच्या कांठीं कलकत्याच्या उत्तरेस ७८ कोसांवर.

नबाबाचे गादीवर बसविलें. ह्या वेळीं नबाबाचा सगळा खजीना त्यांच्या हातीं लागला. त्यांत रोख ऐशीं लक्ष रुपये होते; व शिवाय सोनें पुष्कळ होतें. तें शंभर जाहाजांवर भरून, तीं जहाजें वाजतगाजत कलकत्त्यास आणिलीं. शिवाय त्यानें त्यांस कलकत्त्याभोंवतालच्या पुष्कळ प्रांताची जमीनदारी देऊन सवादोन कोटि रुपये लढाईच्या खर्चाबद्दल वगैरे देऊं केले; त्यांपैकीं निमे ऐवज क्लैव साहेबानें रोख घेतला; आणि बाकी राहिलेली रकम नबाबानें तीन वर्षांत तीन हप्त्यांनीं द्यावी असें ठरविलें.

सुराजउद्दवला पळत असतां त्यास त्याच्या एका दावेदाऱ्यानें पकडून मीरजाफराकडे नेलें. त्यानें त्यास आपला मुलगा मीरन ह्याचे हवालीं केलें. त्यानें मारेकऱ्यांचे हातून त्यास त्याच रात्रीं ठार मारविलें.

ह्या घालमेलींत इंग्लिशांस कलकत्त्यापासून कालपीपावेतों मुलूख नबाबाकडून मिळाला, व त्यांच्या मालावर त्याच्या मुलखांत जकांत पडूं नये असें ठरलें. शिवाय सिंहासनारूढ होतेसमयीं मीरजाफरानें अंमलदारांस बक्षीस दिलें तें वेगळेंच. एकट्या क्लैव साहेबालाच बेवीस लक्षांपेक्षां अधिक रुपये मिळाले.

इकडे कर्नाटकांत महमदअल्ली ह्यानें देऊं केलेला पैसा वसूल करण्याकरितां इंग्लिशांनीं तिनवेल्ली व नेलोर ह्या प्रांतीं फौज पाठविली. ही चांगली संधि पाहून फ्रेंचांनीं त्रिचनापल्लीवर पुनः हल्ला केला. तो कप्तान कालियद ह्या इंग्लिश सरदारानें मोठ्या शौर्यानें हटविला. ही गोष्ट इ० स० १७५५ त झाली.

पुढें लाली नामक एक फ्रेंच सरदार हिंदुस्थानांत आला. त्यानें पहिल्या धडाक्यास, इ० स० १७५८ च्या जून महिन्यांत, इंग्लिशांचा सेंत देविद किल्ला घेतला. इ० स० १७६० च्या जानेवारीच्या २२ व्या तारखेस फ्रेंचांच्या व इंग्लिशांच्या सैन्यांची लढाई वांदिवाश[१] येथें झाली. तींत फ्रेंचांचे सरदार लाली आणि बुसी हे होते; आणि इंग्लिश सैन्याचा मुख्य कर्नल कूट हा होता. तींत फ्रेंच पराभव पावले. आणि बुसी हा इंग्लिशांच्या हातीं लागला. पुढें लालीनें तंजावरच्या राजावर ५६,००,००० रुपये मागची बाकी काढून, ती उगवून घे-

१ अर्काटच्या आग्नेयीस १७ कोसांवर आहे.

ण्याकरितां त्याजवर स्वारी केली; परंतु त्यास इंग्लिशांचा आश्रय चांगला असल्यामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं. ह्यापूर्वी लालीनें हल्ला करून मद्रासेचा बाहेरकोट इंग्लिशांकडून घेतला होता; पण तो त्यांनीं त्याला फार वेळ पचूं न देतां तत्काळ परत घेतला. शिवाय जिंजी वगैरे अनेक किल्ले इंग्लिशांस मिळाले. तेणेंकरून फ्रेंचांचें बळ दिवसेंदिवस अगदीं कमी कमी होत जाऊन, शेवटीं त्यांनीं हिंदुस्थानांत राजसत्ता प्राप्त करून घेण्याची आशा सोडिली. इ० स० १७६० त इंग्लिशांनीं पोंदेशरी घेतली, आणि लालीस कैद केलें. आणि इ० स० १७६९ ह्या वर्षी फ्रेंचांची ईस्तइंदिया कंपनी मोडली.

इकडे दिल्लीचा नामधारी बादशाहा आलमगीर, ह्याचा पुत्र शाहाआलम, व अयोध्येचा नवाब सुजाउद्दवला, ह्यांनीं आपलीं सैन्यें एकत्र करून मीरजाफराच्या मुलखांत स्वारी केली, आणि पाटणाशहरास वेढा घातला. तेथचा सुभेदार रामनारायण ह्यानें बारा दिवस त्या शहराचें रक्षण मोठ्या शौर्यानें केलें. इतक्यांत, क्लैव साहेब व मीरजाफराचा पुत्र मीरन हे सैन्यासहवर्तमान त्याच्या साह्यार्थ आले. तेव्हां शहाजादा वेढा उठवून निघून गेला. ह्याप्रमाणें बहार प्रांतांत सर्वत्र शांतता करून क्लैव साहेब, मीरजाफराची राजधानी मुर्शिदाबाद येथें गेला. तेव्हां मीरजाफरानें त्याचे फार आभार मानून व त्यास अमीरउल्लउमराव हा किताब देऊन, इंग्लिश कंपनीकडून कलकत्याजवळच्या प्रांताचा जो सालीना तीन लक्ष रुपये वसूल येत असे, तो त्यास खासगत जहागीर ह्मणून दिला. हें कृत्य इ० स० १७५९ त घडलें.

मीरजाफराला इंग्लिशांनीं गादीवर बसविलें खरें, परंतु त्याला पुढें असें वाटूं लागलें कीं, आपणास इंग्लिशांच्या तंत्रानें वागावें लागतें हें नीट नाहीं; ह्मणून त्यानें इंग्लिशांस दाबांत ठेवण्यासाठीं चिनसुरा येथील डच लोकांस बरेंच मोठें सैन्य ठेवण्यास सांगितलें. ह्मणून डच लोकांनीं चिनसुरा येथें आणून ठेवण्याकरितां ७०० गोरे व पुष्कळ काळे लोक कलकत्यानजीकच्या हुगळी नदींतून पाठवून दिले. तें समजतांच क्लैव साहेबाच्या हुकुमावरून कर्नल फोर्द नामक इंग्लिश सरदारानें ३०० गोरे लोक व ८०० काळे लोक इतकें सैन्य आणून शत्रूंस पिटून लाविलें. हें वर्तमान इ० स० १७६० त घडलें.

नंतर लवकरच क्लैव साहेब इंग्लंदास निघून गेला. खरोखर ह्मटलें तर ह्या वेळेस डच लोकांचें आणि इंग्लिश लोकांचें युरोपांत सख्य होतें. तरी आपल्याशिवाय दुसऱ्या कोणत्याही युरोपांतल्या राष्ट्रांचा हात बंगाल्यांत शिरकूं द्यावयाचा नाहीं, ह्या धोरणानें ह्या वेळेस इंग्लिशांनीं डच लोकांवर हल्ला केला.

ह्याप्रमाणें इंग्लिशांच्या मनांत मीरजाफराविषयीं वांकडें आलें, व तो त्यांस कबूल केलेला पैसा देण्यास टाळाटाळ करूं लागला. आणि ह्याच संधीस त्याच्या फौजेनें आपला मागचा मुशाहिरा मागण्याकरितां त्याच्या दारीं धरणें घेतलें. त्या सैन्यास आपला स्वतःचा पैसा देण्याचें अभिवचन देऊन, मीरजाफराचा जांवई मीरकासीम ह्यानें मागें परतविलें. ही चांगली संधि पाहून इंग्लिशांनीं मीरजाफरास इ० स० १७६० त गादीवरून काढून टाकिलें, आणि मीरकासीम ह्यास गादीवर बसविलें. त्यानें ह्या उपकाराबद्दल वीस लक्ष रुपये देऊं करून बरद्वान, चितगांव आणि मिदनापुर हे प्रांत इंग्लिशांस दिले.

## भाग आठवा.

### बंगाल्यांतील वर्तमानें, हैदराशीं युद्ध वगैरे.

#### इ० स० १७६० पासून इ० स० १७७५ पर्यंत.

बंगाल्याच्या नवाबगिरीचीं वस्त्रें इंग्लिशांनीं मीरकासिमास दिलीं. पण, तो त्यांच्या मनाप्रमाणें वर्तेना, कबूल केलेला पैसा त्यांस देईना, आपल्या सैन्यास वेळचे वेळीं पगार वांटीना, इंग्लिश व्यापाऱ्यांनीं आपल्या मालावर जकात इतर व्यापाऱ्यांप्रमाणें दिली पाहिजे असा आग्रह धरून बसला, आणि खर्चाची काटकसर करून आपणांस इंग्लिशांच्या जाचांतून सोडविण्याचा विचार करूं लागला. ह्या कारणांवरून त्यास त्यांनीं इ० स० १७६३ त पदच्युत करून, मीरजाफरास पुनः गादीवर बसविलें. ह्याचा सूड उगविण्याकरितां मीरकासीम ह्यानें पाटणा येथें, दोनशें इंग्लिश लोकांची कत्तल उडविली. नंतर मीरकासीम हा, कर्मनाशा नदी उतरून, शाहाआलम व अयोध्येचा नवाब सुजाउद्दवला हे बुंदेलखंडावर स्वारी करण्याच्या बेतांत होते, त्यांस जाऊन मिळाला. मीरजाफराचे कारकीर्दींत इंग्लिशांनीं सगळ्या

व्यापारांत हात शिरकावून, रयतेवर जुलूम करून व न्यायास एकीकडे ठेवून, आपल्या पिशव्या भरिल्या, तेणेंकरून प्रजा अगदीं हैराण होऊन गेली. ही अव्यवस्था मोडण्याकरितां क्लैव साहेबास इंग्लंदांतून पुनः हिंदुस्थानांत पाठविलें.

इ० स० १७६३ त शाहाआलम, अयोध्येचा नबाब सुजाउद्दवला व मीरकासीम हे एकत्र होऊन इंग्लिशांवर उठले होते. त्यांच्या एकत्र झालेल्या ३०,००० सैन्याची व इंग्लिशांच्या सात हजार सैन्याची लढाई बक्सार येथें ता० २२ आक्टोबर स० १७६४ रोजीं झाली. तींत इंग्लिशांचे शत्रु पराभव पावले. त्यांचे २,००० लोक कर्मनाशा नदींत बुडाले, व २,००० समरांगणावर पडले. इंग्लिशांकडचे ८४७ लोक मात्र जायां झाले. ह्या प्रसंगीं मेजर मनरो नामक इंग्लिश सरदारानें मोठा पराक्रम केला. ह्याच वर्षी बंगाल्यांतील कांहीं एतद्देशीय शिपायांनीं बंड करण्याचा प्रयत्न केला. परंतु मनरोसाहेबानें त्यांतल्या वीस शिपायांस एकदम तोफेच्या तोंडीं देऊन बंड मोडिलें.

क्लैव साहेब विलायतेहून निघाला तो इ० स० १७६५ च्या मे महिन्यांत कलकत्त्यास येऊन पोहोंचला. त्यानें असें ठरविलें कीं, कंपनीच्या कामदार लोकांनीं खासगी व्यापार करूं नये, व नजराणा घेऊं नये. हें त्या लोकांस मानवलें नाहीं; तरी त्यांची त्यानें कांहीं परवा न बाळगितां ती गडबड मोडिली. मीठ, तमाखू आणि सुपारी ह्यांचे मक्ते ठरवून त्यांचें उत्पन्न मात्र त्यांनीं यथाविभागें वांटून घ्यावें, असें त्यानें ठरवून ठेविलें; तरी हाही ठराव पुढें फार दिवस चालला नाहीं.

आणखी एक मोठें काम क्लैव साहेबानें केलें. तें हेंच कीं, बंगाला, बहार, आणि ओढ्या देश, ह्या प्रांतांचा नबाब मीरजाफर मरून त्याची गादी, नजीबउद्दवला ह्यास मिळाली होती; त्याला सालाची ४२,००,००० रुपये नेमणूक ठरवून देऊन, सर्व प्रांतांचा कारभार आपले हातीं घेतला. ही गोष्ट इ० स० १७६५ च्या जून जुलै ह्या महिन्यांत घडली. नंतर लागलीच आगष्ट महिन्याच्या १२ व्या तारखेस त्यानें, दिल्लीचा बादशाहा शाहाआलम ह्याजपासून बादशहास वर्षाचे २६ लाख रुपये देऊं करून त्या तिन्ही प्रांतांच्या स्वामित्वाची सनद कंपनीसरकारच्या नांवानें घेतली. हीस दिवाणी असें नांव आहे.

१ गंगेच्या कांठीं काशीच्या ईशान्येस ३१ कोसांवर आहे.

ह्मैसूरचा हिंदु राजा चिक् कृष्णराय, ह्याचा कारभारी नंदराज, ह्याचे पदरीं हैदर नाईक ह्मणून एक सरदार असे. त्याला मुलगे दोन; एक हैदर, आणि दुसरा शाबास. ह्यांपैकीं हैदर हा इतका शूर व साहसी निघाला कीं, त्यानें आपल्या धन्यांस एकीकडे ठेवून, इ० स० १७६१ ह्या वर्षीं आपणास राजा ह्मणविलें.

पुढें तो फार वाढला, आणि त्यास आसपासचे संस्थानिक फार भिऊं लागले. त्याजवर इ० स० १७६५ त माधवराव पेशव्यानें स्वारी करून त्याजपासून ३२ लाख रुपये आणि बराच मोठा प्रदेश घेतला. इ० स० १७६६ त हैदरानें मलबारावर स्वारी करून कालिकत घेतलें. पुढें त्याला जिंकण्यासाठीं माधवराव पेशवा, निजामअल्ली, आणि इंग्लिश, हे तिघे एक झाले. हें हैदरास कळतांच त्यानें ३५,००,००० रुपये देऊन पेशव्यास त्या कटांतून फोडिलें. आणि तसेंच आणखी पुष्कळ द्रव्य देऊन निजामअल्लीस फितविलें. तेव्हां इंग्लिश एकटे राहिले. त्यांचा सरदार स्मिथ ह्याच्या हाताखालीं अवघें ७,००० सैन्य आणि ६० तोफा होत्या. त्यावर हैदरानें बरेंच मोठें सैन्य आणि १०० तोफा ह्यांनिशीं चंगम आणि त्रिनोमाली[१] येथें इ० स० १७६७ त हल्ले केले. त्यांत त्याचाच पराजय झाला; व आणखीही कितीएक लढायांत तो तसाच पराजय पावला; परंतु पुढें हैदर स्वतः मद्रासेवर चालून आला. तेव्हां तेथील इंग्लिश लोक भ्याले. आणि त्यांनीं हैदरानें सांगितलें त्याप्रमाणें इ० स० १७६९ त त्याशीं तह केला. त्या तहांत असें ठरलें होतें कीं, एकमेकांनीं एकमेकांचे काबीज केलेले प्रांत एकमेकांस परत द्यावे, आणि संकटसमयीं एकमेकांस साह्य करावें. ह्याप्रमाणें ह्मैसूरच्या पहिल्या लढाईचा शेवट झाला.

इ० स० १७७० या वर्षीं बंगाल्यामध्यें मोठा दुष्काळ पडून देशांतील सुमारें एक तृतीयांश लोक अन्न अन्न करून मरण पावले.

अलमगीर बादशाहा मारला गेला, तेव्हां त्याचा औरस पुत्र शाहाआलम हा बंगाल्यांत लढत होता; त्यामुळें दिल्लीचें तक्त दुसऱ्यासच मिळालें. तेव्हां अर्थात् त्यास निराश होऊन इकडे स्वस्थ राहणें प्राप्त पडलें. ह्यानंतर, माधवराव पेशव्यानें, इ० स० १७७० ह्या वर्षीं, त्रि-

१ अर्काटाच्या दक्षिणेस.

साजी कृष्ण सेनापति ह्याजबरोबर ५०,००० फौज देऊन त्यास हिंदुस्थानांत पाठविलें. त्याजबरोबर महादजी शिंदा व तुकोजी होळकर हेही होते. ह्या सैन्याच्या साह्यानें शाहाआलम, इ० स० १७७१ च्या दिसेंबर महिन्याच्या अखेरीस दिल्लीच्या तक्तावर बसला. त्यानें आपणास साह्य केल्याबद्दल मराठ्यांस अलाहाबाद व कोरा हे प्रांत दिले. तरी त्यानें त्याच्या पुढच्या वर्षी ह्मणजे इ० स० १७७२ त आपणांस मराठ्यांच्या जाचांतून सोडविण्याचा प्रयत्न केला होता. परंतु त्यांनीं त्याचा पराभव केला. त्याच वर्षी माधवराव निवर्तला. तो स्वभावानें फार चांगला होता. ह्याचे वेळेस उत्तरेंतल्या व दक्षिणेंतल्या एकंदर मराठी राज्याचें उत्पन्न सात कोटींचें होतें. ह्याचे मागें ह्याचा भाऊ नारायणराव हा पेशवा झाला.

ह्या सुमारास हिंदुस्थानांतील मुलखाच्या राज्यकारभाराविषयीं विलायतेमध्यें पार्लमेंत सभेंत पुष्कळ विचार होऊन इ० स० १७७३ त एक नवा कायदा ठरला, त्याचें नांव रेग्युलेतिंग आक्त. त्यांतील मुख्य कलमें येणेंप्रमाणें:—१ बंगाल्याच्या गव्हरनरास गव्हरनर जनरल ह्मणावें; त्याला चार कौन्सिलर (मंत्री) असावे; व त्याचा हुकूम मुंबई व मद्रास येथील गव्हरनरांवर चालावा. २ कलकत्त्यास एक मोठी अदालत असावी; तिजवर गव्हरनर जनरलाचा हुकूम चालूं नये; व तींत एक मुख्य आणि तीन मदतगार जड्ज असावे. ३ हींतल्या कामगारांची नेमणूक इंग्लंदच्या राजानें करावी. ४ कामगारांनीं नजराणा घेऊं नये व व्यापार करूं नये. इत्यादि अनेक कलमें होतीं. ह्याच्या पूर्वीं एक वर्ष वारन् हेस्तिंग्स् साहेब कलकत्त्यास गव्हरनर होऊन आला होता. तेव्हां तोच पहिला गव्हरनर जनरल होय.

मराठ्यांनीं शाहाआलमास दिल्लीपति केल्यावर त्यांनीं इ० स० १७७३ ह्या वर्षी रोहिलखंडावर स्वारी केली. तेव्हां रोहिले लोकांचा सरदार जाबताखान ह्यानें त्यांशीं कांहीं वेळ लढून, उपाय चालेना तेव्हां शेवटीं अयोध्येचा नवाब सुजाउद्दवला ह्याचा आश्रय धरिला; व इंग्लिशांच्या सल्ल्यानें त्याशीं तह ठरविला. त्यांत असें होतें कीं, सुजाउद्दवल्यानें मराठ्यांच्या हल्ल्यांपासून रोहिल्यांचें रक्षण करावें; व त्याबद्दल त्यांनीं त्यास दहा लक्ष रुपये रोख, व तीस लक्ष रुपये तीन वर्षां-

नीं द्यावे. परंतु मराठे प्रथम रोहिलखंडांतून आपोआप निघून गेले, व पुनः आले तेव्हां हाफिज रहिमत नामक रोहिल्यांच्या सरदारानें त्यांस पुष्कळ द्रव्य देऊन मागें परतविलें. तेणेंकरून सुजाउद्दवला ह्याच्या साह्याचें कारणच पडलें नाहीं. तेव्हां अर्थात् रोहिल्यांकडून त्यांस रक्कम पोहोंचली नाहीं.

पुण्यांत नारायणराव पेशवा गादीवर बसल्यास आठ महिने पुरे झाले नाहींत तोंच, त्यास त्याचा चुलता राघोबादादा ह्यानें, इ० स० १७७३ च्या आगष्ट महिन्याच्या तिसऱ्या तारखेस मारेकऱ्यांचे हातून ठार मारविलें, आणि पेशवाईची गादी आपण घेतली. परंतु दरबारचे लोक राघोबास अनुकूल नव्हते. ह्यामुळें, तो सैन्यासहवर्तमान बाहेर स्वारींत असतां, नारायणरावाची स्त्री गंगाबाई, नवरा निवर्तला तेव्हां गरोदर होती, ती तारीख १८ एप्रिल सन १७७४ रोजीं पुत्र प्रसवली; तो ४० दिवसांचा झाल्याबरोबर त्यास सवाईमाधवराव असें नांव ठेवून, कारभारी सखाराम बापू, त्रिंबकराव मामा व नाना फडनवीस, ह्यांनीं गादीवर बसविलें.

कबूल केलेली रक्कम रोहिले देईनात, ती उगवून घेण्यासाठीं त्यांजवर स्वारी करावी, असा विचार मनांत आणून, अयोध्येचा नवाब सुजाउद्दवला ह्यानें त्या कामीं इंग्लिशांची मदत मागितली. वारन हेंस्तिंग्स् साहेबानें ह्या वेळेपूर्वीं नुकतेच अलाहाबाद व कोरा हे प्रांत द्रव्याच्या अडचणीस्तव पन्नास लाख रुपये घेऊन, त्या नवाबास विकले होते. तरी, आणखी पुष्कळ पैसा पाठवून देण्याविषयीं विलायतेहून सक्त हुकूम आला होता. ह्मणून, वर सांगितलेलें नवाबाचें ह्मणणें त्यानें तत्काळ मान्य केलें. त्यांत उभयपक्षानुमतें असें ठरलें कीं, नवाबानें लष्कराचा खर्च परस्पर भागवून, लढाई संपतांच चाळीस लक्ष रुपये इंग्लिशांस द्यावे. इंग्लिश सैन्याचा सेनापति चांपियन हा होता. ही स्वारी इ० स० १७७४ च्या एप्रिल महिन्यांत झाली. तेव्हां समरांगणीं हाफिज़ रहिमत व २,००० रोहिले प्राणांस मुकले; आणि फैजुल्लाखान नामक सरदार शरण आला. नंतर इंग्लिशांची फौज तेथून परतली. रोहिलखंड सुजाउद्दवल्याचे अंकित झालें. केवळ द्रव्याकडे नजर देऊन गरीबांवर हल्ला करण्यास वारन हेस्तिंग्स् ह्यानें आपलें सैन्य दिलें.

इकडे आपणास पेशवाईची गादी मिळावी ह्मणून राघोबादादा, ह्मणजे पहिल्या बाजीरावाचा पुत्र, ह्यानें मुंबई सरकाराशीं, इ० स० १७७५ त सुरत येथें तह ठरवून, वसई, साष्टी बेट, व गुजराथचा कांहीं भाग ह्मणजे सुमारें सवाएकुणीस लक्ष वसुलाचा प्रांत देऊं करून साह्य मागितलें. तें त्यास तत्काळ मिळालें. परंतु गव्हर्नर जनरलास तें कृत्य अगदीं अयोग्य वाटल्यावरून, त्यानें तें साह्य द्यावयाचें नाहीं असें ठरविलें; आणि आप्तन साहेबाच्या द्वारें गादीवरच्या पेशव्यांशीं (सवाई माधवरावसाहेबांशीं) पुरंदर येथें इ० स० १७७६ त तह ठरविला. त्यावरून असें ठरलें कीं, इंग्लिशांनीं राघोबादादाचा पक्ष सोडावा; परंतु साष्टीबेट आपणांकडे ठेवावें. ह्याशिवाय इंग्लिशांस बराच लाभ झाला. नंतर राघोबादादा, निराश होऊन आपले सर्व फौजेस फांटा देऊन, दरमहा २५,००० रुपये नेमणूक ठरवून घेऊन, कोंपरगांवीं जाऊन स्वस्थ राहिला, तो तेथेंच इ० स० १७८३ त निवर्तला. त्यास दोन पुत्र होते; एक बाजीराव आणि दुसरा चिमणाजी आपा.

## भाग नववा.

### पेशव्यांशीं पुनः तह.-सालप्याचा तह.-टिपूचा शेवट-इ०

इ० स० १७७९ पासून इ० स० १८०० पर्यंत.

पेशवे व इंग्लिश ह्यांच्यामध्यें पुरंदर मुक्कामीं तह ठरला खरा; तरी इंग्लिशांनीं राघोबादादाचा पक्ष पुनः धरला, आणि सदाशिवराव भाऊ पाणिपतच्या लढाईत खरोखर मारला गेला असतां, त्याचा तोतया कोणी एक मनुष्य उत्पन्न झाला होता, त्यास साह्य दिलें, ह्यावरून पेशव्यांच्या दरबारचा मुख्य कारभारी नानाफडनवीस, ह्याचें मन त्यांविषयीं शुद्ध नव्हतें. ह्मणून तो सेंट लूबन ह्या फ्रेंच सरदाराच्या युक्तीस अनुकूल होऊन त्याच्या साह्यानें इंग्लिशांस दाबांत ठेवण्याची मसलत करूं लागला. ही बातमी त्यांस समजतांच त्यांनीं बंगाल्याहून व मुंबईहून आपलें सैन्य पुण्यावर पाठविलें. त्याचा पराभव वडगांवानजीक[१] इ० स० १७७९ च्या आरंभीं मराठ्यांच्या लष्करानें केला. नंतर पुष्कळ द्रव्य, व आपले अमलांतील थोडासा प्रदेश देण्याच्या कबुलायतीनें

१ पुण्याच्या आग्नेयीस १० कोस आहे.

त्यांनीं मराठ्यांशीं तह ठरविला. त्या तहावरून इ० स० १७७३ ह्या वर्षापासून जीं ठाणीं वगैरे इंग्लिशांच्या हातीं लागलीं होतीं, तीं त्यांनीं परत द्यावीं आणि दोन गृहस्थ ओलीस पाठवावे असें ठरलें.

आग्र्याच्या दक्षिणेकडे कांहीं प्रांत गोहदच्या राण्याच्या अमलांत होता. त्यांत शिरून मराठ्यांनीं त्यास उपद्रव दिला, व ग्वाल्हेरही घेतली. तेव्हां राण्यानें इंग्लिशांपाशीं साह्य मागितलें. तें त्यास त्यांनीं तत्काळ दिलें. तेव्हां अर्थातच इंग्लिश आणि मराठे ह्यांचें युद्ध लागलें. इ० स० १७८० च्या आगष्ट महिन्यांत पाफम साहेबानें ग्वाल्हेर माघारी घेतली. ह्याशिवाय उभयपक्षांच्या आणखीही पुष्कळ झटापटी उडाल्या. शेवटीं, इ० स० १७८२ च्या मे महिन्याच्या १७ व्या तारखेस सालपें[१] मुक्कामीं इंग्लिश व मराठे ह्यांचा तह ठरला. त्या वेळेस कंपनी सरकारतर्फे अंदरसन साहेब, व पेशवे वगैरे मराठ्यांच्या वतीचे महादजी शिंदे हे तेथें होते. ह्या तहावरून पूर्वीं नुकताच काबीज केलेला मुलूख इंग्लिशांस सोडून द्यावा लागला. ह्या तहानें मराठ्यांच्या पहिल्या लढाईचा शेवट झाला.

इ० स० १७६९ त मद्रासेजवळ हैदर व इंग्लिश ह्यांजमध्यें जो तह झाला, त्यामध्यें असें होतें कीं, संकटसमयीं इंग्लिशांनीं हैदरास साह्य करावें. परंतु, मराठे त्याच्या मुलखांत शिरले तेव्हां इंग्लिश लोक स्वस्थ राहिले. हा विश्वासघात हैदरास न साहून, त्यानें निजाम व फ्रेंच ह्यांची मदत घेऊन, एक लक्ष सेना, व १०० तोफा इतक्यांसहवर्तमान, इ० स० १७८० च्या जुलै महिन्यांत अर्काटावर हल्ला केला. तरी मद्रासचे इंग्लिश लोक स्वस्थ राहिले. हैदर, गांवांचे गांव जाळून उद्ध्वस्त करूं लागला, तेव्हां ते जागे झाले. नंतर, हेक्टर मनरो व बेली ह्या सरदारांचे हाताखालीं मोठें सैन्य देऊन त्यांस हैदरावर पाठविलें. परंतु, कांचीच्या नजीक हैदरानें त्यांचा अगदीं पराभव केला. ह्याखेरीज मध्यंतरीं पुष्कळ चकमकी झडल्या. नंतर वारन हेस्तिंग्स् ह्यानें कलकत्त्याहून सर ऐरकूट ह्यास मोठ्या सैन्यासहवर्तमान हैदरावर पाठविलें. नंतर तारीख १ माहे जुलै सन १७८१ रोजीं पोर्तोनोवो[२] येथें उभयपक्षांचें तुमुल युद्ध झालें. त्या समयीं हैदर इतका

१ हा गांव ग्वाल्हेरच्या आग्नेयीस १६ कोसांवर आहे.

२ पोंदिशरीच्या दक्षिणेस १६ कोसांवर आहे.

पराभव पावला कीं, त्यास पळ काढावा लागला. त्याचे १०,००० लोक समरांगणीं पडले, इंग्लिशांकडचे फक्त ३०६ मात्र जायां झाले. शिवाय, पोल्लिलोर आणि शोलिंगगड येथच्या लढायांतही त्याचा पराभव झाला; तरी तो त्यांशीं लढतच होता. शेवटीं, तारीख ७ माहे दिसेंबर सन १७८२ रोजीं हैदर ऐशीं वर्षांचा होऊन मरण पावला. नंतर त्याचा मुलगा टिपू साहेब हा त्याचे गादीवर बसला.

इतक्यांत इंग्लिशांची व डचांची लढाई लागून इंग्लिशांनीं नागापट्टण आणि त्रिकोमाली हीं डच लोकांचीं ठाणीं घेतलीं. इकडे गव्हर्नर जनरल वारन् हेस्तिंग्स् साहेब ह्यास पुष्कळ द्रव्य पाठवून देण्याविषयीं विलायतेहून फार सक्तीचे हुकूम आल्यावरून, त्यानें न्यायान्याय न पाहातां द्रव्य जमा करण्यास आरंभ केला. तो असा.– काशीचा राजा चैतसिंग ह्याजपाशीं त्यानें दोन वर्षे खंडणीचा पैसा ठरावापेक्षां पुष्कळ अधिक मागितला. तो त्यानें भिऊन बिनतकरार दिला. त्याहूनही ज्यास्ती पैसा पाठवून देण्याविषयीं हेस्तिंग्स् साहेबानें त्यास हुकूम केला. तेव्हां तो अमळसा कुरकुरूं लागला; आणि तो इंग्लिशांच्या शत्रूंशीं गुप्तपणें पत्रव्यवहार ठेवितो असा त्याला संशय आला; त्यावरून हेस्तिंग्स् साहेब इ० स० १७८१ च्या आगष्ट महिन्यांत स्वतः काशीस गेला; आणि काशीच्या लोकांशीं झटापटी होऊन बराच रक्तपात झाल्यानंतर, त्यानें चैतसिंगास गादीवरून काढून, त्याच्या बहिणीच्या मुलास राज्यावर बसविलें. त्यानें गव्हरनर जनरलास ४०,००,००० रुपये खंडणी देण्याचें कबूल केलें, आणि त्याच्या मुलखांतल्या रयतेचे इनसाफ इंग्लिश अंमलदारांनीं करावे, असें ठरलें.

दुसरा एक जुलूम हेस्तिंग्स् साहेबानें केला. तो असा कीं, अयोध्येचा दुर्बल नबाब असफउद्दवला ह्याजपाशीं स्वतः तर पैसा नव्हताच; पण त्याच्या आया फार सधन असत. त्यांजवर चैतसिंगास साह्य केल्याचा आरोप आणून. फार सक्ती करून, त्यांजपासून इ० स० १७८२ ह्या वर्षी त्यानें एक कोटि वीस लक्ष रुपये काढिले.

टिपू गादीवर बसला ह्मणून वर लिहिलें. तो आपल्या बापाप्रमाणें इंग्लिशांशीं वैरभावानें वागूं लागला. त्यानें कर्नल माथ्युस साहेबाचा

पराभव करून त्यापासून, इ० स० १७८३ त वेदनूरचा किल्ला घेतला, व त्यांतले इंग्लिश लोक धरून ह्मैसूर येथें नेऊन प्रतिबंधांत ठेविले. मंगळुरासही टिपूनें वेढा घातला होता; परंतु तेथच्या क्यांबेल नामक इंग्लिश सरदारानें मोठ्या शौर्यानें आपलें नांव राखिलें. ह्याखेरीज आणखी कितीएक वेळां उभयपक्षांच्या गांठी पडून झटापटी झाल्या. त्यांनीं टिपू अगदीं त्रासून गेला; आणि त्यानें इ० स० १७८४ च्या मार्च महिन्यांत इंग्लिशांशीं तह केला. त्यांत असें ठरलें कीं, लढाई सुरू झाल्यावर जो एकमेकांचा मुलूख एकमेकांनीं घेतला असेल, तो ज्याचा त्यास परत मिळावा. ह्यास मंगळूरचा तह ह्मणतात; ह्यानें ह्मैसूरच्या दुसऱ्या लढाईचा शेवट झाला.

वारन् हेस्तिंग्स् इ० स० १७८५ च्या मार्च महिन्यांत आपलें गव्हर्नर जनरलाचें काम सोडून विलायतेस निघून गेला. त्याजवर लांच खाल्याचे व अन्याय केल्याचे अनेक खटले उपस्थित करून, त्याच्या वैऱ्यांनीं त्यास छळिलें; तरी तो स्वराजहितकर्ता होता. एवढ्यावरून तो दोषमुक्त झाला. ह्याचे मागून लार्ड कार्नवालिस साहेब गव्हर्नर जनरल होऊन आला. त्यानें इ० स० १७८८ या वर्षीं निजामाकडून गंतूर परगणा घेऊन त्याचे राज्यांत आपली फौज ठेविली.

इ० स० १७८७ ह्या वर्षीं टिपूनें मलबार प्रांतावर स्वारी[१] करून तेथील नेर लोकांस जुलुमानें मुसलमान केलें.

इंग्लिश सरकारचा दोस्त त्रावणकोरचा राजा, ह्याजवर इ० स० १७८९ त टिपूनें हल्ला केला. त्यांत त्याला कांहीं लाभलें नाहीं; परंतु चांगली तयारी करून त्यानें त्रावणकोरवर पुनः हल्ला केला, आणि इ० स० १७९० ह्या वर्षीं तें घेतलें. पण तेणेंकरून इंग्लिशांशीं मात्र पुनः वैर पडलें; आणि उभयपक्षांची लढाईची तयारी झाली. त्याच वर्षीं मेदोस नामक इंग्लिश सरदार सैन्यासहवर्तमान टिपूच्या प्रांतांत शिरला. टिपूनेंही इंग्लिशांच्या दोन टोळ्यांचा दोन जागीं पराभव केला.

टिपू उत्तरोत्तर प्रबळ होत चालला; तेव्हां लार्ड कार्नवालिस ह्यानें

१ हें ठिकाण हिंदुस्थानाच्या पश्चिम किनाऱ्यावर मंगळूरच्या उत्तरेस सुमारें २७ कोसांवर आहे.

मराठे व निजाम ह्यांशीं सल्ला करून त्यांच्या साह्यानें, इ० स० १७९२ च्या फेब्रुआरी महिन्यांत श्रीरंगपट्टणावर हल्ला केला. ह्या मोहिमींत परशुरामपंत भाऊ पटवर्धन व बापू गोखले हें पेशव्यांचे सरदार होते. टिपूजवळ ५०,००० पांयदळ, ५,००० स्वार, व ४०० तोफा इतकी रणसामग्री होती. उभयपक्षांच्या अनेक लढाया होऊन शेवटीं शत्रु हटला; आणि त्यानें तहाचें बोलणें लाविलें. तें इंग्लिशांनीं मान्य केलें. तेव्हां असें ठरलें कीं, टिपूनें आपलें अर्धे राज्य इंग्लिशांस द्यावें; तीन कोटि रुपये लढाईचा खर्च द्यावा; तीस लक्ष रुपये मराठ्यांस द्यावे; व जे इंग्लिश लोक त्याचे प्रतिबंधांत असतील, त्यांची सुटका करावी; आणि आपल्या मुलांपैकीं दोन मुलगे ओलीस द्यावे. त्याप्रमाणें निमें राज्य आलें. त्यापैकीं तुंगभद्रेच्या उत्तरेकडचा मुलूख मराठ्यांस दिला; गजकोट व कड्यापा हे प्रांत निजामास दिले; आणि बारामहाल, व दिंदिगल हे प्रांत आणि घांटाखालचे मलबार व कानडा हे प्रांत, इंग्लिशांनीं आपणांकडे घेतले. ह्या तहानें म्हैसूरच्या तिसऱ्या लढाईचा शेवट झाला.

नंतर कार्नवालिस साहेबानें अर्काटच्या नबाबाशीं नवा तह ठरविला. त्यावरून असें झालें कीं, नऊ लक्ष वराई खंडणी नबाबानें इंग्लिशांस द्यावी; लढाईचे वेळीं आपल्या सर्व मुलूखाची व्यवस्था इंग्लिशांकडे ठेवावी; आणि खंडणीचा ऐवज वक्तशीर न आल्यास तितक्यापुरता मुलूख त्यांनीं जप्त करून घ्यावा. ह्या गोष्टी त्या नबाबानें कबूल केल्या.

इतक्यांत इ० स० १७९३ ह्या वर्षीं युरोपामध्यें फ्रेंच व इंग्लिश ह्यांची लढाई सुरू झाल्याचें वर्तमान आलें. ही संधि पाहून इंग्लिशांनीं फ्रेंचांची पोंदेशरी घेतली.

ह्या गव्हर्नर जनरलाचे कारकीर्दींत महादजी शिंदा प्रबल झाला. त्यानें प्रयागाचे उत्तरेकडचा व पश्चिमेकडचा प्रांत घेतला; दिल्लीच्या शाहाआलम बादशाहास गुलामकादिराच्या जाचांतून सोडवून आपल्या ताब्यांत ठेविलें; आणि फ्रेंच लोक आपल्या सैन्यांत अंमलदार नेमून लष्कराची तयारी चालविली. परंतु तो इ० स० १७९४ ह्या वर्षीं पुण्याजवळच्या वानवडी ह्या गांवीं मरण पावला.

लार्ड कार्नवालिस गव्हर्नर जनरलाचें काम सोडून इ० स० १७९३ ह्या वर्षीं स्वदेशीं निघून गेला. त्यानें हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या मुलूखांत फार चांगली व्यवस्था ठेविली. जिल्ह्यांनिहाय जज्ज व कलेक्टर नेमिले, व वसुलाची शिस्त चांगली लावून दिली. बंगाल्यांतील जमीनदार लोकांचे हक्क कार्नवालिसनें कबूल केले. आणि त्यांजकडून यावयाच्या जमिनीच्या साऱ्याची रकम ठरवून टाकिली. कंपनीच्या नोकरांस पगार थोडा असल्यामुळें ते लांच खात, हा प्रकार त्यांचे पगार वाढवून त्यानें बंद केला. त्याचे वेळीं इंग्लिशांचे मुलूखाचा वसूल सुमारें तीस एकतीस लक्ष रुपये होता. शिवाय मिठाच्या वगैरे मक्त्यांचें उत्पन्न सुमारें पस्तीस लक्ष रुपये येत असे. ह्याचे मागें सर जान शोर नामें साहेब गव्हर्नर जनरल झाला.

आपल्या लोकांत खर्ड्याची[1] लढाई ह्मणून जी प्रसिद्ध आहे, ती, चौथाईच्या प्रकरणावरून, मराठे, व निजाम ह्यांच्या मध्यें इ० स० १७९५ त झाली. त्या वेळीं मराठ्यांकडे दौलतराव शिंदा, तुकोजी होळकर, गोविंदराव गायकवाड, वगैरे पुष्कळ सरदार होते. त्यांचें एकंदर लष्कर एक लक्ष तीस हजार होतें, व शिवाय दहा हजार पेंढारी होते. निजामाकडे एक लक्ष दहा हजार फौज होती. मराठ्यांनीं निजामाचा मोड केला. आणि त्यापासून तीन कोट रुपये स्वारीचा खर्च, शिवाय पस्तीस लक्षांचा मुलूख, आणि दौलताबाद हीं घेतलीं. तेव्हां पेशवाईच्या गादीवर सवाईमाधवराव असून, त्याचा सर्व राज्यकारभार नाना फडनवीस पहात असे. हा पेशवा, इ० स० १७९५ च्या अक्तोबर महिन्यांत माडीवरून खालीं कारंजावर उडी टाकून मरण पावला. नंतर पुण्यांत बरेंच कारस्थान होऊन राघोबादादाचा पुत्र बाजीराव हा दौलतराव शिंद्याच्या साह्यानें पेशव्यांचे गादीवर बसला.

रोहिल्यांचा सरदार फैजुल्लाखान मरण पावला. त्याचा वडील पुत्र महमदअली ह्यास त्याचा धाकटा भाऊ गुलाम महमद ह्यानें मारून टाकून गादी बळकाविली. त्यास इंग्लिशांनीं काढून टाकून फैजुल्लाखानाचें सर्व द्रव्य अयोध्येचा नवाब असफउद्दवला ह्यास दिलें. तो नवाबही पुढें लवकरच निवर्तला. नंतर त्याचा पुत्र वजीरअली हा इ० स०

१ अहमदनगर जिल्ह्यांत जामखेड तालुक्यांत आहे.

१७९७ त इंग्लिशांच्या सल्ल्यानें नबाबाचें पद पावला. परंतु हा अस्सल मुलगा नव्हे, असा बोभाट झाल्यावरून त्याची रयत फार नाखुषे झाली. ह्मणून गव्हरनर जनरलानें त्यास पदच्युत करून, असफउद्दवल्याचा भाऊ सादतअल्ली ह्यास तो अधिकार दिला. त्याबद्दल त्यानें इंग्लिशांस बारा लक्ष रुपये द्यावे; त्यांची दहा हजार फौज आपले चाकरीस ठेवावी; तिच्या खर्चाबद्दल दरसाल ७६ लक्ष रुपये त्यांस द्यावे; परराज्यांशीं संबंध बिलकूल राखूं नये; आणि इतर युरोपियन लोक जवळ बाळगूं नयेत; असा तह, इ० स० १७९८ च्या जानेवारी महिन्यांत ठरला.

इ० स० १७९८ त सर जान शोर साहेब आपलें काम सोडून विलायतेस गेला. त्याचे जागेवर मार्क्विस ऑफ् वेल्सली हा गव्हरनर जनरल होऊन आला. तेव्हां टिपू इंग्लिशांचा घात करण्याच्या बुद्धीनें इतर संस्थानिकांशीं मसलती करीत आहे, असें पक्कें वर्तमान त्यास समजलें. तेव्हां त्यानें तत्काळ युद्धाची तयारी केली. तो लागलाच मद्रासेस आला; आणि अर्काटाहून व निजामाकडून सैन्यें आणून एकंदर सुमारें ३०,००० फौज त्यानें जमविली. तिजवर हारिस साहेब मुख्य नेमिला. शिवाय जनरल स्तुअर्त हा एक सरदार मुख्य नेमिला होता. स्तुअर्तच्या सैन्यानें सिडासुर येथें व हारिसच्या सैन्यानें मालवेली येथें टिपूच्या फौजेचा पराभव केल्यावर, हें प्रचंड सैन्य लढत लढत टिपूची राजधानी श्रीरंगपट्टण हिजपाशीं येऊन थडकलें. त्यानें मोठ्या शौर्यानें तारीख ४ माहे मे सन १७९९ रोजीं तें शहर घेतलें. तें घेतांना जी हाणामारी झाली तींत टिपू पडला. नंतर त्याच्या गादीवर कोणी प्राचीन हिंदु कुळांतला एक पुरुष बसवून त्याजकडे टिपूच्या राज्यांपैकीं तेरा लक्षांचा मुलूख दिला, व बाकीचा इंग्लिशांनीं आपणांकडे घेतला; आणि त्यांतला थोडासा निजामास दिला. ह्याप्रमाणें टिपूच्या राज्याचा शेवट इ० स० १७९९ च्या मे महिन्यांत झाला. हा ह्मैसूरच्या चौथ्या लढाईचा शेवट होय.

ह्या वेळेच्या सुमारास लार्ड वेलस्ली यानें एतद्देशीय संस्थानांस मुठींत आणून ठेवण्याची एक नवीन युक्ति काढिली. ती युक्ति अशी. संस्थानांबरोबर एक तह करून घ्यावयाचा. त्या तहांत संस्थानानें इंग्लि-

शांचें स्वामित्व कबूल करावयाचें, इंग्लिश फौज संस्थानाच्या तिजोरींतून खर्च देऊन आपल्या संस्थानांत ठेवावयाची, आणि संस्थानानें बाहेरच्या लोकांशीं मुळींच संबंध ठेवावयाचा नाहीं. असा तह निजामानें इंग्लिशांशीं इ० स० १७९८ ह्या वर्षी केला. परंतु नाना फडनविसास असल्या तहाचें इंगित समजल्यामुळें मराठे असल्या तहापासून अलिप्त राहिले.

## भाग दाहवा.

### मराठ्यांशीं लढाया—तह—इत्यादि.

#### इ० स० १८०० पासून इ० स० १८०६ पर्यंत.

तंजावरचा राजा तुळजाजी मरण पावला, आणि त्याचा औरस पुत्र अमरसिंग हा इंग्लिशांच्या सल्यानें गादीवर बसला पुढें त्याचें आचरण इंग्लिशांस न आवडल्यामुळें त्यांनीं त्यास पदच्युत करून, त्याचा दत्तक बंधु सरफोजी ह्यास राज्यावर बसविलें. त्या समयीं गव्हरनर जनरलानें असा ठराव केला कीं, सरफोजी ह्यानें नामधारी राजा होऊन नेमणूक घेऊन रहावें; व त्याच्या राज्याचा सर्व कारभार इंग्लिशांनीं पाहावा. हा ठराव तारीख २५ अक्तोबर सन १७९९ रोजीं झाला. ह्या प्रकारेंकरून तंजावरचें राज्य इंग्लिशांच्या हातीं आलें.

अफगाणांचा बादशाह शहाजमान ह्यानें इ० स० १८०१ ह्या वर्षी हिंदुस्थानावर स्वारी केली. तेव्हां अयोध्येचा नबाब सादत अल्ली हा घाबरून, स्वसंरक्षणार्थ इंग्लिशांपाशीं साह्य मागूं लागला. त्यापासून १,३५,२३,४७४ रुपये वसुलाचा मुलूख मदतीबद्दल घेऊन त्यांनीं त्याचें ह्मणणें मान्य केलें. ह्याच सुमारास फरक्काबादच्या[१] नबाबाचा भागीरथीच्या कांठचा सुमारें साडेदहा लाखांचा मुलूख आपणांकडे घेऊन इंग्लिशांनीं त्यास सालीना ८०,००० रुपयांची नेमणूक करून दिली.

तिकडे अर्काटचा नबाब उमदत उलउमराव हा दंग्याचे वेळीं टिपूस साह्य करीत होता, अशा आरोपावरून इंग्लिश सरकारानें त्याची चौकशी चालविली. कांहीं शाबिदी त्याजवर झाली, इतक्यांत तो इ० स० १८०१ ह्या वर्षी मरण पावला. तेव्हां त्याचा पुत्र अल्ली हुसेन हा नेमणूक पतकरून राज्य सोडण्यास कबूल न होई; सबब, तो

१ हें शहर आग्र्याच्या पूर्वेस आहे.

नबाबाचा मुलगाच नव्हे असें गव्हर्नर जनरलाच्या अभिप्रायानें ठरवून, उमदत उमरावाचा भाऊ अजीमउद्दवला ह्यास इंग्लिशांनीं गादीवर बसविलें; आणि मुलखाच्या उत्पन्नांतून खर्च वजा जाऊन बाकी राहील तिचा एकपंचमांश त्यानें नेमणूक घेऊन फक्त राजा नांव धारण करून स्वस्थ रहावें, असें ठरविलें. ह्या प्रकारेंकरून इंग्लिशांनीं त्याचा मुलूख आपणांकडे घेतला.

सुरतचा किल्ला इ० स० १५४३ त बांधिला होता. तेथील नवाब इ० स० १७९९ त मेला. त्याचेही गादीविषयीं वाद पडला. तेव्हां वारस मीर नासरुद्दीन ह्यास सालीना एक लक्ष रुपयांची नेमणूक करून देऊन त्याचा मुलूख इंग्लिशांनीं आपल्या ताब्यांत घेतला.

होळकराची मूळ गादी स्थापणार मल्हारराव हा ७६ वर्षांचा होऊन इ० स० १७६५ त मरण पावला. तेव्हां त्याच्या राज्याचें उत्पन्न ७५,००,००० रुपयांचें होतें. त्याची सून अहिल्याबाई, हिनें तुकोजी नामक पुरुषास आपल्या राज्याचा अधिकार दिला. ती साठ वर्षांची होऊन, आणि आपल्या राज्याचा कारभार तीस वर्षेपर्यंत उत्तम रीतीनें चालवून, इ० स० १७९५ त निवर्तली. पुढें इ० स० १७९७ त तुकोजी वारला. त्याला चार पुत्र होते काशीराव आणि मल्हारराव हे लग्नाच्या बायकोचे; व विठोजी आणि यशवंतराव हे राखेच्या पोटचे. त्यांपैकीं काशीराव हा राज्याचा उपभोग करूं लागला. त्याला मल्हारराव हा शत्रु उत्पन्न झाला. ह्या भावांचा वाद पुण्यास पेशव्यांचे दरबारीं गेला. तेथें, सन १८०० च्या मार्च महिन्यांत, एकसारखीं २५ वर्षे आपल्या कर्तबगारीनें मराठी राज्याचें हित करून, नानाफडनवीस मरण पावला होता, आणि बाजीरावाचा सगळा कारभार दौलतराव शिंदा पाहात असे. त्यानें काशीरावाकडून पुष्कळ पैसा खाऊन त्याचा पक्ष खरा ठरविला; व मल्हाररावावर गर्दी करून त्यास ठार मारविलें. हें पाहातांच विठोजी व यशवंतराव हे पळून गेले. तरी विठोजीस धरून आणून बाजीरावानें त्यास हत्तीच्या पायीं देऊन त्याचा प्राण घेतला. बाकी राहिला यशवंतराव,[१] त्यानें मल्हाररावाचा मुलगा खंडेराव त्याचा पक्ष धरून धारचा पवार व अमीरखान

१ हें इंदूरच्या पश्चिमेस आहे.

पठाण ह्यांचे साह्यानें ६०,००० फौज जमवून एकाएकीं इंदुराजवळ तळ दिला. तेथें तारीख १४ माहे अक्टोबर सन १८०१ रोजीं शिंद्याच्या व त्याच्या लष्करामध्यें लढाई झाली. तींत होळकर पराभव पावला. त्याच्या पुढच्या वर्षी पुनः फौज जमवून होळकरानें पुण्यावर स्वारी केली. तेव्हां त्यास यश आलें. हें पाहून बाजीराव पेशवा भयभीत होऊन पुण्यांतून पळून गेला. त्यानें नीट कोंकणची वाट धरिली. इकडे पुणें शहरांत होळकरानें बाजीरावाचा भाऊ अमृतराव ह्यास पेशवाईचे गादीवर बसविलें.

आपणास आपली गादी परत मिळावी म्हणून बाजीरावानें साह्यार्थ इंग्लिशांची प्रार्थना केली. ती त्यांनीं मान्य करून त्याशीं तारीख ३१ माहे दिसेंबर १८०२ रोजीं वसई[1] मुक्कामीं तह ठरविला. त्यांत असें होतें कीं, बाजीरावानें इंग्लिशांचीं ६ पलटणें आपल्या चाकरीस ठेवावीं; त्यांच्या खर्चाबद्दल त्यानें त्यांस गुजराथेंत अथवा करनाटकांत २५ लक्षांचा मुलूख द्यावा; त्यानें त्यांच्या सल्ल्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही राजाशीं लढाई किंवा तह करूं नये; आणि इतर कोणत्याही युरोपियन लोकांस चाकरीस ठेवूं नये. ह्या तहानंतर इ० स० १८०३ च्या मे महिन्यांत इंग्लिशांनीं बाजीरावास त्याचे गादीवर बसविलें; पण त्या वेळेपासून मराठी राज्याचें स्वातंत्र्य गेलें. बाजीराव गादीवर येण्यापूर्वीच होळकर आपल्या राज्याच्या बंदोबस्ताकरितां आपल्या देशांत निघून गेला होता. त्यानें जाण्याच्या अगोदर पुणें शहर लुटलें, व लोकांना अनेक प्रकारचीं दुःखें देऊन त्यांपासून पुष्कळ द्रव्य काढून घेतलें.

वसईचा तह बाजीरावानें तरी निरुपायास्तव कबूल केला. तो शिंदा व भोंसला ह्यांस तर मुळींच आवडला नाहीं. तेव्हां अर्थातच त्यांचें व इंग्लिशांचें वांकडें आलें. उभयपक्षांच्या सैन्यांची सिद्धता होऊन युद्धें चाललीं. त्यांत कर्नल वेल्सली ह्मणून जो गव्हर्नर जनरलचा बंधु होता, तो एका टोळीचा मुख्य होता. दिल्ली, लासवारी[2] इत्यादि अनेक जागीं अनेक प्रसंगीं युद्धें चाललीं होतीं. त्यांत अजिं-

---

१ मुंबईजवळ.

२ लासवारी दिल्लीच्या दक्षिणेस ६४ कोस आहे.

ह्याजवळ 'खेळणा नदीच्या तीरीं आसई येथें मोठी लढाई झाली. तेव्हां वेलसली साहेबाजवळ ४,५०० फौज होती, आणि मराठ्यांचें लष्कर ह्या मानानें पाहिलें असतां फारच मोठें, ह्मणजे ५०,००० असून शिवाय १०० तोफा होत्या. तरी त्यांवर एकदम चालून जाऊन कर्नल वेलस्ली ह्यानें त्यांचा अगदीं मोड करून टाकिला. त्यांत मराठ्यांचे १,२०० लोक पडले, आणि ९८ तोफा व ७ बावटे इंग्लिशांच हस्तगत झाले. इंग्लिशांकडचे ४२८ लोक मेले, व १,१३८ जखमी झाले. हें वर्तमान तारीख २३ सप्तेंबर सन १८०३ रोजीं घडलें. पुढें कांहीं दिवसपावेतों त्यांनीं इंग्लिशांशीं वैर चालविलें होतें. परंतु आपण कांहीं केलें तरी ते आपणास आटोपत नाहींत, असें आधीं भोंसल्यास वाटल्यावरून त्यानें त्यांशीं तारीख १७ माहे दिसेंबर सन १८०३ रोजीं देवगांवीं तह केला. त्यांतलीं मुख्य कलमें अशीं.—लढाईमुळें इंग्लिशांचें जें नुकसान व जो खर्च झाला असेल, तो भोंसल्यानें भरून द्यावा; शिवाय कटक प्रांत व बलसोड किल्ला त्यांचे हवालीं करावा; गावलगड व नर्नाळा ह्या किल्ल्यांच्या सभोंवतालचा २६ लक्षांचा मुलूख व इंग्लिशांच्या सरहद्दीपासून पश्चिमेस वर्धा नदीपर्यंत मुलूख निजामास द्यावा; इंग्लिशांखेरीज करून इतर युरोपियन लोक चाकरीस ठेवूं नयेत; आणि भोंसले व इंग्लिश ह्यांचे वकील परस्परांच्या दरबारांत असावे. आणि भोंसले आणि पेशवे यांच्यामधल्या तंट्यांचा निकाल इंग्रज सरकारच्या मर्जीप्रमाणें व्हावा.

पुढें तिसाव्या तारखेस शिरजीअंजनगांवीं शिंद्यानेंही इंग्लिशांशीं तह केला. त्यांत ठराव झाला तो असा.—भागीरथी व यमुना ह्यांचेमधला मुलूख, जयपुर, जोदपूर व गोहद ह्या संस्थानाच्या उत्तरेकडचा मुलूख, व भडोचचा किल्ला व तो प्रांत, इतका मुलूख शिंद्यानें इंग्लिशांस द्यावा; अहमदनगरचा किल्ला व तो प्रांत त्यानें पेशव्यांस द्यावा; अजिंठ्यापासून गोदावरीपावेतों मुलूख निजामास द्यावा; शाहाआलम, पेशवा, निजाम व गायकवाड, ह्यांविषयींचा वैरभाव टाकावा; आणि इंग्लिशांचे शत्रु युरोपियन व अमेरिकन लोक ह्यांस चाकरीस ठेवूं नये. हा मराठ्यांच्या दुसऱ्या लढाईचा शेवट होय.

१ आसई औरंगाबादेच्या उत्तरेस २२ कोस आहे.

शिंदा व भोंसला ह्या प्रकारेंकरून स्वस्थ झाले, तोंपर्यंत होळकरानें कांहींएक गडबड केली नाहीं; परंतु ही लढाई संपतांच त्यानें इंग्लिशांशीं भांडण्यास कंबर बांधिली. त्याच्या व इंग्लिशांच्या सैन्यांच्या, दिल्ली, गोवर्धन, दीग, इत्यादि स्थलीं झटापटी झाल्या. त्यांत जनरल फ्रेजर आणि कर्नल मानसन हे इंग्लिश सरदार मुख्य होते. शिवाय त्यांवर जनरल लेक हा होता. त्यांत होळकराला शिंद्याचें अंग होतें. तरी इंग्लिश सरदारांपुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं.

इतक्यांत मार्किस ऑफ् वेल्सली इ० स० १८०५ च्या जुलै महिन्यांत गव्हरनर जनरलाचें काम सोडून स्वदेशीं गेला. त्याचे जागीं पूर्वींचा गव्हरनर जनरल मार्किस कार्नवालिस हा नेमिला. त्यानें शिंदा व होळकर ह्यांशीं तह ठरविण्याविषयीं जनरल लेक ह्यास लिहिलें. तें काम होण्यापूर्वींच कार्नवालिस साहेब गाजीपुर येथें मरण पावला. त्याचें काम कौंसलचा मुख्य हुद्देदार बार्लो हा पाहूं लागला.

पुढें नोवेंबर महिन्यांत शिंद्याशीं नवा तह ठरला. तो असा:—ग्वाल्हेरी व गोहद हे प्रांत इंग्लिशांनीं शिंद्यास द्यावे; चंबळा नदी ही इंग्लिशांच्या व शिंद्याच्या राज्यांची सीमा असावी; आणि मागच्या तहावरून शिंद्याचा जो मुलूख इंग्लिशांकडे आला होता, त्यांतील त्यानें आपले सर्व हक्क सोडून द्यावे, व त्यांबद्दल त्यास इंग्लिशांनीं दरसाल तीन लाख रुपये द्यावे.

लागलाच पुढें दिसेंबर महिन्यांत होळकरानेंही इंग्लिशांशीं तह केला. त्याचीं मुख्य कलमें येणेंप्रमाणें:—चंबळा नदीच्या उत्तरेकडील मुलूख, बुंदेलखंड, व पुणें, ह्यांवरचा दावा होळकरानें सोडावा; व इंग्लिशांच्या राज्यास उपद्रव न देतां ठरविलेल्या मार्गानें इंदुरास जावें. येथें मराठ्यांची तिसरी लढाई संपली.

इ० स० १८०५–१८०६ ह्या वर्षीं हिंदुस्थानांतील इंग्लिश राज्याचें उत्पन्न सुमारें साडेपंधरा कोटींचें झालें; व खर्च त्याहून थोडा अधिक झाला.

१. मथुरेच्या पश्चिमेस १२ कोस आहे.

२. काशीच्या उत्तरेस आहे.

३

# भाग अकरावा.

## लार्ड मिंतो ह्याची कारकीर्द.

### इ० स० १८०६ पासून इ० स० १८१३ पर्यंत.

इ० स० १८०६ ह्या वर्षी इंग्लिशांच्या काळ्या पलटणींतील शिपायांस विशेष प्रकारें दाढ्या मिशा राखण्याचा व निराळे तऱ्हेच्या पागोट्या बांधण्याचा हुकूम मद्रास इलाख्यांत झाला. तेव्हां सरकार साऱ्या लोकांस जुलमानें खिस्ती करणार, अशी आवाई उठून वेलूरास[१] टिपूचे मुलगे होते, त्यांच्या सामलातीनें, तेथें तारीख १० जुलै रोजीं फौजेंत दंगा झाला. त्यांत ११३ इंग्लिश सरदार व दुसरे अनेक लोक प्राणास मुकले. हा दंगा, अर्काटाहून ४०० लोक बरोबर आणून गिलेप्सी साहेबानें मोडिला. तेव्हां ४०० बंडवाले मारले गेले, व २५० हातीं लागले. नंतर टिपूचे मुलगे तेथून काढून कलकत्यास आणून ठेविले. ह्याप्रमाणें वेलूरच्या दंग्याचा मोड तिकडे होत होता इतक्यांत लार्ड मिंतो नामक साहेबाची योजना गव्हरनर जनरलाचे जागीं झाली. तो इ० स० १८०६ च्या जुलै महिन्यांत कलकत्ता येथें येऊन पोहोंचला.

निजामाचा वजीर मुर्नार उल्मुलुख ह्याचे पदरीं हिशेबी काम पाहणारा चंदूलाल ह्मणून एक कायस्थ ब्राह्मण असे. तो आपले कामांत हुशार होता. परंतु त्यानें इंग्रजांच्या जोरावर प्रजेवर जुलूम चालविला होता. त्यानें इंग्लिशांशीं सख्य ठेवून त्यांच्या मार्फत फौजेच्या वेतनाकरितां वर्षाचे २०,००० रुपये ठरवून तिला इंग्रजी अमलदारांकडून कवाईत शिकविली. प्रजेपासून पैसा जुलमानें काढण्यांत ह्या सैन्याचा त्याला फार उपयोग होत असे. या फौजेसंबंधीं सर्व काम, विलायतसरकारच्या आज्ञेवरून रेसिडेंत पहात असे. पुढें कांहीं इंग्रज व्यापाऱ्यांनीं हैदराबादेस एक पेढी स्थापन करून सगळें निजामाचें राज्य आपल्या ताब्यांत आणण्याचा प्रयत्न चालविला. परंतु हें प्रकरण तेथला रेसिडेन्ट सर विल्यम बेंटिक याच्या नजरेस येऊन त्यानें हा प्रकार बंद करविला, आणि राज्याची चांगली व्यवस्था लाविली.

१. मद्रासचे पश्चिमेस ४० कोस आहे.

फ्रान्सदेशचा बादशाह नेपोलियन बोनापार्ट, ह्यानें इराणांत वकील पाठवून तेथील राजा फत्तेअल्लीशाहा ह्याशीं तह केला. हें गव्हरनर जनरलास समजलें. तेव्हां त्यानें दूरदृष्टीनें त्या राजाशीं, इ०,स० १८०९ त सर जान मालकम ह्यास इराणांत पाठवून आपणही सल्ला ठरविला. तो असा कीं, शाहा जोंपर्यंत रुशियाच्या बादशाहाशीं लढत असेल, तोंपर्यंत त्यास इंग्लिशांनीं दरसाल दाहा लाख रुपये देत जावें; त्याची सेना तयार करण्याकरितां कांहीं गोलंदाज व सरदार त्याजकडे पाठवावे; चोवीस तोफा व सोळा हजार बंदुका त्यास पुरवाव्या; फ्रेंच लोक हिंदुस्थानावर चालून आल्यास त्यानें इंग्लिशांस कुमक करावी; आणि इंग्लिशांच्या शत्रूंस आपल्या राज्यांतून जाण्यास मार्ग देऊं नये. ह्याच वर्षीं मौंतस्तुअर्त एलफिन्स्तन ह्यास काबुलास पाठवून, अफगाणिस्थानाच्या राजाशीं, आणि चार्लस मेटकाफ ह्यास लाहोरास पाठवून शीक लोकांचा प्रतापी राजा रणजितशिंग ह्याशीं मित्रत्वाचे तह ठरविले.

त्रावणकोरच्या[1] राजाचा खर्च कमी होऊन, आपली खंडणी बेताचे बेतावर यावी, ह्या इरायानें त्याच्या कांहीं फौजेस फांटा देण्याविषयीं इंग्लिशांनीं आग्रह धरिला. तो त्याचे दिवाणास आवडला नाहीं. इंग्लिशांचे शिपाई त्यानें आलेपल्ली येथें पकडून बुडवून मारिले; आणखी पुष्कळ दंगा मांडिला. रेसिडेंताच्या बंगल्यावरही तो चाल करावयास चुकला नाहीं. तेव्हां इंग्लिश सैन्यानें त्याशीं लढून इ० स० १८०९ च्या जानेवारी महिन्यांत त्याचा पराभव केला. मग दिवाणानें पळ काढिला. त्याचे मागें इंग्लिश सैन्य लागलेंच होतें; तरी तो हातीं लागला नाहीं. शेवटीं त्यानें आत्महत्या करून घेतली.

बुंदेलखंडांत[2] अनेक संस्थानें होतीं, त्यांच्या राज्यव्यवस्थेकडे पहावयाचें सुद्धां नाहीं, असा इंग्लिश सरकारचा निश्चय होता; पण त्यांतील राजे एकमेकांशीं इतके कलह करूं लागले कीं, त्यांपासून आपले राज्यास कोणते वेळीं काय अपाय घडेल नकळे, असें मिंतो साहेबास वाटलें; ह्मणून त्यानें आपलें सैन्य त्यांजवर पाठविलें. त्याचा मुख्य अधिकारी कर्नल मार्तिंदेल साहेब होता. ह्या सैन्यानें तिकडील अव्यवस्था मोडून टाकून अजगड व कालिंजर हे किल्ले घेतले. अजग-

१. हें बंदर कोचीन आणि कोल्लम ह्यांच्यामध्यें आहे.
२. शिंद्याच्या राज्याच्या पूर्वेस.

डच्या संस्थानेकाचें नांव लक्ष्मणदेव, व कालिंजरच्याचें दर्यावसिंग असें होतें. हें वर्तमान इ० स० १८०९ त घडलें.

हिंदी महासागरांत फ्रेंचांचें बरेंच प्राबल्य होतें. ते त्यांतील मारिशस, बोर्बो आणि राद्रिगुझ ह्या बेटांवर राहून डाव साधेल तेव्हां इंग्लिशांच्या व्यापाराचें नुकसान करीत. इ० स० १८०७ ह्या वर्षाच्या एका दीड महिन्यांत त्यांनीं कलकत्त्यांतील व्यापाऱ्यांचें ३०,००,००० रुपयांचें नुकसान केलें. हा उपद्रव चांगला नव्हे असें गव्हरनर जनरल साहेबास वाटून; त्यानें फ्रेंचांचीं मारिशस व बुर्बो हीं बेटें मोठी फौज पाठवून आपले ताब्यांत घेतलीं. ही गोष्ट इ० स० १८१० त घडली. ह्या बेटांपैकीं मारिशस अद्याप इंग्लिशांच्या ताब्यांत आहे. पुढच्या वर्षीं ह्मणजे इ० स० १८११ त, दच लोकांपासून बटेविया वगैरे ठिकाणें इंग्लिशांनीं जिंकून घेतलीं. तेव्हां तेथले ५,००० दच लोक पाडाव केले.

मिंतो साहेबाच्या कारकीर्दींत, होळकराचा सरदार अमीरखान पठाण ह्यानें पेंढारी ह्मणून लुटारू लोक असत, ते पुष्कळ जमवून, भोंसल्याच्या वगैरे राज्यांत बंडाळी मांडली, व नेपाळच्या राजाचे लोक गोरखपुर व सारण येथील इंग्लिश प्रजेस लुटून त्रासवूं लागले. ह्या दोन्ही गोष्टींचा बंदोबस्त करण्याचा निश्चय गव्हरनर जनरलानें केला; परंतु तो सिद्धीस जाण्याचे आधींच, इ० स० १८१३ त, मिंतो साहेब आपलें काम सोडून विलायतेस निघून गेला. ह्याच वर्षीं आणखी वीस वर्षेपर्यंत हिंदुस्थानचा राज्याधिकार चालविण्याची नवी सनद ईस्त इंदिया कंपनीस मिळाली. तिजवरून चीन देशाशीं व्यापार करण्याचा पूर्ण हक्क जरी पूर्वींप्रमाणें त्या कंपनीकडे राहिला, तरी हिंदुस्थानाशीं व्यापार पाहिजे त्यांनीं करावा, अशी मोकळीक झाली. आणखी हिंदुस्थानांत सरकार ऱ्या खर्चानें ख्रिस्ती धर्मखातें स्थापलें. लार्ड मिंतो ह्याचे जागेवर मार्किस ऑफ् हेस्तिंग्स ह्याची नेमणूक झाली. तो इ० स० १८१४ च्या अक्तोबर महिन्यांत कलकत्त्यास येऊन पोहोंचला.

मिंतो साहेबाच्या वेळीं हिंदुस्थानांत एक देखील जरी मोठी लढाई झाली नाहीं, तरी तो चतुर व मसलती होता हें खचीत. एतद्देशीय विद्येस उत्तेजन देण्याचें त्याचे मनांत होतें. कलकत्त्यास इं-

१. पाटणाच्या पश्चिमेस आहे.

ग्लिश पाठशाळा, व नदिया आणि तर्हुत येथें हिंदु पाठशाळा, व दुसरे कोठें एक मुसलमानी पाठशाळा, अशीं विद्यालयें स्थापण्यासाठीं त्यानें पुष्कळ यत्न केला; पण तो पूर्णपणें सिद्धीस गेला नाहीं. हो पुरुष स्वदेशीं पोहोंचल्यावर अर्ल ऑफ् मिंतो हें महत्पद पावून थोड्क्याच दिवसांनीं, इ० स० १८१४ ह्या वर्षी मरण पावला.

# भाग बारावा.

## नेपाळची लढाई—पेंढारी—इत्यादि.

### इ० स० १८१३ पासून इ० स० १८१८ पर्यंत.

नेपाळची राजधानी कटमंडू येथें कर्मयोधविक्रमशाह हा राजा गादीवर असतां, त्याच्या लोकांनीं इ० स० १८१४ ह्या वर्षी बुतवाल[१] व देवराजे[२] येथील इंग्लिशांचें ठाणें मारिलें. तेव्हां गव्हरनर जनरल मार्किस ऑफ् हेस्टिंग्स ह्यानें त्याचा जबाब त्यास विचारला. तीं ठाणीं आह्मीं तुह्मांस परत देत नाहीं असें त्यानें साफ सांगितलें. त्यामुळें युद्धाचा प्रसंग प्राप्त झाला. तेव्हां गव्हरनर जनरलानें २९,००० कवाईत शिकलेली फौज, ७४ तोफा, व सुमारें १०,००० मुलकी फौज, इतकें सैन्य जमवून त्याच्या चार टोळ्या केल्या. आणि त्यांवर कर्नल ब्रादशा, जनरल मार्ली, कर्नलवुड, गिलेस्पी, आणि कर्नल आक्तरलोनी, हे सरदार नेमिले. हें सर्व सैन्य नेपाळावर रवाना झालें. इकडे नेपाळी सैन्य १२,००० मात्र होतें; आणि तेंही सगळ्या सरहद्दीभर पुष्कळ ठिकाणीं वांटलें गेलें होतें; आणि त्यांच्या तोफाही फार लहान होत्या.

ह्या टोळ्यांनीं कलुंग, जैटक, मलून वगैरे ठिकाणीं गुरखे (नेपाळी) लोकांस लढाया दिल्या. परंतु त्यांपासून ह्मणण्यासारखा विशेप फायदा झाला असें नाहीं. गिलेस्पी हा तर कुलंग किल्ला घेण्याच्या कामांत प्राणांस मुकला. या ठिकाणीं ६०० गुरखे लोकांनीं इंग्रजांकडचे ९०० लोक मारिले; आणि तोफांच्या भडिमाराच्या योगानें आंतल्या गुरखे लोकांपैकीं जेव्हां ७० मात्र बाकी राहिले, तेव्हां त्यांचा सरदार बलिभद्र हा त्यांस बरोबर घेऊन मारामारी करीत इंग्रजांच्या सैन्यांतून पार निघून गेला. जैटक येथें २,३०० गुरख्यांनीं इंग्रजांच्या १५,००० सैन्यास दाबांत ठेविलें होतें. शेवटीं देवथेळ घाटांत नेपाळी फौजेनें

१. हें अयोध्या प्रांतांत आहे. २. नेपाळच्या दक्षिणेस आहे.

इंग्लिश सैन्यास एकाएकीं गांठिलें; तेथें इंग्लिशांचे लोकांनीं शत्रूचा सरदार भगतीथापा ह्यास ठार मारिलें. तेव्हां त्याचा दुसरा सरदार अमरसिंग ह्यानें तहाचें बोलणें लाविलें. तें, पर्जन्यकाळ समीप आला असें पाहून, जनरल आक्तरलोनी साहेबानें मान्य केलें. त्या ठरावावरून असें झालें कीं, यमुना व सतलज ह्या नद्यांमधले सारे किल्ले इंग्लिशांच्या हातीं असावे. दुसरा एक तह कर्नल ब्रादशा व नेपाळी सरदार गुरुराजमिश्र यांनीं ठरविला. त्यांत असें होतें कीं, सरहद्दीच्या ज्या मुलूखाचा तंटा पडला होता, तो, व लढाईत इंग्लिशांनीं घेतलेला मुलूख, हे नेपाळच्या राजानें इंग्लिशांस द्यावे; नेपाळच्या राजानें सिक्किमच्या राजास उपद्रव देऊं नये; कांहीं तंटा पडल्यास इंग्लिशांच्या मार्फत त्याची तोड काढावी; काली नदीच्या पश्चिमेकडील मुलूखावर त्यानें वारसा सांगूं नये; आणि एकमेकांचे वकील एकमेकांचे दरबारीं असावे. हीं वर्तमानें इ० स० १८१५ त घडलीं.

हा तह राजसभेंतील इतर सभासदांत आवडला नाहीं; तेणेंकरून लढाई पुनः उद्भवली. शेवटचा प्रसंग मक्वानपुराजवळ[१] तारीख २८ फेब्रुवारी सन १८१६ रोजीं झाला. तेव्हां नेपाळाकडचा सरदार समशेरराणा ह्याचा पराभव आक्तरलोनी साहेबानें केला. नेपाळी लोक ८०० पडले; इंग्लिशांकडचे ४५ मेले, व १७५ जखमी झाले. तेव्हां नेपाळचा राजा जेरीस आला, व त्यानें पूर्वीं ठरलेल्या तहनाम्यावर सही करून, तो चंद्रशेखरनामक उपाध्याचे हातीं इंग्लिश लष्करांत पाठविला. तो इंग्लिशांस पसंत पडला; आणि युद्ध समाप्त झालें. नंतर थोडक्याच दिवसांनीं नेपाळचा राजा देवी येऊन मृत्यु पावला; आणि त्याचा अल्पवयस्क मुलगा इंद्रविक्रम हा गादीवर बसला. त्याचा सर्व कारभार भीमसिंग हा पाहत असे.

पेंढारी ह्मणून कोणी रानटी लुटारू लोक मध्य हिंदुस्थानामध्यें उठले. त्यांस प्रथमतः शिंदे, होळकर ह्यांचा आश्रय असे. गांवांत शिरावें, घरें जाळावीं, लोकांस राखेचे तोबरे द्यावे, माणसांच्या आंगास चिंध्या बांधून त्यांवर तेल घालून त्या पेटवून द्याव्या, अशा प्रकारें हाल करून लोकांपासून द्रव्य काढावें, असें त्यांचें आचरण असे. पुढें सं-

१. कटमंडूच्या दक्षिणेस.

स्थानिकांस त्यांची गरज नाहींशी झाली, तेव्हां ते देशभर फिरून दंगा करूं लागले. त्यांत गर्दिखान, करीमखान, अमीरखान, छट्टू असे कांहीं मुख्य सरदार होते. त्यांनीं इ० स० १८१६।१७ त इंग्लिशांच्या मुलूखांत शिरून अशी वंडाळी मांडिली कीं, अल्प काळांत त्यांनीं सुमारें तीनशें गांव उजाड करून टाकिले. गंतूर व मेछलीपट्टण ह्या प्रांतांत त्यांची धुमाळी चालली होती, तेव्हां एका आठवड्यांत त्यांनीं ५०५ माणसें जखमी केलीं, आणि ३,६३३ हालहाल करून मारिलीं, असें सांगतात.

ह्या उपद्रवकारक लोकांचा बंदोबस्त करण्याचा निश्चय गव्हरनर जनरल साहेबानें केला; आणि अनेक सरदारांबरोबर फौजा देऊन त्यांस त्यांजवर पाठविलें. तेव्हां उभय पक्षांच्या झटापटी अनेक ठिकाणीं झाल्या. शेवटीं पेंढारी थकले. इ० स० १८१८ ह्या वर्षी करीमखान शरण झाला. तरी छट्टू तसाच भटकत फिरत होता. त्यास रानामध्यें एका वाघानें मारून खाल्लें. आणि अमीरखान टांक हें संस्थान संभाळून स्वस्थ राहिला. त्याचे वंशज अद्यापपर्यंत त्या संस्थानाचा उपभोग घेत आहेत. पुढें लवकरच पेंढाऱ्यांचा दंगा अगदीं मोडला.

राजस्थान ह्मणजे रजपुतस्थान ह्या देशामध्यें जीं अनेक संस्थानें होतीं, त्यांत उदेपुर, जोधपुर, आणि जेपुर हीं बलिष्ठ होतीं. त्यांचीं आपसांत फार वैमनस्यें असत; व तेथील राजे नेहमीं एकमेकांशीं भांडत. उदेपुरचा राणा भीमसिंग ह्याची परमरूपवती कन्या कृष्णाकुमारी, हिजवरून मानसिंग वगैरे राजांनीं केवढाल्या कटकटी केल्या, व त्यांचा परिणाम काय झाला हें सर्व वृत्त विद्यार्थ्यांस माहीत आहेच. हे राजे अनेक कुरापती काढून एकमेकांशीं लढत, तेणेंकरून ते बलहीन झाले. असें पाहून शिंदे व होळकर ह्यांनीं आपला मोर्चा त्यांजकडे फिरविला. तेव्हां ते भ्याले आणि त्यांनीं त्या दोघांच्याही मुठी गच्च भरून, त्यांस माघारें लाविलें.

रजपुत संस्थानांपैकीं, माचेरी येथील राजानें मात्र बरेच दिवसांपूर्वी इंग्लिश सरकाराशीं तह ठरविला होता. बाकी सगळे स्वतंत्र असत. त्यांमध्यें कज्जे व भांडणें शेवटीं इतकीं झालीं कीं, त्यांच्या

---

१. कृष्णेच्या दक्षिणेस आहे. २. हिंदुस्थानाच्या पश्चिम किनाऱ्यावर आहे.

कारभारांत हात घालण्यास गव्हरनर जनरलास संधि सांपडली; आणि त्यांना स्वतांलाही असें वाटलें कीं, इंग्लिश सरकारानें आपली गोष्ट मनास आणिल्यावांचून आपणांस स्वस्थता प्राप्त होत नाहीं. ह्मणून आपले तंटे आपआपसांत न मिटवितां इंग्रज सरकारास मध्यें घालून ते आपल्या स्वातंत्र्यास मुकले. बाकीच्या संस्थानांनीं इंग्रजांचें वर्चस्व पतकरिलें असें पाहून, निरुपाय होऊन, सगळ्यांच्या शेवटीं जैपुरच्या राण्यानें दिल्ली येथील इंग्लिश रेसिडेंतास, इ० स० १८१६ च्या एप्रिल महिन्यांत अर्ज केला. तो त्यानें सरकारांत पाठविला. सरकारानें त्यालाच त्या राण्याशीं तह करण्याचा अधिकार दिला. उदेपुर व जोधपुर येथील राण्यांनीं अगोदरच इंग्लिश सरकारचा स्नेह संपादिला होता.

---

## भाग तेरावा.

### पेशवे व भोंसले ह्यांचीं वर्तमानें.

**इ० स० १८१४ पासून इ० स० १८१८पर्यंत.**

वसईच्या तहनाम्यावर बाजीरावानें सही केली खरी; परंतु तो संकटसमय जाणून ती त्यानें नाइलाजास्तव केली. वास्तविक पाहिलें असतां त्याचें मन इंग्लिशांविषयीं बिलकुल शुद्ध नव्हतें. शिंदा व नागपुरकर भोंसला हे इंग्लिशांच्या नाशाविषयीं गुप्तपणें बेत करीत होते; त्यांतही त्याचें आंग नव्हतें असें नाहीं.

पेशवे व गायकवाड ह्यांचा खंडणीविषयीं तंटा पुष्कळ दिवसांपासून चालला होता. त्याची तोड काढण्याकरितां फत्तेशिंग गायकवाड ह्याचा वकील गंगाधर शास्त्री हा, इंग्लिशांचें अभयवचन घेऊन इ० स० १८१४ च्या आरंभीं पुण्यास आला. त्यास बाजीरावानें आपल्या स्वारीबरोबर पंढरपुरास नेऊन, तेथें त्रिंबकजी डेंगळा ह्या नांवाच्या एका नोकराकडून, इ० स० १८१५ च्या जुलै महिन्यांत ठार मारविलें. हें इंग्लिशांस समजतांच त्यांनीं त्रिंबकजीस आपले स्वाधीन करण्याविषयीं बाजीरावास नेट लाविला. त्यानें त्याबद्दल पुष्कळ हरकती घेतल्या, व अनेक सबबी सांगितल्या. परंतु इंग्लिश लोक आगदीं निकरावर आले असें पाहून, त्यानें त्यास, सप्तेंबरच्या १९

ह्या तारखेस त्यांचे हवालीं केलें. त्यास त्यांनीं साष्टी बेटांत कैद करून ठेविलें. तेथून तो इ० स० १८१६ च्या सप्तेंबर महिन्यांत मोठ्या युक्तीनें पळून गेला, व महादेवाच्या घांटांत लोक जमवूं लागला. त्यास पेशवा सहाय आहे, असें इंग्लिशांस पक्कें वाटलें. तथापि तें तो कबूल करीना. तेव्हां इंग्लिशांकडून त्यास अशी खरमरीत ताकीद गेली कीं, तुह्मीं एक महिन्याचे आंत त्रिंबकजीस धरून द्यावें; व धरून देण्याविषयीं मनांत कांहीं कपट नाहीं, अशी खातरी करण्याकरितां सिंहगड, रायगड, व पुरंदर हे किल्ले आमचे स्वाधीन करावे. हें इंग्लिशांचें मागणें ऐकून, आपण लढाईस एकदम आरंभ करावा असें बापू गोखला सांगत असतां, बाजीरावानें अविचारानें ते किल्ले इंग्लिशांच्या स्वाधीन केले, हें वर्तमान इ० स० १८१७ च्या मे महिन्यांत घडलें. त्याच्या पुढच्या महिन्यांत, विशेष बंदोबस्ताकरितां, इंग्लिशांनीं बाजीरावाशीं नवा तह ठरविला. त्यावरून, फौजेच्या खर्चाबद्दल इंग्लिशांस आणखी २४ लाख रुपये उत्पन्नाचा मुलूख पेशव्यांकडून मिळाला, गायकवाडावर पेशव्यांची सत्ता नाहींशी झाली, आणि कोणत्याही प्रकारच्या वादांत इंग्लिश सरकारचें ह्मणणें पेशव्यांनीं मान्य करावें, असें ठरलें.

इतकें झालें तरी, पंढरपुराहून परत आल्यापासून, छपावून नवीन फौज ठेवण्याचें, व इंग्लिशांच्या सैन्यांत फितुर करण्याचें जें कपटकर्म बाजीरावानें मांडिलें होतें, तें तसेंच चाललें होतें. शेवटीं तें सगळें इंग्लिशांस समजलें. ह्यांनीं युद्धाची तयारी चालविली. हें पेशव्याकडील सैन्याच्या दृष्टीस पडतांच त्यांतील लोकांनीं, इंग्लिशांचा रेसिडेंत मौतस्तुअर्त एलफिन्स्तन ह्याच्या बंगल्यावर चाल करून तो जाळून टाकिला. त्या गर्दीतून एलफिन्स्तन साहेब बचावून खडकीस[१] गेला. तेथें त्याची कांहीं फौज होती तिजवर, तारीख ५ माहे नोवेंबर सन १८१७ रोजीं पेशव्यांच्या सैन्यानें हल्ला केला. ही लढाई संध्याकाळपर्यंत चालली होती. बाजीराव पर्वतच्या उंच टेंकडावर बसून तिची गंमत पहात होता. ह्या लढाईत पेशव्यांकडचे सुमारें ५०० लोक पडले, व इंग्लिशांकडचे १८ मेले व ५७ जखमी झाले. पुढें आठ दिव-

---

१. पुण्याजवळ आहे.

सांत इंग्लिश सैन्यास भरपूर मदत येऊन पोहोंचली. नंतर खडकीचें लष्कर, तारीख १६ रोजीं, पुण्यास गारपिरावर येऊन उतरलें.

इंग्लिश सैन्यास घोडनदी वगैरे ठिकाणांहून मदत येऊन पोहोंचल्यावर, नोवेंबरच्या १६ व्या तारखेस पुणें येथें, व पुढच्या जानेवारीच्या आरंभीं कोरेगांव येथें, अशा त्यांच्या दोन लढाया झाल्या. त्यांत पेशव्याचा पराभव होऊन, तो पुणें सोडून पळत सुटला; तो एकसारखा सात महिने पळत होता. त्याचे पाठीवर इंग्लिश सरदार स्मिथ साहेब हा असे. शेवटीं सातपुड्याच्या वाटेनें हिंदुस्थानांत जात असतां, मंडळेश्वराजवळ[१] सर जान मालकम साहेब ह्याचें लष्कर येऊन पोहोंचलें. त्या वेळीं पळून जाणें उपयोगीं नाहीं, असें बाजीरावास वाटून, तो दुर्बल होऊन त्या साहेबास शरण गेला; आणि त्यानें त्यास सांगितलें कीं, मीं, गव्हरनर जनरल साहेब सांगतील त्याप्रमाणें वागण्यास कबूल आहें. तेव्हां त्या साहेबानें त्याशीं तह ठरविला. तो असा कीं, बाजीरावानें पेशवेपणाचे सर्व हक्क सोडून देऊन, दरसाल आठ लक्ष रुपये नेमणूक घ्यावी, आणि ब्रह्मावर्त येथें स्वस्थ रहावें. हा ठराव तारीख १२ माहे नोवेंबर सन १८१८ रोजीं झाला. आणि तो इंग्लिशांनीं तत्काळ अमलांत आणिला. ह्या प्रकारेंकरून पेशव्यांचें राज्य अविच्छिन्न इंग्लिशांचे हातीं आलें. आतां येथें हेंही सांगितलें पाहिजे कीं; बाजीराव इ० स० १८५१ च्या जानेवारीच्या २८ व्या तारखेस ब्रह्मावर्तीं मरण पावला. तेव्हां तो ७७ वर्षांचा होता. त्याला औरस पुत्र मुलींच नव्हता, ह्मणून त्यानें तीन पुत्र दत्तक घेतले होते. त्यांपैकीं धोंडोपंत (नानासाहेब) ह्मणून जो होता, तो इ० स० १८५७ च्या शिपायांच्या बंडांत मिळाला, व बरीच प्रसिद्धि पावला. याचें संक्षिप्त वर्णन सदरहूच्या बंडांच्या वर्णनाच्या भागांत करूं.

पेशव्यांचें राज्य इंग्लिशांनीं घेतलें खरें. पण मराठी राज्याचा मूळ स्थापक शिवाजी राजा, ह्याच्या वंशजास पेशव्यांनीं, तो राजा होता कीं नव्हता असें करून टाकून कैदेंत ठेविलें होतें, त्यास बंधमुक्त करून सातारा येथें गादीवर बसविलें, आणि त्याजकडे कांहीं मुलूखही दिला.

नागपुरचा रघुजी भोंसला, हा इ० स० १८१६ त मृत्यु पावला.

[१] माहूच्या दक्षिणेस १९ कोस आहे.

त्याचे गादीवर त्याचा वेडगळ मुलगा पर्सोजी हा बसला. त्याच्या राज्याचा कारभार, त्याचा चुलतभाऊ आपासाहेब ह्मणून होता तो पाहात असे. पर्सोजी गादीवर असतां त्याच्या मुलूखाच्या रक्षणार्थ इंग्लिशांचीं सहा सात पलटणें होतीं; व त्यांच्या खर्चाबद्दल तो त्यांस दरसाल साडेसात लक्ष रुपये देत असे. हा पर्सोजी इ० स० १८१७ त निवर्तला. नंतर अपासाहेब हा गादीचा मालक झाला. तो इंग्लिशांचा फार द्वेष करी. व त्यानें बाजीराव पेशव्याशीं पत्रव्यवहार ठेविला होता, तो इंग्लिशांस समजला. तेव्हां त्यांनीं त्याशीं लढण्याची तयारी केली. तोही सिद्ध झाला. उभय सैन्यांचें युद्ध तारीखं २६–२७ माहे नोवेंबर सन १८१७ रोजीं सीताबळदीच्या[1] घांटांत झालें. तेव्हां भोंसल्याकडचे अरब जिवावर उदार होऊन लढले; व त्यांनीं प्रथमारंभीं इंग्लिशांच्या फौजेस अगदीं गांगरवून टाकिलें. तरी शेवटीं कप्तान फित्सजरल्द साहेबानें त्यांचा मोड केला, व त्यांच्या तोफा घेतल्या.

नंतर कांहीं वेळानें निरुपायास्तव आपासाहेब, तारीख १६ दिसेंबर रोजीं, आपल्या दोन दिवाणांसहवर्तमान इंग्लिशांचे स्वाधीन झाला. तरी नागपुर शहरांत अरब लोक होते, ते इंग्लिशांचा प्रवेश आंत होऊं देईनात. तेव्हां तेथेंही एक लढाई झाली. तींत अरब हटले, आणि त्यांनीं तें शहर सोडिलें. तें इंग्लिशांनीं आपले ताब्यांत घेतलें. आपासाहेब हा आपल्या दोन दिवाणांसुद्धां इंग्लिशांच्या कैदेंत होता. त्यास गव्हरनर जनरलाचे आज्ञेवरून प्रयागाकडे रवाना केलें. तो तेथें पोहोंचण्यापूर्वींच, मार्गांत रायचुर मुक्कामीं, पहारेकरी शिपायांच्या सामलातीनें शिपायाचा वेष घेऊन फरारी झाला. त्याजबरोबर कितीएक लोक होते, व तो कोठें सांपडेल हेंही पुष्कळांस ठाऊक होतें. आणि त्यास धरून देईल त्याला २,००,००० रुपये रोख बक्षीस व १०,००० ची जाहागीर तहाहयातपावेतों देऊं, असा जाहिरनामा इंग्लिश सरकारानें लाविला होता; तरी एकानें देखील त्याला धरून दिलें नाहीं. आपासाहेब फिरत फिरत लाहोरास गेला, आणि तेथें रणजितसिंगानें दिलेलें पेन्शन खाऊन, कांहीं दिवसांनीं मरण पावला.

आपासाहेबाची वाट अशी झाल्यावर त्याचें सगळें राज्य इंग्लिशांस

१. नागपुरापासून अर्ध्या कोसावर आहे.

मिळालें. तरी रघोजी भोंसल्याच्या मुलीचा मुलगा बाजीराव . ह्मणून होता, त्यास त्यांनीं गादीवर बसविलें, आणि त्याचे नांवानें तें राज्य चालविलें. ह्या वेळीं नागपुरचें राज्य केवळ खालसा झालें नाहीं.

## भाग चौदावा.

### होळकराशीं तह-ब्रह्मदेशाशीं युद्ध-भरतपुरचा वेढा, इ०.

इ० स० १८१८ पासून इ० स० १८२६ पर्यंत.

तिकडे होळकराच्या दरबारांत मोठी बंडाळी माजली होती. बाळराजा मल्हारराव ह्याचीं पालन करणारी पोषक आई तुळजाबाई हिनें क्रूरपणानें आपले कितीएक मुत्सद्दी ठार मारिले; आणि फार दुराचरण आरंभिलें. तिच्या मनांत इंग्रजांचें वर्चस्व पत्करायाचें होतें. परंतु तिची फौज बाजीराव पळत असतां त्यास जाऊन मिळूं पाहात होती, हें इंग्लिशांस कळलें. तेव्हां सर थामस हिस्लाप साहेबास त्यांनीं तिजवर पाठविलें; व मागाहून मालकम साहेबासही कांहीं फौज बरोबर देऊन त्याच्या मदतीस रवाना केलें. हीं सैन्यें, होळकराची छावणी क्षिप्रा नदीवर होती, तेथून सुमारें पांच कोसांवर येऊन उतरलीं. त्याच रात्रीं, ह्मणजे ता० २० दिसेंबर सन १८१७ चे रात्रीं, होळकराच्या सरदारांनीं एकोपा करून, तुळजाबाईचा गळा कापून तिचें प्रेत नदींत टाकून दिलें. तिचा असा वाईट परिणाम होण्यास तिचें दुष्ट आचरण आणि इंग्लिशांकडचा कल हीं कारणभूत होत. तिच्या पश्चात् ज्या मुत्सद्यांचे हातीं त्या दरबाराचा अधिकार आला, ते इंग्लिशांस अगदीं पाण्यांत पहात असत; तेव्हां अर्थात् उभय पक्षांच्या सैन्यांची लढाई, तुळजाबाई मेली त्याच्या दुसरेच दिवशीं त्या नदीमध्यें लागली. ही लढाई महिदपुरची लढाई ह्मणून इतिहासांत प्रसिद्ध आहे. हिजमध्यें होळकराचे ३,००० व इंग्लिशांचे ७७८ लोक जायबंदी झाले. होळकर पराभव पावला. ह्या वेळेस मल्हाररावाची बहीण भिमाबाई हिनें मोठें शौर्य दाखविलें; परंतु तें व्यर्थ गेलें. नंतर तारीख ६ जानेवारी सन १८१९ इसवी रोजीं, मंडळेश्वरीं होळकरानें, इंग्लिशांशीं तह ठरविला. त्यांत मुख्य कलमें अशीं होतीं.—होळकरानें पेंढाऱ्यांस मदत करूं नये; त्यानें रजपुतांच्या मुलूखावरचे सगळे हक्क

सोडावे; सातपुड्याच्या दक्षिणेकडील मुलूख इंग्लिशांस द्यावा; आणि इंग्लिशांच्या सल्ल्याखेरीज इतर कोणत्याही संस्थानिकांशीं संबंध ठेवूं नये. ह्या. तहामुळें होळकराच्या राज्याचा विस्तार एक तृतीयांश कमी झाला.

कच्छ येथें बहारमलजी ह्या नांवाचा एक राजा राज्य करीत असतां, लाधुबा हा राजपुत्र त्याशीं स्पर्धा करूं लागला. त्याला बहारमलजीनें क्रूरपणा करून जिवें मारून टाकिलें. त्या बिचाऱ्याची बायको तेव्हां गरोदर होती. तिची दशा तिच्या नवऱ्याप्रमाणेंच फार वाईट व्हावयाची; परंतु इंग्लिश सरकारनें तिला आश्रय दिला, म्हणून ती बचावली. ती प्रसूत होऊन तिला पुढें मुलगाही झाला. बहारमलजीसारखा दुष्ट पुरुष केव्हां काय करील कोण जाणे, ह्या भीतीनें इंग्लिशांनीं आपल्या अंजर येथील ठाण्यांत बंदोबस्ताकरितां आणखी कांहीं फौज पाठविली. तेव्हां, ह्या प्रबल लोकांपुढें आपलें कांहीं चालावयाचें नाहीं असें जाणून, बहारमलजीनें, लाधुबाचा सासरा कल्याणशिंग ह्या जवर शस्त्र धरिलें. त्याला इंग्लिशांचा आश्रय होता. तेव्हां अर्थातच बहारमलजीचें व इंग्लिशांचें वैमनस्य आलें. इंग्लिश सैन्य तयार होऊन एकदम भूज शहरावर पडलें; आणि तें त्या लोकांनीं तारीख २४ मार्च सन १८१९ रोजीं छापा घालून हस्तगत केलें. तेव्हां बहारमलजीचे उपाय हरले. त्यास इंग्लिश सरकारानें पदच्युत करून त्याच्या राज्याचा सगळा कारभार त्याच्या नांवानें एका हुशार दिवाणाचे हातून चालविला.

त्याच वर्षी कच्छ देशामध्यें एक मोठा धरणीकंप झाला. त्याच्या योगानें भूज शहरांत ७,००० घरें अगदीं जमीनदोस्त झालीं, व १,१४० मनुष्यें त्या झपाट्यांत सांपडून प्राणास मुकलीं. अंजर येथेंही त्यामुळें ३,००० घरें अगदीं बसलीं; आणि तेथें किल्ला होता तो नाहींसा होऊन त्याचे जागीं भला मोठा एक धुळीचा पर्वत पडला.

पुढें इ० स० १८२३ पावेतों सांगण्यासारखें विशेष वर्तमान इकडे घडलें नाहीं. त्या वर्षी लार्ड आमहर्स्त हा गव्हरनर जनरलाचे जागेवर आला. त्या सालीं इंग्लिशांच्या हिंदुस्थानांतील मुलूखाचें उत्पन्न सुमारें २०,१२,३२,००० रुपये होतें.

ब्रह्मदेशाशीं लढाई त्याच वर्षी सुरू झाली. ब्रह्मी लोकांनीं आसाम प्रांत जिंकून घेतल्यामुळें त्यांच्या व इंग्लिशांच्या राज्याची सरहद्द एक झाली. त्यांच्या मुलुखांत न्याय, बंदोबस्त इत्यादि लोकहिताच्या गोष्टी मुळींच नसल्याकारणानें त्यांच्या राज्यांतील प्रजा इंग्लिशांच्या चितगांव वगैरे प्रांतीं येऊन राहिली. ती ब्रह्मी लोक इंग्लिशांपाशीं परत मागूं लागले. तें त्यांनीं अमान्य केलें. हें एक कारण. आणि बंगाल्याच्या पूर्वेकडील कांहीं प्रांत, प्राचीन आराकानच्या राज्यांतले भाग होते, त्यांवर आमचा वारसा आहे ते आम्हांस परत द्यावे, असें ब्रह्मदेशाच्या राजानें इंग्लिश सरकाराशीं जें बोलणें लाविलें होतें, तें त्यांनीं ऐकिलें नाहीं, हें दुसरें कारण. ह्या दोन कारणांवरून उभय पक्षांमध्यें वैमनस्य आलें. चितगांव आणि आराकान ह्यांच्यामध्यें शाहापुरी नामक एका बेटावर आपले जांहाजांच्या रक्षणाकरितां इंग्लिशांनीं थोड्याशा लोकांचा पाहरा ठेविला होता; त्यांवर, इ० स० १८२३ च्या सप्तेंबर महिन्यांत ब्रह्मी लोकांनीं हल्ला केला; आणि तेथील लोकांपैकीं कितीएकांस ठार मारून बाकीच्यांस हांकून लाविलें. तरी इंग्लिश सैन्यानें तें पुनः परत आपले ताब्यांत घेतलें. नंतर ब्रह्मी लोक इंग्लिशांच्या काचार नामक प्रांतांत शिरले. त्यांत त्यांचा दोन ठिकाणीं पराभव झाला; ह्मणून ते मणिपुरास परत निघून गेले.

ह्यापुढें उभयपक्षांच्या अनेक लढाया झाल्या. त्यांत ब्रह्मी लोकांकडचे थाकिया वुंगी, सुंभा वुंगी, नार्वनबारेन, बंधुला, इत्यादि अनेक सरदार होते. आणि कर्नलरिचार्डस्, लेफ्तनेंत पेव्रर्तन, जनरल मारिसन इत्यादि इंग्लिशांकडचे होते. इंग्लिशांकडचे लोक कवाईत शिकलेले असून चांगले हत्यारबंद होते; ब्रह्मी लोकांजवळचीं शस्त्रें जुन्या प्रकारचीं होतीं. तेणेंकरून इंग्लिशांनीं आसाम व आराकान हे प्रांत, व रंगून इत्यादि शहरें घेतलीं; आणि आपल्या शत्रूंस दोन तीन केळां इतकें जर्जर केलें कीं, त्यांनीं लागलेंच तहाचें बोलणें लाविलें. तथापि, तो कठिण प्रसंग निघून गेल्यावर, इंग्लिशांशीं तह करणें हें आपणांस मोठें लांछन आहे, असें त्यांचे मनांत येऊन, त्यांनीं तहाचे ठराव एकीकडे ठेवून, पुनः लढाई आरंभिली. पाघाम[1] येथें उभयप-

१. ब्रह्मदेशांत आव्हाच्या दक्षिणेस इरावतीच्या कांठीं आहे.

क्षांचें एक तुमुल युद्ध इ० स० १८२६ च्या फेब्रुआरी महिन्याच्या ८ व्या तारखेस झालें. तेव्हां इंग्लिशांच्या २,००० सैन्यानें ब्रह्मी लोकांच्या १८,००० सैन्याचा पराभव केला. शेवटीं ते अगदीं थकले. इंग्लिशांपुढें त्यांचा कांहीं उपाय चालेना. तेव्हां त्यांच्या राजानें, तारीख २४ माहे फेब्रुआरी सन १८२६ रोजीं, इंग्लिशांशीं तह ठरविला. त्याचा सारांश असा.—ब्रह्मी राजानें आसाम, आराकान व तेनासरीम हे प्रांत इंग्लिशांस द्यावे; आराकानचे डोंगर उभयतांच्या राज्याची सरहद्द असावी; एक कोट रुपये चार हप्त्यांनीं ब्रह्मी राजानें इंग्लिशांस द्यावे; आणि इंग्लिशांच्या व्यापारी जाहाजांस ब्रह्मदेशांत चांगल्या रीतीनें वागवून घ्यावें; इत्यादि कलमें त्यांत ठरलीं, व तीं यथास्थित अमलांतही आलीं. ह्याप्रमाणें ब्रह्मदेशाशीं जी पहिली लढाई झाली, तिचा शेवट झाला.

इ० स० १८०५ त, भरतपुरच्या[१] राजाजवळ इंग्लिशांचा असा तह ठरला होता कीं, त्यांनीं त्याच्या राज्यांत दाखलगिरी न करितां शत्रूपासून त्याचें रक्षण करावें; व प्रसंग पडेल तेव्हां त्यानें त्यांस यथाशक्ति मदत द्यावी. पुढें इ० स० १८२४ त, तेथचा राजा बळदेवसिंग हा मरायास टेंकून त्यानें आपले मागें आपल्या मुलास गादीवर बसविण्याविषयीं इंग्लिश सरकारास विनंतीपत्र पाठविलें. तें माळवा आणि रजपुतस्थान ह्यांचा रेसिडेंत सर देवीद आक्तरलोनी साहेब ह्यानें गव्हरनर जनरलाच्या परवानगीनें मान्य करून अमलांतही आणिलें. त्याच्या पुढच्या वर्षी त्या बाळराजाचा चुलतभाऊ दुर्जनसाल हा बलिष्ठ होऊन गादी बळकावून बसला. तेव्हां आक्तरलोनी साहेब त्याजवर चालून जाण्याच्या तयारीस लागला. इतक्यांत गव्हरनर जनरलाकडून त्यास अशी आज्ञा आली कीं, भरतपुर प्रकरणांत आपणांस हात घालण्याचें कारण नाहीं. तेणेंकरून त्या साहेबाला इतका राग आला कीं, त्यावरून त्यानें आपले नौकरीचा तत्काळ राजीनामा दिला. त्याच्या जागेवर सर चार्लस मेतकाफ ह्याची नेमणूक झाली.

पुढें थोडक्याच दिवसानंतर, आक्तरलोनी साहेबास जी आपण आज्ञा दिली, ती योग्य नव्हती, असें गव्हरनर जनरलास वाटून, दु-

१. आग्र्याच्या पश्चिमेस १७ कोसांवर आहे.

र्जनसाल ह्यास गादीवरून काढण्याचा व खऱ्या वारसास गादीवर बसविण्याचा निश्चय त्यानें केला. २,००० सैन्य तिकडे योजिण्याचें ठरलें. त्यावर मुख्य लार्ड कोंबर्मीर साहेब नेमिला. त्यानें आपलें लष्कर किल्ल्याजवळ आणून तारीख २५ दिसेंबर सन १८२५ रोजीं त्यावर तोफांचा भडिमार चालविला. तरी किल्ल्याच्या भिंती फुटेनात. किल्ल्यांत दुर्जनसाल, आणि त्यास चोहींकडून बाहेर इंग्लिश सैन्याचा गराडा, अशी स्थिति प्राप्त झाली; शत्रूंनीं आंतून बाहेर पडण्याविषयीं अनेक वेळां प्रयत्न केले; परंतु ते सगळे व्यर्थ गेले. शेवटीं इंग्लिशांनीं सुरुंग लावून तटास भोंक पाडिलें, आणि त्यामधून हल्ला करून किल्ला हस्तगत केला. दुर्जनसाल मुलांमाणसांसुद्धां त्यांच्या हातीं लागला. भरतपुरचा किल्ला त्यांनीं आपले ताब्यांत घेतला, आणि ह्मणून जमीनदोस्त करून टाकिला. राजवाड्यांत जे कांहीं मौल्यवान् पदार्थ सांपडले ते सर्व इंग्लिश फौजेनें लुटले. हें वर्तमान तारीख १८ माहे जानेवारि १८२६ इ० रोजीं घडलें.

दुर्जनसाल ह्यास कैद करून अलहाबादेस पाठविलें. किल्ला हातीं आल्याचे दुसरे दिवशीं, ह्मणजे जानेवारीच्या १९ व्या तारखेस, लार्ड कोंबर्मीर व सर चार्लस मेतकाफ, ह्या इंग्लिश सरदारांनीं आंत जाऊन खऱ्या वारीस राजास मोठ्या समारंभानें गादीवर बसविलें; आणि राज्याचा सगळा कारभार दरबारच्या दिवाणांनीं इंग्लिश रेसिडेंताच्या विद्यमानें चालवावा, असें ठरविलें.

लार्ड आम्हर्स्त ह्याच्या कारकीर्दींत नागपुरच्या नव्या राजाशीं नवा तहनामा ठरला; आणि सिमला हें गव्हरनर जनरलाचें कांहीं दिवस राहण्याचें ठिकाण झालें. तो इ० स० १८२८ च्या मार्च महिन्यांत आपलें काम सोडून स्वदेशीं गेला.

# भाग पंधरावा.

## लार्ड विलियम बेंतिक व लार्ड आक्लंद ह्याची कारकीर्द. अफगाणिस्थानाशीं लढाई—सिंधचे अमीरांशीं लढाई—इत्यादि.

इ० स० १८२६ पासून इ० स० १८४२ पर्यंत.

लार्ड आम्हर्स्त ह्याचे मागून लार्ड विलियम बेंतिक हा गव्हरनर जनरल झाला. त्या वेळीं हिंदुस्थानांतील इंग्लिश राज्याच्या उत्पन्नापेक्षां खर्च पुष्कळ होत असे. ह्यास्तव, सरकारी कामाचा खर्च दरसाल १५,००,००० रुपयांचा कमी करून, ज्या जमिनीवर सारा बसलेला नव्हता तीवर सारा बसवून, आणि माळव्यांतील अफूवर जकात बसवून उत्पन्न वाढविलें; आणि उत्पन्नास आणि खर्चास मेळ घातला. एतद्देशीय वर्तमानपत्रांस स्वातंत्र्य त्यानें दिलें; कोणत्याही बायकोनें सती जातां कामास नये, असा कायदा ठरविला; मध्यहिंदुस्थानांतल्या जंगलांत प्रवाशांस गांठून त्यांस ठार मारून लुटणाऱ्या ठग लोकांचें पारिपत्य त्यानें केलें; जागोजाग शाळा घालून प्रजेचें ज्ञान वाढविण्याविषयीं पुष्कळ यत्न केले; अशीं अनेक उपयुक्त कार्यें ह्याचे हातून घडलीं. विलायतेहून जाऊन येण्यास पूर्वी सहा सात महिने लागत असत; परंतु ह्याचे कारकीर्दीपासून हिंदुस्थान व इंग्लंद ह्यांच्यामध्यें आगबोटी जाऊं येऊं लागल्यामुळें आणि आफ्रिकेस प्रदक्षिणा न घालतां मिसर देशांतून यावयाची सोय झाल्यामुळें तें काम एक दोन महिन्यांत होऊं लागलें.

आणखी म्हैसूरचा राजा कृष्णराय यदुवीर, ह्याचा कारभारी पुरणया हा मरण पावल्यामुळें त्याचे राज्यांत फार अव्यवस्था झाली, व राजास कर्ज अतिशय झालें. म्हणून त्याच्या मुलखाचा कारभार इ० स० १८३२ त इंग्लिशांनीं आपणांकडे घेतला; तरी राज्यकारभार राजाचे नांवानें चालविला. त्याप्रमाणेंच कुर्ग प्रांताचा राजा वेंजराज हा आपल्या प्रजेशीं फार क्रूरपणानें वागूं लागला. तो इतका कीं, खुद्द त्याची बहीण व मेहुणा हीं जीवांच्या भयानें इंग्लिशांच्या आश्रयास येऊन राहिलीं. असें न करण्याविषयीं इंग्लिशांनीं सामोपचा-

राचें पत्र त्याला पाठविलें; पण तें त्यानें मुळींच मानिलें नाहीं, आणि पत्र घेऊन गेलेल्या वकिलासही कैद करून ठेविलें. तेव्हां त्याजवर इंग्लिश फौज रवाना झाली. तिनें कुर्ग[१] प्रांताची राजधानी मदिकेरी (मर्कारा) हस्तगत करून घेतली. तेव्हां वेजराज, आपल्या मुलांमाणसांसुद्धां इंग्लिशांस शरण आला. त्यास धरून त्यांनीं काशीस प्रतिबंधात ठेविलें. आणि त्याचा मुलूख आपल्या राज्यांत सामील केला. ही गोष्ट इ० स० १८३४ त घडली. त्या कुर्गच्या प्रांतांत काफीची लागवड फार करूं लागले आहेत. ह्याच वर्षीं ईस्ट इंडिया कंपनीनें व्यापार मुळींच करूं नये असें विलायत सरकारानें ठरविलें. नंतर इ० स० १८३५ च्या मार्च महिन्याच्या २० व्या तारखेस लार्ड बेंतिक साहेबानें गव्हरनर जनरलाचें काम सोडिलें. ह्याचे मागून लार्ड आक्लंद साहेब गव्हरनर जनरल झाला."

काबूलचा राजा शाहासुजा, ह्यास, त्याचा भाऊ सुलतान महंमद ह्यानें फत्तेखान नामक वजीराच्या साह्यानें पदच्युत करून गादी बळकाविली होती. पुढें फत्तेखानाचा खून महंमदानें करविला. तेव्हां त्याच्या वीस भावांनीं त्याबद्दल सूड उगविण्याचा निश्चय केला; आणि सैन्य जमवून त्याशीं युद्ध आरंभिलें. त्यांत सुलतान महंमद पराभव पावला त्याच्या राज्याचे वेगवेगळे प्रांत त्या भावांनीं बळकाविले. त्यांत दोस्तमहंमद हा काबूलचा राजा फार बलिष्ठ होता.

ह्या काळाच्या सुमारास, रुशिआ देशचा बादशाह हिंदुस्थानाचें राज्य घेण्याची तयारी करीत आहे, अशी खबर इंग्लिशांस समजली. तेव्हां ते जरासे घाबरले; परंतु रशियन लोकांस हिंदुस्थानांत येण्यास वाट इराण व काबूल ह्यांमधून आहे, ह्यास्तव त्या राष्ट्रांशीं आपला सल्ला असला म्हणजे आपल्या राज्यास सहसा धोका नाहीं, असा विचार गव्हरनर जनरल साहेबानें मनांत आणून, दोस्तमहंमदाकडे कप्तान अलेक्झांदर बर्नस नांवाचा साहेब वकील पाठविला. तो दोस्तमहंमदाच्या दरबारांत इ० स० १८३७ च्या अखेरीस गेला. परंतु तेथें, रशियन सरकारच्या वकिलाचें वजन फार पडलेलें पाहून कांहीं बोलणें न लावितां तो परत हिंदुस्थानांत आला. ह्याच प्रकरणीं, लार्ड

१. पश्चिम घांटाच्या तांबिचेरी शिखरापासून वेदनूरपर्यंत.

विल्यम बेंटिक आणि रणजितसिंग ह्यांची मुलाखत बोपार ह्या गांवीं झाली होती.

पुढें इ० स० १८३७ त लाहोरचा प्रबल शीख राजा रणजितशिंग ह्यानें स्वारी करून दोस्तमहंमदाच्या भावापासून पेशावर प्रांत घेतला. तो बळेंकरून परत घेण्यास आपण समर्थ नाहीं, असें पाहून, "दोस्तमहंमदानें, त्या कामांत मध्यस्थी करण्याविषयीं गव्हरनर जनरलास विनंतीपत्र लिहिलें. तरी त्याचें अंतर्याम शुद्ध होतें असें नाहीं.' ह्मणून इंग्लिशांनीं शाहासुजा, जो लुधियाना येथें नेमणूक खाऊन त्यांच्या आश्रयास राहिला होता, त्याशीं व रणजिताशिंगाशीं तह केला; आणि ते दोस्तमहंमद व त्याचे बंधु ह्यांशीं युद्ध करण्याच्या तयारीस लागले. हें वर्तमान इ० स० १८३८ त घडलें.

पेशव्यांचें राज्य इंग्लिशांनीं घेतलें, त्या वेळीं शिवाजीच्या वंशांतील केवळ नामधारी राजा प्रतापसिंह, हा त्यांच्या कैदेंत होता, त्यास त्यांनीं मुक्त करून सातारा येथें गादीवर स्थापून त्याजकडे थोडासा मुलूख दिला, असें पूर्वीं लिहिलें आहे. त्या प्रतापसिंहानें उपकार विसरून इंग्लिशांशीं विरोध मांडिला. त्यानें गुप्तपणें कांहीं फौज ठेविली; व लढाईच्या सामानाची तयारी चालविली. ती इंग्लिशांस समजली. तेव्हां त्यांनीं त्याला, इ० स० १८३९ ह्या वर्षीं काशी येथें नेऊन ठेविलें; आणि त्याचे गादीवर, त्याचा भाऊ शाहाजी, ह्मणजे ज्यास आपासाहेब असें ह्मणत, त्यास बसविलें.

वर सांगितलेल्या काबूलच्या मोहिमीवर इंग्लिशांच्या सैन्याचा कांहीं भाग मुंबईहून निघून सिंधप्रांतांतून चालला होता. त्यास सिंधच्या अमीरांनीं हरकत केली. ह्मणून सर जान कीन साहेबानें कराची हस्तगत करून घेऊन हैदराबादेवर चाल केली. तेव्हां अमीर भयभीत होऊन त्यांनीं इंग्लिशांशीं तह ठरविला. तो असा;—अमीरांनीं इंग्लिश सरकारास तीस लक्ष रुपये द्यावे; इंग्लिश सरकारास आपले धनी कबूल करून त्यांस आपले उत्पन्नाचे अर्धापेक्षां अधिक खंडणी द्यावी; आणि ४,००० इंग्लिश लष्कर कुमकेस ठेवावें. हा तह ठरल्यावर तें सैन्य पुढें चालतें झालें. इतक्यांत बंगाल्याकडूनही कांहीं सैन्य आलें. ह्या दोन्ही लष्करांची गांठ शिकारपुर येथें पडली. पुढें सन १८३९ च्या

जून महिन्यांत रणजितसिंग मरण पावल्यामुळें इंग्रजांचें पारडें कांहींसें हलकें झालें.

ह्या वेळीं मार्गांत इंग्लिश सैन्याची फार खराबी झाली. ती मुख्यत्वेंकरून; शत्रूकडील सरदार मेहेराबखान ह्यानें केली. इंग्लिशांच्या फौजेनें कंधाहार घेऊन, तेथें शाहासुजा ह्यास गादीवर बसवून त्याचे नांवाची द्वाही फिरविली. नंतर, दोस्तमहंमदाचा शूर पुत्र हैदरखान, ह्याजपासून इ० स० १८४० च्या मार्च महिन्यांत, इंग्लिश सैन्यानें गिझनी घेतली. तेथें हैदरखानही त्यांचे हस्तगत झाला. थोडक्या दिवसांनीं काबूल शहरही इंग्लिशांनीं घेतलें. तेव्हां त्यांस अफगाणिस्थानांतून हांकून देण्यासाठीं दोस्तमहंमदानें मोठी फौज जमविली. हें इंग्लिशांस समजतांच त्यांनींही लढाईची सिद्धता केली. उभय पक्षांची लढाई तारीख २ माहे सप्तंबर सन १८४० रोजीं पर्बांग[१] येथें झाली. तींत दोस्तमहंमद पराभव पावून रानांत पळून गेला. परंतु, भटक्या मारून तरी काय उपयोग असें मनांत आणून, व कांहीं उपाय चालत नाहीं असें पाहून, तो दोस्तमहंमद माक्नातन साहेबास शरण गेला. त्यास त्याच्या मुलांमाणसांसहवर्तमान इंग्लिशांनीं कलकत्ता येथें नेऊन ठेविलें. त्यास खर्चाची नेमणूक दोन लक्ष रुपये ठरविली होती.

ह्या प्रकारेंकरून शाहासुजा व इंग्लिश ह्यांच्या इच्छेप्रमाणें काबुलाची व्यवस्था झाली; तरी ती टिकली नाहीं. झालेली व्यवस्था अफगाण दरबारच्या कितीएक सरदारांस व लोकांस आवडली नाहीं; ह्मणून त्यांनीं बंड केलें. पुढें इ० स० १८४१ चे अखेरीस काबूल येथें मोठा दंगा झाला. त्यांत शाहासुजा प्राणास मुकला, व पुढें माक्नातन वगैरे पुष्कळ साहेबलोकांचे खून झाले. तो दंगा मोडण्याविषयीं इंग्लिशांचें कांहीं चाललें नाहीं; ह्मणून अफगाणिस्थान सोडून परत हिंदुस्थानास जाण्याचें तेथील इंग्लिश सरदारांनीं कबूल केलें. त्याप्रमाणें निघून येतांना अफगाणी लोकांनीं वारंवार हल्ला केल्यामुळें व थंडी फार पडल्यामुळें १६,००० इंग्लिश फौज, तींतला एकजण खेरीज करून, प्राणांस मुकली. लार्ड आक्लंद ह्याच्या कारकीर्दींत चीनदेशच्या बादशाहाशीं कलह उत्पन्न होऊन, त्याच्या सैन्याशीं इंग्लिश

१- अफगाणिस्थानांत दक्षिणभागीं पिशेनदरीजवळ आहे.

सैन्याच्या कितीएक झटापटी झाल्या. त्यांत इंग्लिशांस जय आला. आणि नांकिन येथें उभय पक्षांचा तह इ० स० १८४२ त झाला. त्यावरून आमोय, फ्युचू, निंगपो आणि शांघाय ह्या बंदरांत व्यापार करण्याची मोकळीक इंग्लिशांस मिळून, शिवाय हांगकांग हें बेट मिळालें.

इ० स० १८४२ ह्या वर्षी लार्ड आक्लंद स्वदेशीं गेला, आणि लार्ड एलिनबरो गव्हरनर जनरलाचे कामावर आला. जनरल पालक व जनरल नात ह्या साहेबांनीं काबुलाकडे दोन फौजा नेऊन तें शहर घेतलें, आणि इंग्लिशांच्या नांवास जो पूर्वी बट्टा लागला होता, तो उडविला. हें केल्यानंतर ते आपल्या फौजा घेऊन हिंदुस्थानास परत आले. मग गव्हरनर जनरल साहेबानें आफगाण देशाचा संबंध सोडून दोस्तमहंमदास सोडून दिलें. तो परत जाऊन आपल्या गादीवर बसला. ह्या कामांत पंचवीस कोटि रुपये खरचले, व अगदीं नाहीं तरी सुमारें १६,००० लोक मरण पावले. पण, ह्यापासून फायदा ह्मटला तर कांहींएक झाला नाहीं.

रणजितशिंग इ० स० १८३९ त मरण पावला. तेव्हां त्याचा मुलगा करकशिंग हा याचे गादीवर बसला. तो निवर्तल्यावर, रणजितशिंगाचा दासीपुत्र शेरसिंग हा कांहीं दिवस राजा झाला होता. तो इ० स० १८४३ ह्या वर्षी अपघातानें मृत्यु पावला. नंतर रणजितशिंगाचा पुत्र धुलीपशिंग हा लाहोरचा राजा झाला.

सिंधच्या अमीरांशीं तह झाला, ह्मणून जो मागें सांगितला, त्याप्रमाणें त्यांजकडून वर्तन होईना, व ते इंग्लिशांच्या व्यापाराचे मालावर ज्यास्त जकात बसवूं लागले, तेणेंकरून त्यांजवर इंग्लिशांनीं शस्त्र धरिलें. तिकडे सैन्यें रवाना झालीं. त्यांवर सर चार्लस नेपियर वगैरे योद्धे नेमिले. इ० स० १८४३ च्या जानेवारी महिन्यांत इमामगड[1] येथें एक लढाई झाली. तींत इंग्लिश जय पावले. दुसरी लढाई मिआनी[2] येथें फेब्रुआरीच्या १७ व्या तारखेस झाली. ह्या वेळीं इंग्लिशांकडे ३,००० व अमीरांकडे २०,००० फौज होती. ह्या लढाईंत इंग्लिशांकडचे २५६ लोक पडले; व अमीरांकडचे पांच हजारांपेक्षां

१. हैदराबादेच्या ईशान्येस सुमारें ४५ कोसांवर आहे.
२. हैदराबादेच्या उत्तरेस तीन कोसांवर आहे.

अधिक लोक प्राणास मुकले. हैदराबाद येथें शेवटची लढाई मार्च महिन्याच्या २४ व्या तारखेस झाली. तींत इंग्लिशांस जय मिळून त्यांनीं तें शहर घेतलें. नंतर सिंध मुलूख इंग्लिशांनीं आपले कबज्यांत घेतला. त्यांतला थोडासा प्रांत खैरपुरच्या नबाबाकडे राखून, बाकीचा त्यांनीं आपले राज्यांत सामील केला. त्याचा वसूल सुमारें ४०,००,००० रुपये येतो.

इकडे ग्वाल्हेरचा जनकोजीराव शिंदा इ० स० १८४३ च्या फेब्रुआरी महिन्यांत मरण पावला, त्याच्या बायकोनें एक आप्त मुलगा दत्तक घेतला: तो इंग्लिश सरकारानेंही कबूल केला; आणि तो लहान होता, सबब राज्याचा कारभार पाहाण्यास मामासाहेब ह्मणून एक सरदार नेमिला. मामासाहेबाचें व राणीसाहेबाचें कांहीं कारणावरून वैमनस्य आलें. तेव्हां तिनें त्याला कारभारांतून काढून टाकिलें. आणि दादासाहेब खासगीवाला ह्यास तें काम सांगितलें. हें इंग्लिशांस बिलकुल आवडलें नाहीं. त्यांनीं दादासाहेबास आपले स्वाधीन करण्याविषयीं राणीस पत्र लिहिलें. तें तिनें जुमानिलें नाहीं; परंतु त्यांनीं फारच नेट लाविला, तेव्हां खासगीवाल्यास त्यांचे स्वाधीन करणें तिला भाग पडलें. पुढें दिसेंबर महिन्यांत पन्यार[1] व माहाराजपुर[2] येथें शिंदे व इंग्लिश ह्यांच्या सैन्यांच्या लढाया होऊन, शिंद्याचें लष्कर पराभव पावलें. नंतर शिंद्यापासून इंग्लिशांनीं तह ठरवून घेतला: त्यांतला आशय असा.—७,००० पायदळ व ३,००० स्वार इतकें इंग्लिशांचें लष्कर शिंद्याकडे कुमकेस असावें, व त्याबद्दल त्यानें त्यांस कांहीं मुलूख तोडून द्यावा; शिंद्यानें ९,००० लष्कर, १२ लढाईच्या तोफा, २० इतर तोफा, आणि २०० गोलंदाज, ह्यांपेक्षां ज्यास्त फौज ठेवूं नये; ग्वाल्हेरच्या किल्ल्यावर इंग्लिशांच्या ताब्यांतले लोक व त्यांवर एक गोरा अमलदार, असे रहावे; राजा मोठा होई तोंपावेतों राज्याचा कारभार नियमित मंत्री मंडळीनें रेसिडेंत साहेबांच्या अनुमताप्रमाणें चालवावा; आणि राणीसाहेबांचे हातीं कांहींएक अधिकार ठेवूं नये. अशा प्रकारेंकरून ग्वाल्हेरचा दंगा मोडला.

---

१. हें ग्वाल्हेरीच्या दक्षिणेस साहा कोसांवर आहे.

२. हें ग्वाल्हेरीच्या उत्तरेस सात कोसांवर आहे.

त्यानंतर इ० स० १७४४ च्या आगस्त महिन्यांत लार्ड एलिनबरो हा गव्हरनर जनरलाचें काम सोडून गेला; आणि लार्ड हार्डिंज हा त्याचे जागेवर आला.

## भाग सोळावा.

### लार्ड हार्डिंज आणि लार्ड डालहौसी ह्यांची कारकीर्द. पंजाबची लढाई–निजाम व अयोध्येचा नवाब ह्यांचें वर्तमान–इ०.

**इ० स० १८४४ पासून इ० स० १८५६ पर्यंत.**

रणजितशिंगाचा व इंग्लिशांचा तह ठरला होता, तो त्याचे मागें फार दिवस चालला नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें, धुलीपशिंग हा अल्पवयस्क असल्याकारणानें, राज्याचा कारभार त्याची आई पाहात असे. तिनें आपला भाऊ वजीर नेमिला होता. पुढें कांहीं गडबड होऊन तो मारला गेला. नंतर ती जागा लालशिंगनामक पुरुषास मिळाली. ह्या राज्यांत कवाईत शिकलेलें सैन्य फार असे, व त्यावर कोणाचा धाक नसे. ह्मणून त्यास स्वस्थ बसून चैन पडेना. त्या सैन्यापैकीं ६०,००० शीख लोक १५० तोफांसहवर्तमान सतलज नदीच्या आलीकडे आले, आणि त्यांनीं इ० स० १८४५ ह्या वर्षी इंग्लिशांच्या मुलूखावर विनाकारण चाल करून, त्यांत अतिशयित धामधूम मांडिली.

हें वर्तमान लार्ड हार्डिंज ह्यास समजतांच, सर ह्यू गो ह्याचे हाताखालीं ११,००० सैन्य होतें, ते त्याजवर रवाना झालें. त्याची व शिखांच्या २०,००० सैन्याची गांठ मुडकी[1] येथें पडली. तेथें इ० स० १८४५ च्या दिसेंबरच्या १८ व्या तारखेस मोठी लढाई झाली. तींत इंग्लिशांकडचे सर राबर्त सेल वगैरे कितीएक सरदार पडले, व त्यांच्या सैन्यास पुष्कळ हाल भोगावे लागले; तरी शेवटीं तेच जय पावले. त्यांनीं शत्रूंच्या १७ तोफा घेतल्या. दुसरी लढाई २१ व्या तारखेस फिरोजपुर[2] येथें जुंपली. तींत सर ह्यू गो आणि लार्ड हार्डिंज

१. हें लाहोरच्या दक्षिणेस सुमारें २२ कोस आहे.

२. हें लाहोरच्या दक्षिणेस १२ कोसांवर आहे.

हे इंग्लिशांच्या सैन्याचे सरदार होते; तेथेंही इंग्लिशांस यश आलें; त्यांनीं शीख लोकांच्या ७३ तोफा घेतल्या; आणि शीख लोक सतलज नदीच्या पलीकडे पळून गेले. तरी पुनः तयारी करून ते आणखी एकवार आलीकडे आले. नंतर, तारीख २८ जानेवारी सन १८४६ रोजी अलवाल[१] येथें एक, व तारीख १० फेब्रुआरी रोजीं सोब्रन[१] येथें एक, अशा दोन मोठ्या लढाया झाल्या. त्याही इंग्लिशांनींच जिंकिल्या. त्यांपैकीं पहिलींत त्यांनीं ५६ तोफा घेतल्या; आणि दुसरींत तेजशिंग ह्या शीख सरदारास पळायास लावून शामशिंग ह्यास ठार मारिलें. नंतर त्यांनीं एकामागून एक किल्ले घेण्याचा सपाटा चालविला. शीख लोक अगदीं मट्यास आले. त्यांच्यानें इंग्लिशांपुढें टिकाव धरवेना. त्यांचें राजधानीचें शहरही इंग्लिशांनीं विसाव्या तारखेस घेतलें. तेव्हां त्यांचे उपाय हरले. मग त्या राणीचा व इंग्लिशांचा तह ठरला. त्यांत असें ठरलें कीं, सतलज नदीच्या डावे किनाऱ्यावरील प्रांत आणि जलंदर दुआब, ह्मणजे सतलज आणि बिआ ह्या नद्यांच्या मधले प्रांत, हे शीख सरकारानें इंग्लिशांस द्यावे; इंग्लिशांचा रेसिदेंत लाहोरास असावा; धुलीपशिंग वयांत येईतोंपर्यंत रीजेन्सीच्या कौन्सिलानें राज्यकारभार पाहावा; परंतु इंग्लिश रेसिदेंताच्या मर्जीनुरूप सर्व राज्यकारभार चालला पाहिजे; लढाईच्या खर्चाबद्दल दीड कोट रुपये इंग्लिशांस मिळावे; आणि शीख सरकारच्या राज्याच्या रक्षणार्थ लाहोर येथें इंग्लिश सरकारची कांहीं फौज ठेवावी. ह्या लढाईचा खर्च लागलाच मिळाला नाहीं, ह्मणून काश्मीर व हजरा हे दोन प्रांत इंग्लिशांनीं आपणांकडे ठेविले; आणि सरदार गुलाबशिंग ह्यानें एक कोटि रुपये दिल्यावरून त्यास काश्मीर प्रांताचा राजा केलें. त्याप्रमाणें सर्व व्यवस्था होऊन मेजर हेनरी लारेन्स ह्यास लाहोरास रेसिदेंत नेमिलें. अशा प्रकारें पंजाबची पहिली लढाई आटोपली.

लार्ड हार्डिंज हा इ० स० १८४७ त आपलें काम सोडून स्वदेशीं निघून गेला. त्यानें व्यापारास उत्तेजन दिलें; खोंड लोकांतल्या बाळहत्या बंद केल्या; ताजमाहालाची दुरुस्ती केली; रुर्कि येथें एंजिनिरिंग कालेज स्थापिलें; आणि त्रांकिबार व सिरामपुर हीं देन्स लो-

१. हीं दोन्हीं ठिकाणें सतलज नदीच्या डाव्या किनाऱ्यावर आहेत.

कांपासून विकत घेतलीं. ह्याचे मागून लार्ड दालहौसी हा गव्हरनर जनरल होऊन इ० स० १८४८ त हिंदुस्थानांत आला.

वर सांगितल्याप्रमाणें शीख लोकांची दशा झाली. तरी मुलतानाचा सुभेदार मूळराज हा इंग्लिशांशीं कपटानें वागत असे. आणि तो लाहोरच्या दरबाराशींही उद्धटपणाचें आचरण करूं लागली. ह्यास्तव त्यास पदच्युत करून सरदार खानशिंग ह्यास त्याचे जागीं स्थापण्यासाठीं गव्हरनर जनरलानें व्हान्स आम्यु साहेब व अंदरसन साहेब ह्यांस मुलतानास पाठविलें. ते तेथें तारीख १८ एप्रिल स० १८४८ इसवी रोजीं पोहोंचले; आणि सरकारच्या आज्ञेप्रमाणें त्यांनीं आपलें काम बजाविलें. तेव्हां मूळराजाचे लोकांनीं दंगा करून सदरहू दोन इंग्लिश सरदारांचे प्राण घेतले. नंतर मूळराजानें उघड बंड केलें. त्यावर इंग्लिश सरकारानें सैन्य पाठविलें. त्या सैन्यानें तेथें जाऊन मुलतानास वेढा घातला. त्या लोकांनीं बाहेरून गोळ्यांचा वर्षाव करून, किल्ल्यांत मूळराजाचें जें दारूगोळा वगैरे सामान होतें, तें दग्ध करून टाकिलें. हें वर्तमान तारीख ३० दिसेंबर रोजीं घडलें. मूळराजाच्या बंडाबरोबर सगळ्या पंजाबांतले शीख लोक उठले. चिलियनवाला[१] येथें त्यांचें पुष्कळ सैन्य होतें, त्यावर लार्ड गो साहेबाच्या फौजेनें हल्ला केला. ही लढाई इ० स० १८४९ च्या जानेवारीच्या १३ व्या तारखेस झाली. तेव्हां इंग्लिशांकडील सैन्यांतले २,४०० लोक पडले; पण शिखांकडचा नाश त्याहूनही अधिक झाला. पुढें लवकरच मुलतान इंग्लिशांच्या हातीं आलें. ह्या प्रकरणीं शेवटचें युद्ध गुजराथ[२] येथें तारीख २१ फेब्रुआरी रोजीं झालें. तेव्हां शीखलोकांची सेना ६०,००० होती, व इंग्लिशांकडे २५,००० होती. तरी इंग्लिशांच्याच पक्षास जय मिळाला. तेव्हां पंजाबचें राज्य स्वतंत्रपणें चांगलें चालूं शकत नाहीं असें ठरवून, तें गव्हरनर जनरलानें इ० स० १८४९ च्या मार्च महिन्यांत जाहीरनामा प्रकट करून आपले राज्यांत सामील केलें. दुलीपशिंग ह्या वेळेस अगदीं लहान होता; त्याजकडून एका करारनाम्यावर इंग्लिशांनीं प्रसिद्धपणें सही करवून

१. हें ठिकाण लाहोरच्या वायव्येस ४२ कोसांवर आहे.
२. झेलम आणि चिनाब ह्यांच्या मध्यें.

त्यास पांचसहा लक्ष रुपये वेतन ठरवून दिलें; आणि मूळराज ह्याजवर खुनाचा आरोप शाबीद झाल्यावरून त्यास काळ्या पाण्यावर पाठविलें. अशा प्रकारें पंजाबच्या दुसऱ्या लढाईचा शेवट झाला.

लार्ड दालहौसी साहेब गव्हरनर जनरल ह्याची कारकीर्द राज्यें खालसांत करण्याविषयीं इतिहासांत प्रसिद्ध आहे. तो काम पाहूं लागला, त्याच वर्षी सातारचा राजा शाहाजी ऊर्फ आपासाहेब हा मरण पावला. त्याचे पोटीं पुत्रसंतान नव्हतें. ह्मणून त्याचें राज्य बिनवारशी ह्मणून तें इंग्लिशांनीं घेऊन आपले राज्यास जोडिलें; आणि त्याच्या तीन बायकांस वेतनें ठरवून दिलीं. आलीकडे त्या तिघीही मरण पावल्या.

ब्रह्मदेशच्या राजानें इ० स० १८२६ ह्या वर्षी इंग्लिशांशीं तह ठरविला असतां, रंगूनच्या सुभेदारानें दोन इंग्लिश लोकांस धरून नेऊन त्यांचे फार हाल केले. हें वर्तमान गव्हरनर जनरल दालहौसी ह्यास कळतांच, त्यानें कमोदोर लांबर्त ह्याजकडून तो मजकूर आवा[१] येथें ब्रह्मी राजास कळविला. त्यानें त्या सुभेदारास तत्काळ बरतर्फ करून त्याचे जागेवर दुसरा गृहस्थ नेमिला. तोही इंग्लिशांशीं मगरूरीनें वर्तू लागला. तेणेंकरून उभय पक्षांचें वैमनस्य येऊन इ० स० १८५२ त त्यांच्या युद्धास आरंभ झाला. कमोदोर लांबर्त ह्याचे हाताखालीं आरमार देऊन आणि जनरल गाद्रिन ह्याचे हाताखालीं सैन्य देऊन त्यांस ब्रह्मदेशावर रवाना केलें. गाद्रिन ह्यानें मार्ताबान, रंगून, बामासिन इत्यादि शहरें शत्रूपासून घेतलीं. मोठ्या प्रयत्नानें पेगू शहरही इंग्लिशांच्या हातीं आलें. नंतर सगळा पेगू प्रांत गव्हरनर जनरलानें आपले राज्यांत सामील केला. तिकडे आवा येथील राजास त्याच्या भावानें पदच्युत करून गादी मिळविली. तो इंग्लिश सरकारचें सामर्थ्य जाणून होता. ह्मणून त्यानें त्यांशीं तत्काळ त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें तह ठरविला. तेव्हां अर्थात् तिकडील लढाई बंद झाली. हें वर्तमान इ० स० १८५३ त घडलें.

निजामाकडे इंग्लिशांचें सैन्य होतें. त्याच्या पगाराबद्दलची वगैरे खर्चाची मोठी रक्कम त्याजकडे येणें राहिली होती. ती वसुलांत आणण्याविषयीं अनेक वेळां अनेक तजविजी काढिल्या. पण कोणतीच

१. रंगूनच्या उत्तरेस ३१ कोसांवर आहे.

साधेना. तेव्हां निजामानें वऱ्हाडचे चार प्रांत इ० स० १८५३ ह्या वर्षीं इंग्लिशांचे स्वाधीन केले. त्या वेळेपासून वऱ्हाड त्यांच्या ताब्यांत आहे.

झांशीच्या संस्थानाचा राजा बाबा गंगाधरराव हा इ० १८५३ त मरण पावला. त्याला औरस पुत्र नव्हता. ह्मणून त्यानें एक मुलगा दत्तक घेतला होता. तरी, राज्यास योग्य वारसदार कोणी नाहीं ह्मणून तें राज्य लार्ड दालहौसीनें इंग्लिशांच्या राज्यास जोडिलें. त्या-प्रमाणेंच नागपुरचा राजा रघोजी भोंसला इ० स० १८५३ त निवर्तला. त्याला पुत्रसंतान नव्हतें. ह्मणून त्याचें राज्य लार्ड दालहौसी साहेबानें आपल्या राज्यांत घेतलें.

भागलपूर व राजमहाल ह्या प्रांतांतील डोंगरावर सांथललोक होते.[१] त्यांस त्यांच्या सावकारांनीं फार त्रासविल्यामुळें त्यांनीं इ० स० १८५५ च्या जुलै महिन्यांत खालीं उतरून मुलखांत दंगा मांडिला, आणि गांव जाळून आंतल्या लोकांची कत्तल उडविली. तेव्हां त्यांजवर इंग्लिश सरकारची फौज रवाना झाली. तिनें तत्काळ त्यांस त्यांच्या पाहाडामध्यें हांकून दिलें.

इ० स० १८०१ त अयोध्येच्या नबाबाशीं तह ठरला होता, त्या-प्रमाणें त्या राज्याची व्यवस्था सरासरी बरीच चालली होती. परंतु इ० स० १८५५ ह्या वर्षीं त्यामध्यें इतकी अव्यवस्था झाली कीं, लूट, मारामार, खून ह्यांची देखील दाद कोणी घेईना. 'बळी तो कान पिळी' ह्या न्यायानें लोक वर्तूं लागले. इतकें होण्यास कारण राजाचें दुरा-चरण व छांदिष्टपणा होय. अशी झोटिंगबादशाही आपल्या ताब्यां-तल्या व शेजारच्या राज्यांत असणें हें आपणास मोठें लांछन आहे, असें लार्ड दालहौसी साहेबास वाटून, त्यानें तें राज्य, इ० स० १८५६ त आपल्या राज्यांत सामील केलें; आणि तेथला राजा वजीरअल्ली ह्यास दरसाल बारालक्ष रुपये नेमणूक ठरवून त्यास कलकत्त्यास आणून ठेविलें. नंतर त्याच वर्षाच्या मार्च महिन्यांत तो साहेब आपलें काम सोडून स्वदेशीं गेला. त्याचे जागेवर लार्ड क्यानिंग साहेब हा गव्हरनर जनरल होऊन हिंदुस्थानांत आला.

---

१. हे प्रांत बंगाल इलाख्यांत गंगेच्या उजव्या तीरीं आहेत.

लार्ड दालहौसी ह्याच्या कारकीर्दीत हिंदुस्थानांत आगगाड्या आणि तारायंत्रें सुरू झालीं; हिंदु विधवांच्या विवाहाविषयीं कायदा ठरला; धर्मांतराबद्दल कोणास शिक्षा होऊं नये असा कायदा ठरला; गंगेचा कालवा नीट केला; अर्ध्या आण्याच्या तिकिटावर हिंदुस्थानांत पाहिजे तेथें पत्रें जाऊं लागलीं; लोकांच्या विद्याभ्यासाची सोय पुष्कळ वाढली; इलाख्यांनिहाय युनिव्हर्सिट्या स्थापण्याचा ठराव झाला. इत्यादि अनेक चांगल्या गोष्टी ह्याचे वेळीं झाल्या. हा स्वदेशीं गेल्यावर इ० स० १८६० त मरण पावला.

---

# भाग सतरावा.

## बंगाल्यांतील शिपायांच्या बंडाचीं कारणें व त्याचा आरंभ.

### इ० स० १८५६—५७.

लार्ड क्यानिंग साहेब काम पाहूं लागला तेव्हां चोहींकडे बरीच स्वस्थता होती. परंतु थोडक्या वेळानंतर त्याला लढायांच्या कामांत पडावें लागलें.

हिरात येथें इ० स० १८३७ त इंग्लिश आणि इराणी लोक ह्यांची जी खडाजंगी झाली होती, ती मनांत धरून ते इंग्लिशांस वारंवार त्रास देत. त्यांजवर लार्ड क्यानिंग ह्यानें सैन्यासहवर्तमान सर जेम्स ऊत्रम ह्यास पाठविलें. त्यानें इ० स० १८५७ च्या फेब्रुआरीच्या ७ व्या तारखेस बारासजुन[१] येथें इराणी लोकांचा पराभव केला. नंतर त्यांनीं मार्चाच्या चवथ्या तारखेस इंग्लिशांशीं तह केला. आणि हिरात व अफगाणिस्थान ह्यांवरचे आपले सगळे हक्क सोडून दिले.

त्याप्रमाणेंच चिनी लोकही व्यापाराच्या कामांत इंग्लिशांस त्रास देत असत, त्याचा बंदोबस्त करण्यास लार्ड एलजिन हा पुष्कळ सैन्यासह चिनावर गेला. त्यानें त्यांस जेर करून कांतानाचा सुभेदार येह ह्यास कैद करून कलकत्त्यास आणिलें. तेव्हां चिनी सरकारानें इंग्लिशांशीं तह केला, आणि त्यांस व्यापाराची मोकळीक दिली.

ह्यानंतर बंगाल्यांत काळ्या पलटणी लोकांनीं बंड केलें. ह्या बंडाचें

---

१. बुशायरपासून तेवीस कोसांवर आहे.

बीज एकाएकीं उत्पन्न झालें नाहीं. त्याचा माग पुष्कळ दिवसांमागचा आढळतो. ब्रह्मदेशाशीं प्रथम लढाई आरंभली, त्या वेळीं बंगालच्या शिपायांनीं तिकडे जाण्याविषयीं फार कुरकूर केली. व कितीएकांनीं आपल्या नोकऱ्या सोडिल्या सुद्धां. तेव्हांच त्यांचा बंडावा करण्याचा रंग दिसला. परंतु त्याचा बंदोबस्त मोठ्या तजविजीनें झाला. पुढें पंजाबची लढाई मांडिली. त्या समयींही, पगार वाढविल्यावांचून आह्मी तिकडे जात नाहीं, असें, बंगाली शिपायांनीं आपले अंमलदारांस स्पष्ट सांगितलें. आणि तें सरकार मान्य करीना, ह्मणून ते अगदीं नाखुष होऊन बिथरावयाच्या बेतास आले. त्या प्रसंगींही त्यांचा आवेश सर चार्लस नेपियर साहेबानें मोठ्या प्रयासानें शमविला. ह्या कामीं सामोपचार फार योजिल्यामुळें, बंगालच्या पलटणींत मोठा भरणा ब्राह्मणांचा व रजपुतांचा, ते आधींच गर्विष्ठ, त्यांस असें पक्कें वाटलें कीं, इंग्लिशांचें ह्या देशांतलें राज्य काय तें आमच्या बळावर चाललें आहे, आमच्या साह्यावांचून ह्यांस हें घटिकाभर सुद्धां चालवितां येणार नाहीं. ही त्यांची धमक लार्ड दालहौसी ह्याच्या लक्षांत येऊन चुकली होती, व ती त्यानें कलकत्त्यांतून निघून जातांना स्पष्ट बोलून सुद्धां दाखविली होती, आणि तिचा परिणाम भयंकर झाल्यावांचून राहावयाचा नाहीं, असें उघड सांगितलें होतें. परंतु, त्या गोष्टीकडे कोणींच लक्ष पुरविलें नाहीं.

हिंदुस्थानांत गोऱ्या फौजेचें कारण राहिलें नाहीं, असें सरकारास वाटून क्रिमिया व इराण येथें लढायांवर जीं सैन्यें तूर्त ह्मणून रवाना झालीं होतीं, तीं तावडतोब परत आणवून जिकडील तिकडे ठेवायाचीं, तीं ठेविलीं नाहींत. पंजाबाविषयीं मात्र विश्वास येईना, ह्मणून त्याच्या सरहद्दीवर कांहीं लोक ठेविले होते. दिल्ली ह्मणजे मुसलमानांच्या गूढ कटाचें अगदीं घर, तेथला दारूगोळा वगैरे लढाऊ सामान एतद्देशीय फौजेच्या ताब्यांत असे. इतकें सरकार बेसावध होतें.

फौजेमध्यें व लोकांमध्यें मुख्य प्रबळ जाती दोन; एक हिंदु, आणि दुसरी मुसलमान. त्यांचें एकमेकांशीं पूर्वापार हाडवैर, त्या कधीं एक व्हावयाच्या नाहींत, आणि त्या एक होतपर्यंत आपल्या राज्यास कांहीं धक्का नाहीं, असा सरकारचा समज होता. व तो कांहीं अंशीं

लार्द दालहौसी ह्याच्या कारकीर्दींत हिंदुस्थानांत आगगाड्या आणि तारायंत्रें सुरू झालीं; हिंदु विधवांच्या विवाहाविषयीं कायदा ठरला; धर्मांतराबद्दल कोणास शिक्षा होऊं नये असा कायदा ठरला; गंगेचा कालवा नीट केला; अर्ध्या आण्याच्या तिकिटावर हिंदुस्थानांत पाहिजे तेथें पत्रें जाऊं लागलीं; लोकांच्या विद्याभ्यासाची सोय पुष्कळ वाढली; इलाख्यांनिहाय युनिव्हर्सिट्या स्थापण्याचा ठराव झाला. इत्यादि अनेक चांगल्या गोष्टी ह्याचे वेळीं झाल्या. हा स्वदेशीं गेल्यावर इ० स० १८६० त मरण पावला.

---

# भाग सतरावा.

## बंगाल्यांतील शिपायांच्या बंडाचीं कारणें व त्याचा आरंभ.

### इ० स० १८५६—५७.

लार्द क्यानिंग साहेब काम पाहूं लागला तेव्हां चोहींकडे बरीच स्वस्थता होती. परंतु थोडक्या वेळानंतर त्याला लढायांच्या कामांत पडावें लागलें.

हिरात येथें इ० स० १८३७ त इंग्लिश आणि इराणी लोक ह्यांची जी खडाजंगी झाली होती, ती मनांत धरून ते इंग्लिशांस वारंवार त्रास देत. त्यांजवर लार्द क्यानिंग ह्यानें सैन्यासहवर्तमान सर जेम्स ऊत्रम ह्यास पाठविलें. त्यानें इ० स० १८५७ च्या फेब्रुआरीच्या ७ व्या तारखेस बारासजुन[१] येथें इराणी लोकांचा पराभव केला. नंतर त्यांनीं मार्चाच्या चवथ्या तारखेस इंग्लिशांशीं तह केला. आणि हिरात व अफगाणिस्थान ह्यांवरचे आपले सगळे हक्क सोडून दिले.

त्याप्रमाणेंच चिनी लोकही व्यापाराच्या कामांत इंग्लिशांस त्रास देत असत, त्याचा बंदोबस्त करण्यास लार्द एलजिन हा पुष्कळ सैन्यासह चिनावर गेला. त्यानें त्यांस जेर करून कांतानाचा सुभेदार येह ह्यास कैद करून कलकत्त्यास आणिलें. तेव्हां चिनी सरकारानें इंग्लिशांशीं तह केला, आणि त्यांस व्यापाराची मोकळीक दिली.

ह्यानंतर बंगाल्यांत काळ्या पलटणी लोकांनीं बंड केलें. ह्या बंडाचें

---

१. बुशायरपासून तेवीस कोसांवर आहे.

बीज एकाएकीं उत्पन्न झालें नाहीं. त्याचा माग पुष्कळ दिवसांमागचा आढळतो. ब्रह्मदेशाशीं प्रथम लढाई आरंभली, त्या वेळीं बंगालच्या शिपायांनीं तिकडे जाण्याविषयीं फार कुरकूर केली. व कितीएकांनीं आपल्या नौकऱ्या सोडिल्या सुद्धां. तेव्हांच त्यांचा बंडावा करण्याचा रंग दिसला. परंतु त्याचा बंदोबस्त मोठ्या तजविजीनें झाला. पुढें पंजाबची लढाई मांडिली. त्या समयींही, पगार वाढविल्यावांचून आह्मी तिकडे जात नाहीं, असें, बंगाली शिपायांनीं आपले अंमलदारांस स्पष्ट सांगितलें. आणि तें सरकार मान्य करीना, ह्मणून ते अगदीं नाखूष होऊन बिथरावयाच्या बेतास आले. त्या प्रसंगींही त्यांचा आवेश सर चार्लस नेपियर साहेबानें मोठ्या प्रयासानें शमविला. ह्या कामीं सामोपचार फार योजिल्यामुळें, बंगालच्या पलटणींत मोठा भरणा ब्राह्मणांचा व रजपुतांचा, ते आधींच गर्विष्ठ, त्यांस असें पकें वाटलें कीं, इंग्लिशांचें ह्या देशांतलें राज्य काय तें आमच्या बळावर चाललें आहे, आमच्या साह्यावांचून ह्यांस हें घटिकाभर सुद्धां चालवितां येणार नाहीं. ही त्यांची धमक लार्ड दालहौसी ह्याच्या लक्षांत येऊन चुकली होती, व ती त्यानें कलकत्त्यांतून निघून जातांना स्पष्ट बोलून सुद्धां दाखविली होती, आणि तिचा परिणाम भयंकर झाल्यावांचून राहावयाचा नाहीं, असें उघड सांगितलें होतें. परंतु, त्या गोष्टीकडे कोणींच लक्ष पुरविलें नाहीं.

हिंदुस्थानांत गोऱ्या फौजेचें कारण राहिलें नाहीं, असें सरकारास वाटून क्रिमिया व इराण येथें लढायांवर जीं सैन्यें तूर्त ह्मणून रवाना झालीं होतीं, तीं ताबडतोब परत आणवून जिकडील तिकडे ठेवायाचीं, तीं ठेविलीं नाहींत. पंजाबाविषयीं मात्र विश्वास येईना, ह्मणून त्याच्या सरहद्दीवर कांहीं लोक ठेविले होते. दिल्ली ह्मणजे मुसलमानांच्या गूढ कटाचें अगदीं घर, तेथला दारूगोळा वगैरे लढाऊ सामान एतद्देशीय फौजेच्या ताब्यांत असे. इतकें सरकार बेसावध होतें.

फौजेमध्यें व लोकांमध्यें मुख्य प्रबळ जाती दोन; एक हिंदु, आणि दुसरी मुसलमान. त्यांचें एकमेकांशीं पूर्वापार हाडवैर, त्या कधीं एक व्हावयाच्या नाहींत, आणि त्या एक होतपर्यंत आपल्या राज्यास कांहीं धक्का नाहीं, असा सरकारचा समज होता. व तो कांहीं अंशीं

बरोबर ह्मटला पाहिजे. परंतु दुर्दैवेंकरून ह्या संधीस सर्वच गोष्टी विपरीत घडून आल्या. त्या अशाः—कांहीं आधार नसतां काळ्या लोकांच्या लष्करांत अशी एक विलक्षण गप्प उठली कीं, सरकार हर-तऱ्हेनें, एतद्देशीय लोकांस ख्रिस्ती करूं पाहत आहे. ही गप्प, थोडक्या वेळांत थोडीकडे पसरली. आणि तिजविषयीं जिकडे तिकडे मोठा गवगवा झाला. आणखीं असें घडलें कीं, नवीन प्रकारच्या बंदुका निघाल्या होत्या, त्या बंगालच्या शिपायांस देण्याविषयीं इ० स० १८५७ च्या आरंभीं, सरकारानें निश्चय केला. व त्यांच्या उपयोगाकरितां नवीन काडतुसेंही पाहिजेत, ह्मणून तीं तयार करण्याचा कारखाना डमडम येथें घातला हा गांव कलकत्त्यापासून सुमारें चार कोसांवर आहे. तेथें, एके दिवशीं, कोणी एक ब्राह्मण शिपाई, पाण्याचा गडवा भरून घेऊन चालला असतां, सदरहू कारखान्यांतील खलाशांपैकीं कोणी मनुष्य त्याजपाशीं पाणी प्यावयास मागूं लागला. त्यास ब्राह्मण शिपायानें सांगितलें कीं, तुझ्या स्पर्शानें माझा गडवा विटाळेल, म्हणून मी तुला पाणी देत नाहीं. खलाशानें त्यास उत्तर दिलें कीं, "ठीक आहे, जरा दमाखालीं घ्या; तुह्मी जात जात ह्मणून फार उड्या मारीत आहां; पण साहेबलोक आतां जीं काडतुसें तयार करवीत आहेत, त्यांस गाईची चर्बी आणि डुकराची चर्बी लावीत असतात; तीं काडतुसें तुह्मांला दांतांनीं तोडावीं लागतील; मग तुमची जात कोठें शी आहे ती पाहूं." हा वाद सगळ्या लोकांच्या कानीं गेला. आणि त्यानें वर सांगितलेल्या गप्पेस अधिक पुष्टीकरण आणिलें. हिंदु लोकांस गोमांसाचा तिरस्कार, आणि मुसलमानांस डुकराचा अतिशयित तिटकारा, तो इतका कीं ते त्याचें नांव देखील उच्चारीत नाहींत. ह्या दोनही प्राण्यांचीं मांसें कपटें करून सरकार आपल्या तोंडांत घालून आपणांस बाटविणार, असें त्या दोन्ही जातींच्या लोकांस खचीत वाटलें. तेव्हां ते एकत्र होऊन इंग्लिशांच्या नाशाविषयीं मसलती करूं लागले.

सरकार कोणालाही जबरदस्तीनें ख्रिस्ती करूं इच्छीत नाहीं, अशाविषयीं इंग्लिश अंमलदारांनीं शिपाई लोकांस पुष्कळ समजावून सांगितलें, व काडतुसांस तुह्मीच आपल्या हातानें तल मेण, विकत

आणून एकत्र करून लावा, अशी मोकळीक दिली. तरी त्यांच्या मनांत आलेलें पाप जाईना. त्यांनीं असा संशय घेतला कीं, कागदांतच कांहीं कपट नाहीं म्हणून कशावरून? एतावता त्यांच्या शंकेचें निवारण अशक्य झालें. जिकडे जावें तिकडे शिपाई लोकांत ह्या गोष्टी ऐकूं येत. आणि ज्याला त्याला धर्माभिमानाचें स्फुरण आलें आहे असें दिसे. त्यांच्या डोक्यांतलें वेड काढण्याविषयीं गोरे अमलदारांनीं आपली पराकाष्ठा करून सोडिली. परंतु सर्व व्यर्थ. इतक्या खटपटीचा कांहींएक उपयोग झाला नाहीं.

शेवटीं, एकुणिसाव्या काळ्या पायदळ पलटणीची एक टोळी, तारीख २५ फेब्रुआरी सन १८५७ रोजीं, बर्हामपुर म्हणून एक गांव कलकत्त्यापासून उत्तरेस सुमारें ५८ कोस आहे, तेथें बिथरली. या ठिकाणीं गोरी फौज नव्हती. कर्नेल मिचल साहेब हा तेथें मुख्य अधिकारी होता. हा दंगा रात्रीं आरंभला. त्या समयीं, बिघडलेल्या लोकांवर एक टोळी बरोबर घेऊन चाल करावी, असें मिचल साहेबाच्या मनांत आलें. परंतु रात्र पडली अंधारी; आणि बरोबर न्यावयाचे ते तरी काळे शिपाई; ते प्रसंगीं काय करतील कोण जाणे; अशा विचारावरून त्यानें हल्ल्याचा बेत तसाच रहित केला. तथापि, कोणत्या तरी प्रकारें दंगा मोडिला पाहिजे असें जाणून, त्यानें बंडावलेल्या लोकांशीं सल्ल्याचें बोलणें लाविलें. त्यांत इतकेंच ठरलें कीं, मिचल साहेबानें पुढें आणिलेले स्वार परत न्यावे, आणि ते परत चालते झाले, म्हणजे शिपाई लोकांनीं आपापल्या बिऱ्हाडीं जाऊन स्वस्थ व्हावें. त्याप्रमाणें उभयपक्षांनीं केलें.

थोडेसे लोक बिघडले त्यांशीं देखील सरकारच्या अंमलदारांनीं सल्ला केला, ही बर्हामपुरची खबर ऐकून जागोजागच्या शिपायांस अधिकच चेव आला. तारीख २९ मार्च सन १८५७ रोजीं बराकपुर[1] येथें ३४ व्या काळ्या पायदळ पलटणीच्या लोकांनीं दंगा केला. मोंगलपांडीनामक एका शिपायानें लेफ्तनेंत बाग ह्यास तरवारीनें वार करून घायाळ केलें. त्या ठिकाणापासून सुमारें वीस हातांच्या अंतरावर एक जमादार व त्याच्या हाताखालचे १५।२० शिपाई, ती मौज पहात होते.

१. हुगळीच्या पूर्वेस कलकत्त्यापासून उत्तरेस आठ कोसांवर आहे.

पण साहेबाला सोडविण्यास किंवा दंगा मोडण्यास एक असामी देखील जाग्यावरून हालला नाहीं. कारण, तेही त्यांतलेच होते.

एकुणिसाव्या पलटणींतील बिथरलेले लोक बराकपुरास येण्याकरितां वार्सेत येथें दाखल झाले. त्यांच्या अपराधाबद्दल त्यांजपासून त्यांचीं हत्यारें घ्यावीं व त्यांस नौकरींतून काढावें असें क्यानिंग साहेबानें ठरविलें, व लागलेंच अंमलांत आणिलें. ह्या एवढ्या अपराधास ही शिक्षा अगदींच कांहीं नाहीं ह्मटली पाहिजे. त्या वेळच्या सुमारास बंडासंबंधीं कांहीं गूढार्थसूचक चपात्या, ह्या पलटणींतून दुसऱ्या पलटणींत, आणि दुसऱ्या पलटणींतून तिसऱ्या पलटणींत अशा फिरत. त्यांचा हेतु इंग्लिश पक्षाच्या लोकांस कळेना.

अयोध्या प्रांतांत, लखनौपासून तीन चार कोसांवर, ७ वी पलटण होती, तिजमधील लोक तारीख २ माहे मे रोजीं बदलले, आणि ४८ वी पलटण लखनौ येथें होती, तिजमधील लोकांस त्यांनीं लिहून पाठविलें, कीं, 'काडतुसांच्या प्रकरणीं तुह्मी सांगाल तें करण्यास आह्मी सिद्ध आहों.' हें वर्तमान तेथील कमिशनर सर हेनरी लारेन्स साहेब ह्यास समजतांच, जी गोरी फौज ठिकठिकाणीं ठेविलेली होती, ती त्यानें ताबडतोब लखनौस आणविली. आणि बिथरलेल्या लोकांस नौकरींतून बरतर्फ देऊन तत्काळ होणाऱ्या दंग्याचें तूर्त निवारण केलें.

दिल्लीपासून ईशान्येस सत्रा अठरा कोसांवर मीरत ह्मणून शहर आहे. तेथें मे महिन्याच्या १० व्या तारखेस, तिसऱ्या घोडेस्वार पलटणीनें रात्रीं दंगा केला. तो असा कीं, प्रथम तुरुंगावर चाल करून आंतले सर्व कैदी सोडून दिले; साहेबलोकांचे बंगले जाळिले; आणि गोरे लोक व त्यांचीं माणसें जीं त्यांच्या सपाट्यांत सांपडलीं, त्यांस, बायकामुलांसुद्धां, बकऱ्यांप्रमाणें चरचरां कापून काढिलें.

---

## भाग अठरावा.

### बंडाचा प्रसार, शेवट, परिणाम, इत्यादि.

इ० स० १८५७.

नंतर बंडवाले दूमदूम करीत मिरतेहून निघाले ते, तारीख ११ माहे मे रोजीं दिल्लीस पोहोंचले. शहरांत त्यांचे दुष्ट मिलाफी त्यांची वा-

टच पाहात होते. ते व हे एकत्र होतांच, इंग्लिशांच्या कत्तलीस आरंभ झाला. तेव्हां पन्नाससाठ इंग्लिश मनुष्यें राजवाड्यांत जाऊन विश्वासानें बादशाहाच्या आश्रयानें राहिलीं. ब्रिगेडियर ग्रेव्हस म्हणून एक सरदार होता, तो ३०० शिपाई व २ तोफा ह्यांसहवर्तमान किल्याचे गढींत जाऊन बसला. पण त्या शिपायांचें इमान फार वेळ टिकलें नाहीं. ते तेव्हांच फितले, आणि गोरे लोक प्राणसंरक्षणार्थ सैरावैरा धांवूं लागले. इकडे बंडवाल्यांनीं बादशाहास त्याचे तक्तावर बसवून त्याचे नांवाची द्वाही फिरविली.

राजवाड्याजवळच इंग्लिशांचा पुष्कळ दारूगोळा भरलेला होता, त्यावर बंडवाले पडले. त्या इमारतींत ९ गोरे लोक होते, त्यांनीं लढाऊ सामान शत्रूंच्या हातीं न लागावें, म्हणून त्याचें बहुत प्रकारें रक्षण केलें; परंतु उपाय हरले असें पाहून शेवटीं त्यांनीं त्यास बत्ती लाविली. तेणेंकरून त्यांच्यापैकींही कितीएक आसामी मरण पावले. बादशाहा मामूल चालीप्रमाणें दरबार भरूं लागला; सर्व दिल्ली शहरांत बंडवाल्यांचा अंमल बसला; आणि जे गोरे लोक विश्वासानें राजवाड्यांत येऊन दडून राहिले होते, त्यांची कत्तल तारीख १६ मे रोजीं फार क्रूरपणानें बंडखोरांनीं उडविली. तींत बिचाऱ्या अबला व कांहीं मुलेंही प्राणांस मुकलीं. पुरुष योध्यांची गोष्ट एक वेळ असो; पण निर्बल बायकामुलांचे प्राण घेण्यांत त्या दुष्टांनां काय पुरुषार्थ वाटला असेल तो कोण जाणे.

दिल्लीचें वर्तमान पंजाबांत समजलें तेव्हां तेथल्याही शिपायांचीं मनें बिघडलीं. त्यांचा बंडावा करण्याचा रंग उघड दिसूं लागला. तेव्हां तेथील अधिकाऱ्यांनीं बिघडलेल्या पलटणींचीं हत्यारें घेऊन तो आवेश कांहीं वेळ शमविला. पेशावर प्रांतांत बंडाच्या संकेताचीं पत्रें सरकारच्या हातीं लागलीं. ५५ व्या पलटणीची एक टोळी अटक तरीवर पाहाऱ्यास होती. ती तारीख २१ मे रोजीं आपली जागा सोडून एकदम नवाशहराकडे चालली. तीस २१ व्या पलटणीची एक टोळी वाटेंत मिळाली. नवाशहराचा अधिकारी मेजर व्हर्नर हा कांहीं लोक घेऊन त्यांस आडवा झाला, आणि त्यानें त्यांचीं हत्यारें घेऊन त्यांस कैद करून आणिलें. त्याच शहरांत ५५ वी पैकीं कांहीं

लोक होते, ते त्यांचेच मिलाफी. तेव्हां त्यांनीं धांवून येऊन आपल्या बंधूंस मुक्त केलें, आणि हा सगळा घोळका मर्दन शहराकडे चालता झाला; कारण, ५५ वीचे बहुतेक लोक तेथें होते. ह्याप्रमाणें ५५ वी पलटण सगळी बिघडली.

ह्यानंतर पेशावरच्या पुष्कळ पलटणींचीं हत्यारें सरकारानें घेतलीं; व निकलसन साहेबास, बरोबर बरीच गोरी फौज देऊन, ५५ व्या पलटणीच्या पारिपत्यास मर्दनाकडे रवाना केलें. त्यानें त्या लोकांचा पाठलाग करून १२० मारिले व १५० कैद करून आणिले.

ह्याच सुमारास दुआबामध्यें शिपायांनीं बंड माजविलें. शिंद्याच्या राज्यांत नीमच येथें कांहीं इंग्लिश लोक, बाहेरून निघून, भीतीनें, किल्ल्यांत जाऊन राहिले. परंतु, आंतल्या शिपायांनीं बाहेरच्या बंडवाल्यांस दार उघडून यांचा विश्वासघात केला. तारीख ५ जून रोजीं झांशी येथें बंड झालें, तेथें इंग्लिश पुरुष, बायका, मुलें मिळून ५५ होतीं, त्यांनीं किल्ल्यांत जाऊन बसून बचावाची तजवीज केली; परंतु बंडखोरांस झांशीची राणी सहाय झाली. त्या सगळ्यांनीं किल्ल्याला वेढा घातला. तेव्हां आंतले गोरे लोक निर्बल होऊन, त्यांनीं तहाचें बोलणें लाविलें. त्यांस आम्ही तुमच्या केसास धक्का लावणार नाहीं, असें बंडखोरांनीं वचन देऊनही क्रूरपणानें ठार मारिलें.

पुढें आग्रा, अलाहाबाद, काशी, इत्यादि अनेक जागीं धामधूम चालली. ती ऐकून लखनौ येथें बदमाषी लोकांनीं दंगा माजविला. तो सरकारच्या फौजेनें लागलाच मोडिला. परंतु, बंडखोरांचा जय इतर पुष्कळ ठिकाणीं होत चालला, व ते सरकारचें कांहीं चालूं देत नाहींत, असें लखनौच्या पलटणींस समजलें, तेव्हां त्या एकदम बिथरून शहर बळकावून बसल्या.

तारीख ५ जून रोजीं कानपुरास बंड उठलें. तेथील लोकांस, शेवटच्या बाजीरावाचा पुत्र नानासाहेब हा मिळाला. आणि तो आपणास पेशवा ह्मणवूं लागला. कानपुरांत जे गोरे लोक होते, ते एके जागेभोंवतीं मोठा खंदक खणून, आंत अन्नसामग्री दारूगोळा वगैरे घेऊन, सावधगिरीनें राहिले. त्यांत मुख्य अधिकारी सर ह्यू व्हीलर

१. मद्रूच्या वायव्येस ८ कोस. २. आग्र्याच्या दक्षिणेस ७० कोसांवर.

हा होता. त्या स्थळास बंडवाल्यांनीं वेढा घातला. दुर्दैवेंकरून आंतल्या तंबूस वगैरे आग लागून पुष्कळ इंग्लिश माणसें मेलीं, आणि माल्हीही जळाला. शेवटीं जीवरक्षणाच्या आणाशपता नानासाहेबापासून घेऊन तीं सगळीं तेथून बाहेर निघालीं. पण त्या पाषाणहृदयानें त्यांतलें एकोनएक माणूस अत्यंत क्रूरपणानें मारून टाकिलें. हें वर्तमान तारीख १ जुलैपर्यंत झालें.

तिकडे दिल्ली परत घेण्याची तयारी सरकारानें चालविली. जी गोरी फौज दूरदूरच्या ठिकाणीं होती, ती सगळी एकत्र जमविली. शिवाय पंजाबांतून सैन्याची चांगली मदत आली. आणि कपुरथळ्याच्या वगैरे कितीएक संस्थानिकांनींही इंग्लिशांस यथाशक्ति साह्य केलें. दिल्लीवर हल्ला करण्यासाठीं इंग्लिश सैन्य आलें, त्याच्या व बंडखोरांच्या, शहराच्या आसपास कितीएक झटापटी झाल्या. दिल्लीस इंग्लिश सैन्याचा वेढा पडलाच होता. इकडे नजफगड[१] येथें ६,००० बंडखोरांशीं इंग्लिश सैन्याची एक मोठीच लढाई झाली. तींत ८०० शत्रु पडले. वेढा घालणारांस भक्कम मदत मिळाल्यावर, त्यांनीं शहरची काश्मीर वेस, व लाहोर वेस हे मोठे दरवाजे फोडून, आंतलि शत्रूंवर एकदम हल्ला केला. तेव्हां बंडवाले पळत सुटले. आणि तारीख २० सप्तंबर रोजीं दिल्ली शहरांत इंग्लिशांचा अंमल पुनः स्थापित झाला.

कानपुर बंडवाल्यांपासून घेण्याचे कामावर जनरल हावेलाक ह्याची नेमणूक सरकारानें केली. त्यानें फत्तेपुरास बंडवाल्यांच्या एका मोठ्या टोळीचा पराभव करून, त्यांस पळावयास लाविलें, व मोठ्या पराक्रमानें महाराजपुरांतून[२] त्यांस हाकून देऊन, तें हस्तगत करून घेतलें. त्याप्रमाणेंच कानपुरावर गोळ्यांचा वर्षाव करून, बंडखोरांस दे माय धरणी ठाय करून टाकिलें, आणि तें तारीख १७ जुलै रोजीं सर केलें. त्यापूर्वीं दोन दिवस नानासाहेबानें २१० अनाथ इंग्लिश बायकामुलांस त्या शहरांत बकऱ्यांप्रमाणें कापून ठार मारिलें होतें. ह्याखेरीज औनाव, बसरतगंज, बितूर इत्यादि ठिकाणीं इंग्लिश सैन्यास बंडवाल्यांवर जय मिळाले ते वेगळेंच.

१. दिल्लीच्या नैर्ऋत्येस ८ कोसांवर आहे.
२. कानपुरच्या खालीं गंगेच्या किनाऱ्यावर.
३. भरतपुरच्या दक्षिणेस.

लखनौ शहर बंडवाल्यांपासून घेण्यास सरकाराला फार प्रयास पडले.[१] कारण, तेथें बंडवाल्यांचा जमाव मोठा असून त्यांस आश्रयास स्थल चांगलें सोईचें होतें. हावेलाक, सर जेम्स उत्रम अशा मोठमोठ्या योध्यांची योजना त्या कामावर झाली, तेव्हां तें हातीं लागलें. तारीख २५ सप्तेंबर सन १८५७ रोजीं तेथें इंग्लिशांचा पूर्ण अंमल बसला. हें शहर पुनः स्वाधीन करून घेण्याचे प्रसंगांत इंग्लिशांकडचे पुष्कळ लोक पडले.

झांशी बंडवाल्यांच्या ताब्यांत होती. ती तारीख ३ माहे एप्रिल सन १८५८ रोजीं सर ह्यू रोज नामक महापराक्रमी इंग्लिश सरदारानें घेतली. तेव्हां तेथील राणी व इतर बंडखोर दशदिशा पळून गेले. त्याच्या पूर्वीं दोन दिवस रोज साहेबानें तेथें जवळच बंडवाल्यांशीं एक मोठी लढाई मारिली. त्या वेळीं प्रतिपक्षाचा मुख्य तात्या टोपे हा होता. त्या समरांत १,००० बंडवाले पडले; व त्यांच्या पुष्कळ तोफा सरकारच्या लोकांच्या हातीं लागल्या.

नंतर रोजसाहेब काल्पी घ्यावयास निघाला. त्यास वाटेंत कुंच येथें २०,००० बंडवाले भेटले. त्यांचा अधिपति तात्या टोपे होता. झांशीची राणीही तेथेंच होती. उभयपक्षांची चांगलीच चकमक झडली. तेव्हां शत्रु पळून गेले. ता० २५ मे सन १८५८ रोजीं ही इंग्लिश फौजेची स्वारी काल्पीवर आली. आंत बंडवाले होते, त्यांनीं स्वसंरक्षणाची पुष्कळ खटपट केली, पण ती कांहीं चालेना. शेवटीं त्यांतले कांहीं लोक शरण आले, व बाकीच्यांनीं पळ काढिला. तेव्हां काल्पी रोजसाहेबाचे हस्तगत झाली.

बंडवाले काल्पीहून पळाले ते ग्वाल्हेरीवर आले, आणि तें शहर त्यांनीं घेतलें. त्या वेळीं शिंदा आग्रा येथें पळून जाऊन राहिला. त्याचे गादीवर, नानासाहेबाचा पुतण्या बाळासाहेब ह्यास बंडवाल्यांनीं बसविलें. हें सर ह्यू रोजसाहेबास कळतांच तो सैन्यासहवर्तमान ग्वाल्हेरीजवळ प्राप्त झाला. आणि त्यानें हल्ला करून तारीख १९ जून स० १८५८ इ० रोजीं तें शहर बंडवाल्यांचे हातून माघारें

१. कानपुरच्या नैर्ऋत्येस २३ कोसांवर आहे.

घेतलें. नंतर तारीख २० रोजीं शिंदा ह्यास त्याची गादी पुनः मिळाली. हें त्याच्या प्रामाणिकपणाचें फळ होय. हें शहर घेतलें तेव्हां मोठी कत्तल उडाली. सगळे रस्ते प्रेतांनीं भरून गेले होते. त्यांत झांशीची राणी पडली.

ह्या प्रकारेंकरून अयोध्या, रोहिलखंड, आणि मध्यहिंदुस्थान, ह्यांतील बंडवाल्यांची दाणादाण सरकारानें करून सोडली. नानासाहेब नेपाळांत पळून गेला होता, तेथें तो मेला असावा, असें ह्मणतात. त्याचा साथी तात्या टोपे ह्यानें कानपुरांत पुष्कळ इंग्लिश माणसांचे खून केले, त्यास पकडून फांशीं दिलें. ह्या बंडानें ह्या देशाचा फायदा तर कांहीं केला नाहींच. पण विनाकारण हजारों लोक प्राणांस मुकले; शेंकडों गांव ओस पडले; व पांचपन्नास एतद्देशीय संस्थानांस असे धक्के बसले कीं, त्यांनीं त्यांचे पायेच निखळिले.

इ० स० १८५८ पावेतों, हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या मुलखाचा राज्यकारभार, वेळोवेळीं घेतलेल्या सनदांच्या आधारानें, आनरेबल ईस्तइंदिया कंपनी ह्या नांवाची एक मंडळी पाहत असे. तो, वर सांगितलेल्या वर्षीं महाराणीसाहेब विक्तोरिया ह्यांनीं खुद्द आपले हातीं घेतला. ह्याविषयींचे जाहीरनामे इ० स० १८५८ च्या नोवेंबर महिन्याच्या पहिल्या तारखेस सर्व हिंदुस्थानांत प्रसिद्ध झाले. त्या वेळीं लार्ड क्यानिंगच गव्हरनर जनरल होता. तेव्हांपासून गव्हरनर जनरलास व्हाइसराय ह्मणजे प्रतिनिधि हा नवा हुद्दा मिळाला.

लार्ड क्यानिंग हा इ० स० १८६२ च्या मार्च महिन्यांत आपलें काम सोडून विलायतेस गेला; आणि त्याचे जागीं लार्ड एल्‌जिन हा नवा गव्हरनर जनरल आला. ह्याच सुमारास अमेरिकेंतल्या स्वतंत्र संस्थानांत अपसांत लढाई चालू झाल्यामुळें, तिकडचा कापूस इंग्लंडास जाण्याचा बंद होऊन, हिंदुस्थानांतल्या कापसाची किंमत पराकाष्ठेची वाढली होती. त्याच्याच वेळेस कायदेकौंसलामध्यें एतद्देशीय लोकांस सभासद नेमूं लागले. अफगाणिस्थानाच्या सरहद्दीवर वाहाबी ह्मणून जे मुसलमान लोक होते, त्यांनीं दंगा मांडिला होता, तो मोडिला. लार्ड एलजिन हा, प्रांतांत फिरत असतां, इ० स० १८६३ च्या नोवेंबर महिन्याच्या २० व्या तारखेस पंजाबामध्यें धर्मशाळा येथें मरण

पावला. नंतर सर जान लारेन्स हा गव्हरनर जनरल झाला. नंतर लवेंकरच भुतान येथील राजाशीं कलह उत्पन्न होऊन लढाई सुरू झाली. तींत भुतानी लोक पराभव पावले, आणि द्वार्स हा प्रांत इंग्लिशांनीं आपुल्या राज्यांत सामील केला. त्याचे कारकीर्दीत इ० स० १८६६ मध्यें ओरिसा प्रांतांत भयंकर दुष्काळ पडला. दुष्काळांत अन्न न मिळाल्यानें जर लोक मेले, तर त्याबद्दलची जबाबदारी सरकारी कामदारांच्या माथीं आहे, असें ठरलें; आणि शेरअली हा अफगाणिस्थानचा अमीर म्हणून इंग्लिश सरकारानें कबूल केला. नंतर सर जान लारेन्स ह्यानें इ० स० १८६९ त गव्हरनर जनरलाचें काम सोडिलें. तो स्वदेशीं गेल्यावर लार्ड मेयो हा गव्हरनर जनरल झाला. ह्याच्या कारकीर्दीत महाराणीसाहेबांचे द्वितीय चिरंजीव हिंदुस्थान पाहावयास आले होते. मेयोनें शेतकीखातें स्थापिलें, आणि मिठावरच्या करांत पुष्कळ फेरफार केले. त्याप्रमाणेंच, व्यापार, आगगाड्या आणि लोकोपयोगी कामें ह्यांस त्यानें पुष्कळ उत्तेजन दिलें. तो आंदमान बेटांत तेथील तुरुंगाची व्यवस्था पाहावयास गेला असतां, इ० स० १८७२ च्या फेब्रुआरी महिन्याच्या आठव्या तारखेस, शेरअली ह्या नांवाच्या एका मुसलमान कैदीनें एका सुरीनें त्याच्या पाठीस भोंसा केलें, तेणेंकरून तो तत्काळ मरण पावला. त्याच्या मागून लार्ड नार्थब्रुक साहेब गव्हरनर जनरल होऊन आले. आणि मे महिन्याच्या तिसऱ्या तारखेस आपलें काम पाहूं लागले. इ० स० १८७४ ह्या वर्षी खालच्या बंगाल्यांत दुष्काळ पडला होता. तेथें त्यांनीं मोठमोठीं कामें काढून गरीबगुरीबांचे जीव वांचविले. पुढें, बडोद्याचे गायकवाड मल्हारराव ह्यांजवर तेथील रेसिडेंत कर्नल फेर साहेब ह्यांस विषप्रयोग करविण्याचा आरोप आल्यावरून, व राज्याची व्यवस्था बरोबर ठेवितां येईना म्हणून, त्यांस इ० स० १८७५ च्या एप्रिल महिन्याच्या २२ व्या तारखेस पदच्युत करून मद्रासेस नेऊन ठेविलें, आणि त्यांचे गादीवर त्यांच्या कुळांतील कोणा एका मुलास सयाजीराव हें नांव ठेवून बसविलें. ह्यानंतर नोवेंबर महिन्यांत नामदार प्रिन्स ऑफ् वेल्स, म्हणजे महाराणी साहेबांचे ज्येष्ठ पुत्र ह्यांची स्वारी हिंदुस्थानांत आली, आणि कांहीं दिवस ह्या देशांत राहून परत स्वदेशीं गेली.

लार्ड नार्थब्रुक इ० स० १८७६ च्या एप्रिल महिन्यांत आपलें काम सोडून स्वदेशीं गेले, आणि लार्ड लिटन हे त्यांच्या जागेवर येऊन गव्हरनर जनरलाचें काम पाहूं लागले. नंतर इ० स० १८७७ च्या जानेवारी महिन्याच्या पहिल्या तारखेस व्हिक्टोरिआ महाराणी साहेबांनीं "केसर-इ-हिंद" ह्मणजे हिंदुस्थानाची बादशाहीण हें पद धारण केलें. इ० स० १८७७-७८ ह्या वर्षीं बहुतेक सर्व हिंदुस्थानभर मोठा दुष्काळ पडला, आणि त्याच्या निवारणार्थ जरी सरकारानें अकरा कोटि रुपये खरचिले, तरी हजारों माणसें अन्न अन्न करून प्राणांस मुकलीं.

ह्याप्रमाणें इकडे दुष्काळाचें निवारण होत होतें इतक्यांत, अफगाणिस्थानाचा अमीर शेरअली रूसदेशाच्या बादशाहाकडच्या वकीलास आपल्या दरबारीं घेऊन त्यांशीं मसलती करूं लागला, आणि इंग्लिश सरकाराकडच्या वकीलास तो आपल्या देशांत येऊं देईना. तेव्हां, इंग्लिश सरकारानें त्याशीं लढण्याकरितां आपलें सैन्य पाठविलें. त्यापुढें शेरअलीचा उपाय चालेनासा होऊन, तो तुर्कस्थानाकडे पळून गेला, आणि मरण पावला. नंतर त्याचा मुलगा याकूबखान ह्याशीं इंग्लिश-सरकारानें गंडामक येथें तह ठरविला. त्यावरून इंग्लिश सरकाराच्या राज्याची सरहद्द बरीच पलीकडे गेली, आणि त्यांचा रेसिडेंत अफगाणिस्थानच्या दरबारीं असावा, असें झालें.

त्या तहाप्रमाणें सर लुइ कावाग्नरी हे तेथें रेसिडेंत झाले. तें काम त्यांच्या हातून फार दिवस झालें नाहीं तोंच, काबुलांत दंगा होऊन, तेथील लोकांनीं, रेसिडेंत व त्यांच्या जवळचे लोक ह्यांची कत्तल उडविली. तेव्हां, अफगाणिस्थानाशीं पुनः लढाई सुरू करणें इंग्लिश सरकारास भाग पडलें.

इतक्यांत इंग्लंडांतील राणीसरकारचें प्रधान मंडळ बदललें. तेव्हां लार्ड लिटन हे गव्हरनर जनरलाचें काम सोडून इ० स० १८८० ह्या वर्षीं स्वदेशीं गेले; आणि त्यांच्या जागेवर लार्ड रिपन हे आले. त्यांनीं अफगाणिस्थानांत शूर सैन्य पाठविलें. त्याचा पराभव अयूबखानाच्या सैन्यानें कंदाहार आणि हेलमंदनदी ह्यांच्या दरम्यान केला. परंतु, सर फेदरिक राबर्त ह्या नामांकित सरदारानें इ० स० १८८० च्या संप्टेंबरांत अफगाणी लोकांचा पराभव करून मोठा जय मिळविला. नंतर,

दोस्तमहंमदाच्या वंशांतला पुरुष अबदुलरहिमानखान ह्यास अफगाणिस्थानचा अमीर ह्मणून इंग्लिश सरकारानें कबूल केलें, आणि त्याशीं मित्रत्वाचा तह ठरविला. नंतर इंग्लिशांचें सैन्य परत हिंदुस्थानांत आलें. हें पाहून अयुबखानानें हिरात शहराहून पुनः कंदाहारावर चाल करून तें घेतलें. परंतु, अबदुलरहिमान ह्यानें सैन्यासहवर्तमान लागलाच त्याच्यावर हल्ला करून कंदाहार परत घेतलें, आणि अयुबखानाच्या सैन्यास पिटाळून लाविलें. आतां अफगाणिस्थानांत अबदुलरहिमान ह्याचें राज्य यथास्थित चाललें आहे.

म्हैसुर संस्थानाचा राजा वयानें लहान होता, ह्मणून त्याचा कारभार इंग्लिश सरकारच्या मार्फतीनें चालला होता. तो राजा वयांत आल्यामुळें, इ० स० १८८१ च्या मार्च महिन्यांत त्याच्या राज्यकारभाराची सगळी मुखत्यारी सरकारानें त्यास दिली. त्याप्रमाणेंच, बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड ह्यांस त्यांच्या राज्याची मुखत्यारी इ० स० १८८२ त दिली; व हैदराबादचे निजाम ह्यांस त्यांच्या राज्याची मुखत्यारी इ० स० १८८४ त दिली. कोल्हापुरचे तरुण महाराज शिवाजी हे अहमदनगर येथें मृत्यु पावल्यामुळें, त्यांचे गादीवर कागलकरांच्या चिरंजीवांस बसवून, राज्याचा कारभार मंत्रीमंडळीनें चालविला आहे.

लार्ड रिपन ह्यांनीं बाहेरून येणाऱ्या बहुतेक मालावरची जकात काढून टाकिली; मिठावरची जकात कमी केली; एतद्देशीय लोकांस न्यायाच्या संबंधानें, युरोपियन लोकांच्या इतके हक्क देण्याचा प्रयत्न केला; ज्ञानप्रसारास आणि व्यापारधंद्यांस उत्तेजन दिलें; स्थानिक राज्यव्यवस्था मोठमोठ्या शहरांत व गांवांत स्थापित केली; आणि प्रजेस सुख देण्याचे पुष्कळ प्रयत्न केले; तेणेंकरून, ते अतिशयित लोकप्रिय झाले. ते आपलें काम सोडून इ० स० १८८४ च्या दिसेंबर महिन्यांत स्वदेशाकडे निघून गेले. त्यांच्या इतके लोकप्रिय गव्हरनर जनरल आजपर्यंत दुसरे कोणीही झाले नाहींत. त्यांच्या जागेवर लार्ड डफरिन हे आले आहेत.

ईजिप्त देशाचा अधिकारी खेदिव हा इंग्लिश सरकारचा दोस्त

आहे; आणि त्याच्या राज्यांत माहादी ह्या नांवाच्या मनुष्यानें मोठें बंड केलें होतें. तें मोडण्याकरितां हिंदुस्थानांतलें आणि इंग्लंडांतलें सैन्य सरकारानें पाठविलें होतें; तें परत आलें आहे.

मध्यएशिआमध्यें अफगाणिस्थानाची सीमा ठरविण्याच्या प्रकरणावरून कलह उत्पन्न होऊन, त्या संबंधानें रावळपिंडी येथें अबदुल रहिमान व लार्ड डफरिन ह्यांची मुलाखत इ० स० १८८५ च्या एप्रिल महिन्यांत होत असतां, तिकडे पेंजदे हें ठिकाण रशिअन लोकांनीं घेऊन, अफगाणिस्थानांत बरीच पुढें चाल केली होती; आणि तीवरून; इंग्लंड व रशिआ ह्यांजकडे युद्धाची मोठी तयारी होऊन, तुमुल युद्ध होण्याचा प्रसंग अगदीं जवळ ठेपला होता. परंतु इंग्लंडानें पड घेऊन, तें विघ्न टाळिलें. हें फार चांगलें झालें. आतां अफगाणिस्थान आणि रशिआ ह्यांची सरहद्द इंग्लिश सरकाराच्या मध्यस्थीनें ठरली आहे. तेव्हां मध्यएशिआमध्यें सध्या तर गडबड होण्याचें कांहीं भय नाहीं. दुलीपशिंग वेतन घेऊन आणि खिस्ती धर्म स्वीकारून इंग्लंदांत जाऊन राहिला होता, त्याचें आणि इंग्लिश सरकारचें वेतनाच्या बाबतींत वांकडें येऊन तो रशिआंत जाऊन राहिला आहे. ब्रह्मदेशाशीं तिसरी लढाई इ० स० १८८६ च्या आरंभीं झाली. तेथील थीबा राजास कैद करून रत्नागिरीस आणून ठेविलें, आणि मागच्या दोन लढायांतून वांचून बाकी राहिलेला ब्रह्मदेश इंग्लिशांनीं आपल्या राज्यास जोडला. ब्रह्मदेशच्या लढाईस फार खर्च झाला, आणि हिंदुस्थानाचें उत्पन्न हिंदुस्थानाच्या खर्चास पुरेनासें झालें. ह्मणून, मिठावरची जकात वाढविली आहे, प्राप्तीवर कर बसविला आहे, त्यामुळें लोकांत असंतुष्टी उत्पन्न झाली आहे. आतां लवकरच लार्ड डफरिन आपलें काम सोडून जाणार. त्यांच्या जागीं लार्ड ल्यांड्स्डौन ह्यांची नेमणूक झाली आहे.

# भाग एकुणिसावा.

## हिंदुस्थानांत इंग्लिशांचा उदय होण्याचीं कारणें; व त्यांच्या राज्याची सांप्रतची स्थिति.

हिंदुस्थान हा देश कधीं एका राजाच्या सत्तेंत संपूर्ण होता, असें नाहीं. मुसलमानांनीं त्याचा बहुतेक भाग आपले अंमलाखालीं आणिला होता खरा. परंतु, त्यांस राज्य चालविण्याची व जिंकलेले देश आपले कबज्यांत ठेवण्याची शैली माहीत नसल्यामुळें त्यांचें राज्य फार दिवस टिकलें नाहीं. पुढें मराठ्यांनीं दोन दिवस थोडीशी उचल केली होती, पण तीही लवकरच लयास गेली. नंतर इंग्लिश लोकांना ह्या देशाचा धनीपणा प्राप्त झाला. ते इतक्या लांबीच्या पल्ल्यावरून केवळ व्यापाराकरितां इकडे आले असून त्यांनीं येथें राज्य कसें स्थापिलें, ह्याचें मोठें नवल वाटतें. त्यांस ज्या राजांपाशीं येथें लढावें लागलें, त्यांजपाशीं ह्याचेपेक्षां पुष्कळ सैन्य होतें; तरी ते इंग्लिशांपुढें पराभव पावले, हाही मोठा चमत्कार आहे. आतां अशी गोष्ट कशानें झाली ह्याचा विचार करूं लागलें असतां दोन कारणें मनांत उभीं राहतात. तीं हीं:—आपले राजांचीं आपसांत व घरचेघरांत वैमनस्यें होतीं, हें एक; आणि राज्यांत व्यवस्था नसून शिपाई लोकांस कवाईत येत नव्हती, हें दुसरें. त्यांत पहिलें कारण विशेष बलवत्तर होय. हें मागें लिहिलेल्या इतिहासावरून सहज लक्षांत येईल.

हिंदुस्थानांतील इंग्लिशांच्या मुलुखाचा मुख्य अधिकारी राणीनें विलायतेस नेमिला आहे. त्याला पंधरा कौन्सलर आहेत. त्यास सेक्रेटरी ऑफ् स्टेट इन्कौन्सिल असा किताब आहे. व्हाइसराय व गव्हरनर जनरल इन्कौन्सिल ह्मणून एक मोठा कामगार कलकत्त्यास असून, तो सर्व हिंदुस्थानाचा कारभार पाहतो. तो त्या सेक्रेटरीच्या हुकुमाप्रमाणें चालतो. त्याला दोन कौन्सिलें म्हणजे प्रधानमंडळ्या आहेत. एक राज्य चालविण्याचे कामीं मदत करणारी, व दुसरी कायदेकानू ठरविण्याविषयीं मदत करणारी. राज्यकारभाराचे कौन्सिलांत ६

असामी आहेत; व कायदे करणाऱ्या मंडळींत १२ असामी आहेत. ह्या कौन्सिलानें केलेला कायदा सर्व हिंदुस्थानांत चालतो. मुंबई आणि मद्रास ह्या इलाख्यांवर एक एक गव्हरनर आहे, व त्या प्रत्येकास वेगवेगळें कौन्सिल आहे. बंगाला, वायव्येकडील प्रांत आणि पंजाब ह्यांवर एकएक लेफ्टनेंत गव्हरनर आहे. व ते लेफ्टनेंत गव्हरनर आपापले ताब्यांतील मुलुखांचा राज्यकारभार चालवितात. तरी नवा कायदा, नवा हुद्दा, नौकरांच्या पगारांची बढती, अथवा कोणत्याही एखाद्या कामास दहा हजार रुपयांहून अधिक खर्च करणें, ह्या गोष्टी त्यांस स्टेट सेक्रेटरीच्या अथवा गव्हरनर जनरलाच्या मंजूरीवांचून करण्यास अधिकार नाहीं.

देशाच्या व्यवस्थेसाठीं मुख्य दोन खातीं आहेत, एक मुलकी आणि दुसरें दिवाणी. मुलकी खात्यांत कमिशनर, कलेक्टर, असिस्तंत कलेक्टर, डेपुटी कलेक्टर, मामलेदार, हे अंमलदार आहेत. ते देशाच्या वसुलाचें काम पाहतात; व कलेक्टर, त्यांचे असिस्तंत आणि मामलेदार, हे माजिस्त्रेटही आहेत; ह्मणजे, ते चोरी, मारामारी, शिवीगाळ, इत्यादिकांचे खटले फैसल करून अपराध्यांस शिक्षा देतात. दिवाणीकडचे कामदार ह्मटले ह्मणजे जड्ज, व अनेक प्रकारचे सबजड्ज हे आहेत. ते पैशाच्या देवघेवीच्या, जमिनीच्या, व इतर हक्कांच्या वगैरे फिर्यादी घेऊन त्यांचे फैसले करितात. इलाख्याचे जागीं न्यायाचें मोठें कोर्त हैकोर्त ह्मणून स्थापिलें आहे. त्यांत अनेक जड्ज असतात. ते, जिल्हा जड्जांनीं केलेल्या फैसल्यांवरचीं अपिलें पाहतात.

रयत लोकांस विद्या यावी, असा सरकारचा फार हेतु आहे. ह्मणून गांवोगांव शाळा स्थापित होऊन त्यांवर हुशार शिक्षक नेमिले जातात. विद्याभ्यास चांगला चालला आहे. ही सोय इतक्या चांगल्या प्रकारेंकरून प्राचीन राजांपैकीं कोणाकडूनही झाली नव्हती.

हिंदुस्थानांतल्या इंग्लिश राज्याचें एकंदर उत्पन्न हल्लीं सुमारें एकाहत्तर कोटि रुपये आहे. व खर्च बहुतकरून तितकाच आहे. आजपर्यंत उत्पन्नापेक्षां खर्च अधिक असल्यामुळें हिंदुस्थान सरकारास

# हिंदुस्थानाच्या इतिहासांतल्या मोठमोठ्या गोष्टींचें टिपण.

इ० स० पूर्वी.

३२७ वे वर्षी हिंदुस्थानावर शिकंदरबादशाहाची स्वारी.

इ० स०

१००१—महमुदाची हिंदुस्थानावर पहिली स्वारी.

१०२४—महमुदाची हिंदुस्थानावर शेवटची स्वारी.

११९१—महमद गोरीची हिंदुस्थानावर पहिली स्वारी.

११९३—महमद गोरीची हिंदुस्थानावर दुसरी स्वारी.

१२०६–१२८८—गुलाम वंशाची कारकीर्द.

१२८८–१३२०—खिलजी वंशाची कारकीर्द.

१३२१–१४१२—तघलख वंशाची कारकीर्द.

१३९८—तैमुरलंगाची स्वारी.

१४१२–१४१४—दौलतखान लोदीची कारकीर्द.

१४१४–१४५०—सय्यद वंशाची कारकीर्द.

१४५०–१५२६—लोदी वंशाची कारकीर्द.

१५२६—पाणिपतची लढाई; बाबरचा जय आणि इब्राईमखान लोदीचा पराजय.

१५२७–१८५७—मोंगल बादशाहा.

१५२७—शिक्रीची लढाई; बाबरचा जय आणि संगाचा पराजय.

१५३०—बाबराचा मृत्यु.

१५३०–१५३९—हुमायूनची कारकीर्द.

१५३९–१५५६—शूर वंशाची कारकीर्द.

१५४२—अकबराचा जन्म.

१५५६—पाणिपतची दुसरी लढाई; हुमायूनचा जय आणि शिकंदर शूरचा पराजय. हुमायूनचा मृत्यु.

एक अब्ज शेचाळीस कोटि पन्नास लक्ष रुपये कर्ज आहे; त्याच्या व्याजाबद्दल दरसाल ५०,००,००० रुपये हिंदुस्थानाच्या उत्पन्नांतून द्यावे लागतात.

हिंदुस्थानाचा इतर देशाशीं जो व्यापार आहे, त्यांत हिंदुस्थानांतून पुष्कळ किंमतीचा माल बाहेर जातो, आणि त्या मानानें थोड्या किंमतीचा माल हिंदुस्थानांत येतो. इ० स० १८७८ ह्या वर्षी हिंदुस्थानानें सदुसष्ट कोटींचा माल परदेशांस विकला; आणि सुमारें अठ्ठावन कोटि रुपयांचा माल इतर देशांपासून विकत घेतला.

मोठमोठ्या शहरांतून छापखाने सुरू झाले आहेत; नानाप्रकारचीं पुस्तकें छापलीं आहेत; वर्तमानपत्रें निघालीं आहेत; तारायंत्रें उभारलीं आहेत; आगीच्या गाड्या प्रांतोप्रांतीं चालूं लागल्या आहेत; पाण्यांतून जाण्यायेण्यास आगबोटी फार उपयोगीं पडूं लागल्या आहेत; ज्ञानमार्गांत लोकांचें पाऊल बरेंच पुढें पडलें आहे; न्याय आणि कायदा हीं लोकांस बरींच समजूं लागलीं आहेत; ह्या व अशा दुसऱ्या कितीएक सुखावह गोष्टी, ह्या दयाळू सरकारच्या अंमलाखालीं आमचे लोकांस प्राप्त झाल्या आहेत. ह्याबद्दल आपल्या प्रभूचे आभार मानणें हें आपणा प्रजेस फार उचित होय.

समाप्त.

इ० स०

१५५६-१६०५—अकबरची कारकीर्द.

१५६७-१५७३—रजपुतांशीं लढाया आणि गुजराथ काबीज.

१५९५—अहमदनगरचा वेढा व चांदबिबीचें शौर्य.

१६०५-१६२७—जाहांगीरची कारकीर्द.

१६१२—इंग्लिशांनीं सुरतेस वखार घातली.

१६१५—सर टी. रो याचा जाहांगीरच्या दरबारांत प्रवेश.

१६२७—शिवाजीचा जन्म.

१६२७-१६५८—शाहाजहानाची कारकीर्द.

१६२९-१६३०—मोठा दुष्काळ.

१६४६—शिवाजीनें तोरणा किल्ला घेतला.

१६५८—शाहाजहानास कैदेंत टाकून त्याचा पुत्र औरंगझेब गादीवर बसला.

१६५८—१७०७—औरंगजेबाची कारकीर्द.

१६५९—अफजुलखानाचा वध.

१६६२—पाहिस्तेखानास शिवाजीवर पाठविला.

१६६४—शिवाजीनें सुरत शहर लुटलें.

१६६६—पुरंदरचा तह. शिवाजी दिल्लीस गेला.
शाहाजनाचा मृत्यु.
शिवाजीची औरंगजेबच्या दरबारीं कैद व सुटका.

१६६८—मुंबईबेट ईस्तइंडिया कंपनीस मिळालें.

१६७४—शिवाजीचा राज्याभिषेक.

१६७५—शीक लोकांचें बंड.

१६७६—संतनरामी वैराग्यांचें बंड.

१६८०—शिवाजीचा मृत्यु.

१६८०-१६८९—संभाजीची कारकीर्द.

१६८३—मराठ्यांचा मोड करण्याकरितां औरंगजेब मोठी फौज घेऊन दक्षिणेंत आला.

१६८९—संभाजीचा वध.

१६८९-१७००—राजारामाची कारकीर्द.

इ० स०

१६९०—रायगड मोंगलांनीं घेतला.

१७००—औरंगजेबानें सातारा घेतला.

१७०७—शाहूची मोंगलांच्या कैदेंतून सुटका.

१७०७-१७१२—बहादुरशाहाची कारकीर्द.

१७०८—ताराबाईशीं लढून शाहूनें आपलें राजपद मिळविलें.

१७०८-१७४८—शाहूची कारकीर्द.

१७०९—ताराबाईनें कोल्हापुरचें राज्य स्थापिलें.

रजपुत लोक पुनः स्वतंत्र झाले.

१७१२-१७१३—जहांदरशाहाची कारकीर्द.

१७१३-१७१९—फरुकशीरची कारकीर्द.

१७१८—मराठ्यांस चौथाई व सरदेशमुखी हे हक्क मिळाले.

१७१९-१७४८—महमदशाहाची कारकीर्द.

१७२०—बाळाजी विश्वनाथाचा मृत्यु.

१७२०-१७४०—पहिले बाजीराव पेशव्याची कारकीर्द.

१७३७—भोपाळची लढाई; बाजीराव पेशव्यांचा जय आणि असोफजाचा पराभव.

१७३९—चिमणाजी आप्पानें पोर्तुगीज लोकांशीं लढून वसई घेतली.

नादीरशाहाची हिंदुस्थानावर स्वारी.

१७४०-१७६१—बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांची कारकीर्द.

१७४६—फ्रेंच लोकांनीं इंग्लिशांपासून मद्रास घेतली.

१७४८—तहामुळें मद्रास इंग्लिशांस परत मिळाली.

१७४८-१८५७—नामधारी मोंगलबादशाहांची कारकीर्द.

१७४९—अंबूरची लढाई; चंदासाहेब व फ्रेंच ह्यांचा जय; अनवरुद्दीनचा पराजय व मृत्यु.

१७५०—रघुनाथरावाची उत्तर हिंदुस्थानावर स्वारी. पंजाबावर मराठ्यांचा अम्मल.

१७५१—त्रिचनापल्लीचा वेढा राबर्ट क्लैव्हच्या कल्पनेमुळें चंदासाहेबास उठवावा लागला.

इ० स०

१७५४—महमदअल्लीस अर्काटच्या नबाबगिरीचीं वस्त्रें इंग्लिशांनीं दिलीं.

१७५६—सुराजउद्दवल्याची कलकत्त्यावर स्वारी; ब्लाकहोलचा कोंडमारा.

१७५७—क्लैव्हनें कलकत्ता परत घेतला. प्लासीची लढाई; क्लैव्हचा जय आणि सुराजउद्दवल्याचा पराजय. इंग्लिशांनीं मिरजाफरास नबाब केलें.

१७६०—वांदिवाशची लढाई; इंग्लिशांचा जय, फ्रेंचांचा पराजय. उदगीरची लढाई; मराठ्यांचा जय; निजामाचा पराजय.

१७६१—पाणिपतची तिसरी लढाई; अबदल्लीचा जय, सदाशिवराव भाऊचा पराजय. मिरजाफरास गादीवरून काढून टाकून त्याचे जागीं मिरकासिमास बसविलें.

१७६१–१७७२—माधवराव पेशव्याची कारकीर्द.

१७६१—हैदरानें राजपद मिळविलें.

१७६३—मिरकासिमास पदच्युत करून मिरजाफरास पुनः गादीवर बसविलें.

१७६३—बक्सारची लढाई; इंग्लिशांचा जय, शाहाअलम बादशाहा, अयोध्येचा नबाब आणि मिरकासीम ह्यांचा पराजय.

१७६५—कंपनीच्या नौकरांनीं खासगी व्यापार करूं नये आणि नजराणे घेऊं नयेत असें क्लैव्ह साहेबानें ठरविलें.

माधवराव पेशव्यानें हैदरावर स्वारी करून त्याजपासून खंडणी व कांहीं प्रदेश घेतला.

बंगाल, बहार व ओढ्या देश या प्रांतांची सनद (दिवाणी) शाहाअलमबादशाहापासून कंपनीच्या नांवानें क्लैव्हनें घेतली.

१७६७—चंगम आणि त्रिनोमाली येथील लढाया; इंग्लिशांचा जय व हैदराचा पराभव.

१७६९—मद्रासचा तह.

१७७०—बंगाल्यांत मोठा दुष्काळ.

इ० स०

१७७१—शाहा अलम मराठ्यांच्या साह्यानें बादशाही तक्ता-
वर बसला.

१७७३—नारायणरावपेशव्याचा मृत्यु.

,, —रेग्युलेटिंग आक्त.

,, —मराठ्यांची रोहिलखंडावर स्वारी.

१७७४—सवाईमाधवरावांचा जन्म.

,, रोहिल्यांवर इंग्लिशांची स्वारी.

१७७५—सुरतचा तह इंग्लिश व राघोबादादा.

१७७६—पुरंदरचा तह पेशवे व इंग्लिश.

१७७९—वडगांवची लढाई इंग्लिश व पेशवे. पेशव्यांचा जय.

१७८०—पोफम साहेबानें ग्वालेर घेतली.

,, —हैदरअलीनें अर्काट घेतलें.

१७८१—पोर्तोनोवोची लढाई हैदर व इंग्लिश. इंग्लिशांचा जय.

,, —चेतसिंगास पदच्युत केलें.

१७८२—सालप्याचा तह इंग्लिश व मराठे.

,, —हैदर मृत्यु पावला व टिपू गादीवर बसला.

,, —बेगमांजवळून जुलमानें पैसा घेतला.

१७८३—राघोबादादा मरण पवला.

,, —टिपूनें बेदनूरचा किल्ला घेतला.

१७८४—मंगळूरचा तह टिपू व इंग्लिश.

१७८७—टिपूनें मलबार प्रांतावर स्वारी केली.

१७८८—गंतूर परगणा घेऊन इंग्लिशांनीं आपली फौज निजामा-
च्या राज्यांत ठेवली.

१७८९—टिपूचा त्रावणकोरवर हल्ला.

१७९०—टिपूनें त्रावणकोर घेतलें.

,, —टिपू व इंग्लिशांच्या पुन्हा लढाया चालू झाल्या.

१७९२—इंग्लिश, निजाम व मराठे यांची श्रीरंगपट्टणावर स्वारी.

,, —टिपूबरोबर तह.

५

इ० स०

१७९३—युरोपांत इंग्लिश व फ्रेंच यांच्या लढाया इंग्लिश पोंदे-
चरी घेतात.

१७९४—महादजी शिंदा मरण पावला.

१७९५—खर्ड्याची लढाई. निजाम व मराठे. मराठ्यांचा जय.

१७९६—सवाईमाधवरावाचा मृत्यु. बाजीरावास गादी मिळाली.

१७९८—रोहिल्यांबरोबर तह.

,, —इंग्लिश सैन्य चाकरीस ठेवण्याचा तह इतर संस्थाना-
बरोबर झाला.

१७९९—श्रीरंगपट्टणावर स्वारी. टिपूचा मृत्यु. इंग्लिशानीं श्रीरंग-
पट्टण घेतलें.

,, —तंजावर इंग्लिशांस मिळालें.

,, —सुरतचा नवाब मृत्यु पावला व राज्य खालसा केलें.

१८००—नानाफडणवीस मृत्यु पावला.

१८०१—फरकाबादच्या नवाबास नेमणूक करून देऊन राज्य
खालसा केलें.

,, —होळकर व शिंदा यांची लढाई. शिंद्याचा जय.

१८०२—होळकरानें पुणें लुटलें.

,, —वसईचा तह पेशवे व इंग्लिश.

१८०३—इंग्लिशांनीं बाजीरावास गादीवर बसविलें.

,, —असई व लासवारी येथील लढाया. शिंदा व इंग्लिश.
इंग्लिशांचा जय.

,, —देवगांवचा तह मराठे व इंग्लिश.

१८०५—शिंदा होळकर व इंग्लिश यांचा तह.

,, —लार्ड कार्नवालिस साहेब मरण पावला.

,, —भरतपुरचा राजा व इंग्लिशांचा तह.

१८०६—वेलोरास बंड झालें.

१८०९—इराणच्या बादशहाबरोबर इंग्लिशांचा तह.

,, —त्रावणकोरच्या दिवाणाचा दंगा.

,, —अजगड व कालिंजर हे किल्ले इंग्लिशांनीं घेतले.

इ० स०

१८१०—इंग्लिशांनीं फ्रेंचापासून बुर्बो व मारिशियस घेतलें.

१८१३—कंपनीस राज्याधिकाराची सनद पुन्हा मिळाली. व इतरांस हिंदुस्थानांत व्यापार करण्याची मोकळीक झाली

१८१४—बुतवाल व देवराज हीं इंग्लिशांचीं ठाणीं नेपाळी लोकांनीं घेतलीं.

१८१५—नेपाळी व इंग्लिशांचा तह.

,, —गंगाधर शास्त्र्याचा खून.

१८१६—मकानपुरची लढाई. नेपाळी व इंग्लिश. इंग्लिशांचा जय.

१८१६-१७—पेंढाऱ्यांनीं इंग्लिशांच्या मुलखांत लुटालूट मांडली.

१८१६—जयपुर जोधपुर व उदेपुर यांबरोबर तह.

,, —त्रिंबकजी डेंगळा पळून जाऊन बंड करितो.

१८१७—पेशव्याबरोबर इंग्लिश पुन्हा तह करितात.

,, —पेशव्यानें खडकीवर हल्ला केला. पेशव्याचा पराजय.

,, —भोंसल्याबरोबर लढाई.

,, —तुळजाबाई होळकरीण इचा खून.

,, —महिदपुरची लढाई. होळकर व इंग्लिश. इंग्लिशांचा जय.

१८१८—पेशव्यानें राज्य सोडून नेमणूक पतकरली.

१८१९—मंडळेश्वरचा तह होळकर आणि इंग्लिश.

,, —इंग्लिशांनीं भूज हल्ला करून घेतलें.

,, —कच्छप्रांतांत भूकंप झाला.

१८२३—ब्रह्मीलोकांनीं शाहपुरीवर हल्ला करून तें घेतलें.

१८२४—भरतपुरचा राजा मेला.

१८२५—भरतपुरचा वेढा.

१८२६—पाघामची लढाई. ब्रह्मीलोक व इंग्लिश. इंग्लिशांचा जय.

,, —ब्रह्मदेशाबरोबर इंग्लिशांचा तह.

,, —इंग्लिशांनीं भरतपुर घेतलें. दुर्जनसाल कैद केला.

१८३२—म्हैसूरचा कारभार इंग्लिशांनीं आपल्या हातीं घेतला.

१८३४—कुर्गसंस्थान खालसा केलें.

इ० स०

१८३७—इंग्लिश वकील अलेकझांदर बर्न्स काबुलांत गेला.

" —रणजितसिंग आणि लार्ड बेंतिक यांची गांठ बोपार गांवीं झाली.

१८३८—अफगाणाशीं युद्धाची इंग्लिशांची तयारी.

१८३९—प्रतापसिंहास पदच्युत करून काशी येथें ठेविलें.

" —कीसाहेबांनीं सिंधच्या अमिराचा पराभव केला.

१८३९—रणजितसिंग मरण पावला.

१८४०—इंग्लिशांनीं गिजनी घेतली.

" —पर्वानची लढाई. अफगाण व इंग्लिश इंग्लिशांचा जय. दोस्तमहमद शरण आला.

१८४१—शहासुजा मारला गेला.

१८४१—चीनी व इंग्लिश यांच्या लढाया. इंग्लिशांचा जय.

" नांकीनचा तह. इंग्लिश व चीनी यांमध्यें.

१८४३—शरसिंग मरण पावला. धुलिपसिंग गादीवर बसला.

" —इमामगड, मियानी व हैदराबादची लढाई. इंग्लिश व सिंधचे अमीर. इंग्लिशांचा जय.

" —जनकोजी शिंदा मरण पावला.

" —पन्यार व महाराज पुरची लढाई. इंग्लिश व शिंदे. इंग्लिशांचा जय.

१८४५—शीखलोकांनीं इंग्लिशांचे मुलखावर चाल केली.

" —मुडकीची लढाई व फिरोजपुरची लढाई. शीख व इंग्लिश. इंग्लिशांचा जय.

१८४६—अलवाल व सोब्रनची लढाई. शीख व इंग्लिश. इंग्लिशांचा जय.

१८४८—मुळराजास पदच्युत केलें.

१८४९—चिलियनवाला व गुजरात येथील लढाई. शीख व इंग्लिश. इंग्लिशांचा जय.

" —पंजाब खालसा केलें.

इ० स०

१८५२—ब्रह्मीलोकांबरोबर पुन्हा लढाई. इंग्लिशांचा जय.

१८५३—ब्रह्मीलोकांबरोबर तह.

,, —निजामानें वऱ्हाडप्रांत इंग्लिशांच्या ताब्यांत दिला.

,, —झांशीचा राजा मरण पावला. झांशी इंग्लिशांनीं खालसा केली.

,, —रघोजीभोंसला मरण पावला. इंग्लिशांनीं नागपुर खालसा केलें.

१८५५—सांथललोकांस डोंगरांत हाकून दिलें.

१८५६—अयोध्या खालसा केली.

१८५७—बारासजुनची लढाई. इराणी लोक व इंग्लिश. इंग्लिशांचा जय.

,, —हिंदुस्थानांतील शिपायांनीं बंड केलें.

१८५७—झांशी बंडवाल्यांपासून इंग्लिशांनीं परत घेतली.

,, —बंडाचा पूर्ण नाश झाला.

१८६६—ओरिसा प्रांतांत भयंकर दुष्काळ पडला.

१८७२—शेरअलीनें लार्डमेयोचा खून केला.

१८७४—खालच्या बंगाल्यांत दुष्काळ पडला.

१८७५—मल्हारराव गायकवाड यांस पदच्युत केलें.

१८७७—विक्टोरिया महाराणी साहेबांनीं केसर. इ-हिंद हें पद धारण केलें.

१८७७-७८—हिंदुस्थानांत मोठा दुष्काळ पडला.

१८८०—अफगाणांचा पराभव इंग्लिशांनीं केला.

१८८१—ह्मैसुरच्या राजास मुखत्यारी मिळाली.

१८८२—सयाजीराव महाराज यांस राज्याची मुखत्यारी मिळाली.

१८८४—निजामास राज्याची मुकत्यारी मिळाली.

,,—कोल्हापुरचे शिवाजीराव महाराज मरण पावले.

# गव्हरनर जनरल.

**वारनहेस्टिंग्स.** इ० स० १७७३–१७८५ रेग्युलेटिंगआक्त. चेतसिंग, रोहिल्यांवर स्वारी, बेगमांवर जुलुम, पुरंदरचा तह.

**लार्ड कार्नवालिस.** इ० स० १७८५–१७९३ अर्काटच्या नबाबाबरोबर तह, बंगाल्यांत जमिनदारीची व्यवस्था. जिल्ह्यानिहाय जज्जकलेक्टरची नेमणूक.

**सर जानशोर.** इ० स० १७९३–१७९८ सादतअल्लीबरोबर तह.

**मार्किस आफ् वेल्स्ली.** इ० स० १७९८–१८०५ श्रीरंगपट्टण घेतलें. मराठ्यांबरोबर लढाया.

**मार्किस कार्नवालिस.** इ० स० १८०५ मरण पावला.

**सर जार्ज बार्लो.** इ० स० १८०५–१८०६ शांतता ठेविली. वेलोरचें बंड.

**लार्ड मिंतो.** इ० स० १८०६–१८१३ इराणाबरोबर तह. हिंदुस्थानच्या खर्चानें ख्रिस्तीधर्मखात्याची स्थापना.

**मार्किस आफ् हेस्टिंग्स.** इ० स० १८१४–१८२३ नेपाळची लढाई. पेंढाऱ्यांचा नाश. पेशवाई बुडाली होळकराबरोबर लढाई. कच्छप्रांतांत भूकंप.

**लार्ड आमहर्स्त.** इ० स० १८२३–१८२८ ब्रह्मदेशाबरोबर लढाई. भरतपुरची लढाई. नागपुरच्या नव्या राजाबरोबर तह. सिमला हें गव्हरनर जनरलचें राहण्याचें ठिकाण झालें.

**लार्ड विलियम बेंतिक.** इ० स० १८२८–१८३५ वर्तमानपत्रांस स्वातंत्र्य. विद्याप्रसार. ठगांचा बंदोबस्त. अफूवर जकात. सतीची बंदी. कुर्ग खालसा केलें.

**लार्ड आक्लंद.** इ० स० १८३५–१८४२ अफगाणिस्थानाशीं लढाई. चीनबरोबर लढाई व तह. चीनदेशांत व्यापाराची मोकळीक.

**लार्ड एलनबरो.** इ० स १८४२–१८४४ दोस्तमहंमदास सोडलें. सिंधच्या अमिरांबरोबर लढाई. शिंयाबरोबर लढाई.

**लार्ड हार्डिंज.** इ० स० १८४४–१८४७ पंजाबची लढाई. व्यापारास उत्तेजन. ताजमहालाची दुरुस्ति. खोंडलोकांतल्या बालहत्येचा बंदोबस्त. रुर्कि येथें इंजनियरिंग कालेज.

**लार्ड डालहौसी.** इ०स० १८४८–१८५६ पंजाब, नागपुर, झांशी, व अयोध्या व सातारा खालसा केलें. संस्थानिकांचें बंड. विधवाविवाहाचा कायदा. युनिव्हर्सिट्यांची स्थापना. टपालखात्याची सुधारणा. गंगेच्या कालव्याची दुरुस्ति. आगगाड्या व तारायंत्रें.

**लार्ड क्यानिंग.** इ० स० १८५६–१८६२ शिपायांचें बंड. इराणीलोकांबरोबर लढाई. हिंदुस्थान महाराणी विक्तोरिया साहेबांनीं आपल्या ताब्यांत घेतलें.
राणीसाहेबांचा जाहिरनामा. गव्हरनर जनरलास व्हाइसराय हा किताब मिळाला.

**लार्ड एल्गिन.** इ० स० १८६२–१८६३ कापसाची किंमत अमेरिकेंतील लढायांमुळें वाढली. कायदेकौन्सिलांत एतद्देशीय लोक सभासद नेमूं लागले.

**सर जान लारेन्स.** इ० स० १८६३–१८६९ भुतानी लोकांचा पराभव. ओरिसाप्रांतांत दुष्काळ.

**लार्ड मेयो.** इ० स० १८६९–१८७२ ड्यूक ऑफ् एदिंबरो हिंदुस्थानांत आले. शेतकीखातें स्थापिलें. मिठावरच्या करांत फेरफार केले. लोकोपयोगी कामांस उत्तेजन दिलें.

**लार्ड नार्थब्रूक.** इ० स० १८७२–१८७६ बंगाल्यांत दुष्काळ पडला. मल्हारराव गायकवाडांस पदच्युत केलें प्रिन्स ऑफ् वेल्स हिंदुस्थानांत आले.

# गव्हरनर जनरल.

**वारनहेस्तिंग्स.** इ० स० १७७३–१७८५ रेग्युलेटिंगआक्त. चेतसिंग, रोहिल्यांवर स्वारी, बेगमांवर जुलुम, पुरंदरचा तह.

**लार्द कार्नवालिस.** इ० स० १७८५–१७९३ अर्काटच्या नबाबाबरोबर तह, बंगाल्यांत जमिनदारीची व्यवस्था. जिल्ह्यानिहाय जज्जकलेक्टरची नेमणूक.

**सर जानशोर.** इ० स० १७९३–१७९८ सादतअलीबरोबर तह.

**मार्किस आफ् वेल्स्ली.** इ० स० १७९८–१८०५ श्रीरंगपट्टण घेतलें. मराठ्यांबरोबर लढाया.

**मार्किस कार्नवालिस.** इ० स० १८०५ मरण पावला.

**सर जार्ज वार्लो.** इ० स० १८०५–१८०६ शांतता ठेविली. वेलोरचें बंड.

**लार्द मिंतो.** इ० स० १८०६–१८१३ इराणाबरोबर तह. हिंदुस्थानच्या खर्चानें ख्रिस्तीधर्मखात्याची स्थापना.

**मार्किस आफ् हेस्तिंग्स.** इ० स० १८१४–१८२३ नेपाळची लढाई. पेंढाऱ्यांचा नाश. पेशवाई बुडाली होळकराबरोबर लढाई. कच्छप्रांतांत भूकंप.

**लार्द आमहर्स्त.** इ० स० १८२३–१८२८ ब्रह्मदेशाबरोबर लढाई. भरतपुरची लढाई. नागपुरच्या नव्या राजाबरोबर तह. सिमला हें गव्हरनर जनरलचें राहण्याचें ठिकाण झालें.

**लार्द विलियम बेंतिक.** इ० स० १८२८–१८३५ वर्तमानपत्रांस स्वातंत्र्य. विद्याप्रसार. ठगांचा बंदोबस्त. अफूवर जकात. सतीची बंदी. कुर्ग खालसा केलें.

**लार्द आक्लंद.** इ० स० १८३५–१८४२ अफगाणिस्थानाशीं लढाई. चीनबरोबर लढाई व तह. चीनदेशांत व्यापाराची मोकळीक.

**लार्ड एलनबरो.** इ० स १८४२–१८४४ दोस्तमहंमदास सोडलें. सिंधच्या अमिरांबरोबर लढाई. शिंद्याबरोबर लढाई.

**लार्ड हार्डिंज.** इ० स० १८४४–१८४७ पंजाबची लढाई. व्यापारास उत्तेजन. ताजमहालाची दुरुस्ति. खोंडलोकांतल्या बालहत्येचा बंदोबस्त. रुर्कि येथें इंजनियरिंग कालेज.

**लार्ड डालहौसी.** इ०स० १८४८–१८५६ पंजाब, नागपुर, झांशी, व अयोध्या व सातारा खालसा केलीं. संथाळ लोकांचें बंड. विधवाविवाहाचा कायदा. युनिव्हर्सिट्यांची स्थापना. टपालखात्याची सुधारणा. गंगेच्या कालव्याची दुरुस्ति. आगगाड्या व तारायंत्रें.

**लार्ड क्यानिंग.** इ० स० १८५६–१८६२ शिपायांचें बंड. इराणीलोकांबरोबर लढाई. हिंदुस्थान महाराणी विक्तोरिया साहेबांनीं आपल्या ताब्यांत घेतलें.
राणीसाहेबांचा जाहिरनामा. गव्हरनर जनरलास व्हाइसराय हा किताब मिळाला.

**लार्ड एल्गिन.** इ० स० १८६२–१८६३ कापसाची किंमत अमेरिकेंतील लढायांमुळें वाढली. कायदेकौन्सिलांत एतद्देशीय लोक सभासद नेमूं लागले.

**सर जान लारेन्स.** इ० स० १८६३–१८६९ भुतानी लोकांचा पराभव. ओरिसाप्रांतांत दुष्काळ.

**लार्ड मेयो.** इ० स० १८६९–१८७२ ड्यूक ऑफ् एदिंबरो हिंदुस्थानांत आले. शेतकीखातें स्थापिलें: मिठावरच्या करांत फेरफार केले. लोकोपयोगी कामांस उत्तेजन दिलें.

**लार्ड नार्थब्रूक.** इ०स०१८७२–१८७६ बंगाल्यांत दुष्काळ पडला. मल्हारराव गायकवाडांस पदच्युत केलें. प्रिन्स ऑफ् वेल्स हिंदुस्थानांत आले.

**लार्ड लिटन.** इ० स० १८७६--१८८० महाराणीसाहेबांनीं केसर इ० हिंद पदवी धारण केली. हिंदुस्थानांत मोठा दुष्काळ पडला. अफगाणिस्थानाशीं लढाई.

**लार्ड रिपन.** इ० स० १८८०–१८८४ म्हैसूर, बडोदें व हैदराबाद येथील राजांस मुखत्यारी मिळाली. आयात जकात माफ झाली. मोठमोठ्या शहरांत स्थानिक राज्यव्यवस्था चालू झाली. मिठावरचा कर कमी झाला.

**[illegible]रिन.** इ० स० १८८[illegible] [illegible] यांची कारकीर्द चालू [illegible], [illegible] काबुलचे अमीर [illegible] [illegible] यांची भेट. ब्रह्मदेश [illegible] मिठावर आणि प्राप्तीवर कर बसला.